सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
लातूर | शनिवार, ९ मे २०२६ । वर्ष ४ थे अंक ६१ । पाने १२ । किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**विनम्र अभिवादन**



महाराणा प्रताप यांची आज जयंती

**विचारपुष्प**



केवळ पारंपरिक शिक्षणाचाच नव्हे तर जीवन शिक्षणाचाही विचार केला गेला पाहिजे. जन्मास आलेल्या नवजात शिशूपासून शिक्षणावस्था संपेपर्यंतच्या कालावधीतील विविध टप्प्यांवर बालकांवर कोणत्या प्रकारचे संस्कार व्हावेत याचा विचार झाला पाहिजे.

**- भारतरत्न स्व. नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

# शेतजमीन भाड्याने देता येणार

## राज्य सरकारकडून मार्गदर्शक सूचना जारी • जमीन मालकांचे हक्क राहणार सुरक्षित • पट्टेदार शेतकऱ्यांनाही मिळणार सरकारी योजनांचे लाभ

**मुंबई, ८ मे**

राज्यातील शेतजमीन मालक आणि शेतमजूर किंवा अल्पभूधारक शेतकरी यांच्यासाठी राज्य सरकारने एक अत्यंत क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. 'महाराष्ट्र शेतजमीन भाडेपट्ट्याने देण्याबाबत अधिनियम, २०१७' आणि त्याअंतर्गत 'नियम २०२४' च्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी महसूल व वन विभागाने आज सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. या नव्या नियमांमुळे आता शेतजमीन भाड्याने देणे आणि कसणे पूर्णपणे कायदेशीर होणार असून, यामुळे शेती क्षेत्रातील गुंतवणुकीला आणि उत्पादकतेला मोठी चालना मिळणार आहे.

जुन्या कुळवहिवाट कायद्यांमधील जाचक अटींमुळे अनेकदा जमिनीचे व्यवहार अनौपचारिक राहत होते. नव्या मार्गदर्शक सूचनांमुळे हे व्यवहार पारदर्शक होतील. जमिनीच्या पट्ट्याबाबतचे वाद सोडवण्यासाठीही विशेष तरतूद करण्यात आली आहे.

भूमीहीन गरीब व्यक्ती, अल्पभूधारक आणि अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांना आता कायदेशीररीत्या अधिक जमीन कसण्यास उपलब्ध होईल. यामुळे कृषी क्षेत्रातील कार्यक्षमता वाढेल आणि ग्रामीण भागात रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील. महाराष्ट्र शासनाचा हा निर्णय राज्यातील शेती क्षेत्राचा चेहरामोहरा बदलणारा ठरेल, असा विश्वास कृषी तज्ज्ञांकडून व्यक्त केला जात आहे.

अनेकदा जमीन मालकांना आपली जमीन दुसऱ्याला कसण्यासाठी (बटाईने किंवा भाड्याने) देताना ती गमावण्याची भीती वाटत होती. मात्र, नव्या कायद्यानुसार जमीन मालकाचे मालकी हक्क पूर्णपणे संरक्षित करण्यात आले आहेत. भाडेपट्ट्याचा करार संपल्यानंतर जमीन मालकाला आपली जमीन कोणत्याही कायदेशीर कटकटीशिवाय परत मिळण्याची हमी देण्यात आली आहे. यामुळे जमिनी पडीक राहण्याचे प्रमाण कमी होऊन त्या लागवडीखाली येतील.

*(तभा वृत्तसेवा)*



### अंमलबजावणीसाठी 'नियम २०२४' चा आधार

शासनाने या प्रक्रियेसाठी स्पष्ट नियमावली तयार केली आहे. यामध्ये भाडेपट्ट्याचा करार कसा असावा, कराराचा कालावधी किती असावा आणि दोन्ही पक्षांच्या जबाबदाऱ्या काय असतील, याचे सविस्तर वर्णन करण्यात आले आहे. सक्षम प्राधिकाऱ्याकडे या कराराची नोंदणी करणे अनिवार्य असून, त्यासाठी एक स्वतंत्र 'लीज ॲग्रीमेंट रजिस्टर' ठेवले जाणार आहे.

### पट्टेदार शेतकऱ्यांना मिळणार सन्मान आणि लाभ

यापूर्वी अनौपचारिक कराराने जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना सरकारी योजना, पीक कर्ज किंवा नैसर्गिक आपत्तीच्या वेळी नुकसान भरपाई मिळण्यात अडचणी येत होत्या. आता लेखी आणि नोंदणीकृत भाडेपट्ट्यामुळे पट्टेदार शेतकऱ्याला बँक पीक कर्ज मिळणे सोपे होईल, शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ थेट घेता येईल, पीक विम्याचे संरक्षण मिळण्यास मदत होणार आहे.

# बँकिंग घोटाळ्यात सखोल चौकशीची गरज

## अंबानी समूहाशी संबंधित प्रकरणात न्यायालयाचे मत

**नवी दिल्ली, ८ मे**

अनिल अंबानी समूह आणि त्यांच्या कंपन्यांशी संबंधित मोठ्या बँकिंग घोटाळा प्रकरणात सखोल चौकशीची गरज आहे, असे मत सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी व्यक्त केले. केंद्रीय अन्वेषण ब्युरोने (सीबीआय) सात प्रकरणांमधील अंदाजित एकूण नुकसान सुमारे २७,३३७ कोटी रुपये असल्याचा अहवाल दिल्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले.

सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांचे न्यायासन, माजी सनदी अधिकारी ई. ए. एस. शर्मा यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करीत होते. या याचिकेत अनिल अंबानींच्या नेतृत्वाखालील कंपन्यांनी केलेल्या ४०,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या कथित कर्ज घोटाळ्याची न्यायालयीन देखरेखीखाली चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याचिकाकर्त्यांचे प्रतिनिधित्व करणारे वकील प्रशांत भूषण म्हणाले की, सीबीआय आणि अंमलबजावणी संचालनालय (ईडी) या दोघांनीही हा घोटाळा २७,००० कोटी रुपयांचा असल्याचे सांगितले आहे. तसेच या घोटाळ्याचे सूत्रधार अनिल अंबानी आहे, असा दावाही त्यांचा आहे. तरीही त्यांना अद्याप अटक करण्यात आलेली नाही, ही बाब आश्चर्यकारक आहे.

न्यायासनाने नमूद केले की, जोपर्यंत तपास यंत्रणा अटकेची मागणी करत नाही तोपर्यंत अटकेचे निर्देश देण्यास न्यायालय संकोच करेल, असे सर्वोच्च न्यायालयाने वारंवार सांगितले आहे. तपासाला सनसनाटी स्वरूप देण्याऐवजी, तपास आणि संबंधित पुरावे गोळा करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. कोणत्याही प्रकरणात कोठडीतील चौकशीची गरज आहे की नाही, हे तपास यंत्रणेच्या विवेकबुद्धीवर सोडायला हवे.

*(वृत्तसंस्था)*

# मराठीत ८० हजार विद्यार्थी अनुत्तीर्ण

**पुणे, ८ मे**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असताना मराठीच्या पेपरमध्ये तब्बल ८० हजार विद्यार्थी नापास झाल्याची धक्कादायक माहिती आहे. दहावीच्या परीक्षेत ३५ विषयांपैकी १२ विषयांचा निकाल १०० टक्के लागला आहे. प्रथम भाषा म्हणून मराठीची निवड करून परीक्षा देणाऱ्या राज्यातील सुमारे १० लाख ८७ हजार ६९९ विद्यार्थ्यांपैकी ८० हजार ८०३ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत. दहावीत द्वितीय आणि तृतीय भाषा म्हणून मराठी भाषेची निवड करून एकूण ४ लाख १३ हजार ९१७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यापैकी १३ हजार ७४१ विद्यार्थी नापास झाले. परकीय भाषा निवडणाऱ्या विद्यार्थ्यांचे उत्तीर्णतेचे प्रमाण मात्र चांगले आहे.

*(तभा वृत्तसेवा)*

### अकरावी प्रवेश प्रक्रीया सुरू

अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. विद्यार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी वेगाने सुरू असून अकरावीचे वर्ग १ जुलैपासून सुरू करण्यात येणार असल्याची माहिती शिक्षण आयुक्त सच्चिंद्रप्रताप सिंह यांनी दिली आहे. प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी, प्राधान्यक्रम निवडणे आणि कागदपत्र अपलोड करणे या सर्व प्रक्रिया वेळेत पूर्ण कराव्यात, असे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.

# तामिळनाडूत शपथविधी सोहळ्यावर संभ्रम

**नवी दिल्ली, ८ मे-**

तामिळनाडूमध्ये नवीन सरकार स्थापनेभोवती असलेले अनिश्चिततेचे सावट अद्यापही कायम आहे. तामिळनाडूत सरकार स्थापनेच्या प्रक्रियेला वेग आला असला तरी टीव्हीकेला समर्थन देण्याबाबत व्हीसीकेने एक अट ठेवली असून आययूएमएलनेही त्यांची भूमिका अद्याप स्पष्ट केलेली नाही. दरम्यान, तामिळगा वेटी कळघम (टीव्हीके)चे प्रमुख विजय यांनी शुक्रवारी राज्यपालांची तिसऱ्यांदा भेट घेतली. ११८ आमदारांच्या समर्थनाचे पत्र सादर केल्यानंतर राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ अर्लेकर यांनी त्यांना सरकार स्थापन करण्यासाठी आमंत्रित केले.

विजय शनिवारी सकाळी ११ वाजता जवाहरलाल नेहरू इनडोअर स्टेडियमम ध्ये मुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्याची शक्यता आहे. विजय यांनी काँग्रेस आणि डाव्या पक्षांकडून पाठिंबा मिळाल्यानंतर सरकार स्थापन करण्याचा दावा केला आहे. डाव्या पक्षांनी बिनशर्त पाठिंबा दिल्यानंतर काही तासांतच विजय शुक्रवारी तिसऱ्यांदा राजभवनात पोहोचले आणि सरकार स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेल्या जागांसाठी पाठिंब्याची पत्रे सादर केली.



टीव्हीकेने निवडणुकीत एकूण १०८ जागा जिंकून जोरदार कामगिरी केली. पक्षप्रमुख विजय यांनी स्वतः दोन जागा जिंकल्या. त्यामुळे त्यांना एक जागा सोडावी लागेल. राज्यात सरकार स्थापन करण्यासाठी ११८ आमदारांचे बहुमत आवश्यक आहे.

### १६ मेला मनोज जरांगे पुन्हा उतरणार मैदानात

**जालना :** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी शुक्रवारी मराठा समाजाच्या न्याय मागण्यांसाठी पुन्हा एकदा एक मोठे आंदोलन छेडण्याची घोषणा केली आहे. या आंदोलनाची तारीख ते १६ मे रोजी आंतरवाली सराटीत आयोजित करण्यात आलेल्या एका बैठकीत घोषित केली जाणार आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या लाभार्थ्यांना व्याजाचा परतावा मिळत नाही. यामुळे मराठा समाजातील अनेक तरुण उद्योजक आर्थिक अडचणीत सापडलेत.



# निदा खानला ११ मेपर्यंत पोलिस कोठडी

**नाशिक :** नाशिकच्या टीसीएस कंपनीतील धर्मांतर प्रकरणाने संपूर्ण राज्य हादरले असताना, यातील मुख्य आरोपी निदा खान हिच्या अटकेनंतर अनेक खळबळजनक खुलासे झाले आहेत.

नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने २ मे रोजी तिचा अटकपूर्व जामीन फेटाळल्यानंतर ती फरार होती. अखेर गुरुवारी रात्री छत्रपती संभाजीनगरच्या नारेगाव परिसरातून तिला ताब्यात घेण्यात आले. तिला शुक्रवारी नाशिक न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने तिची ११ मे पर्यंत पोलिस कोठडीत रवानगी केली आहे. निदा खान ही मागील काही दिवसांपासून पोलिसांना चकवा देत होती. नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी संयुक्त सापळा रचून तिला गुरुवारी रात्री अटक केली.

# शुभेंदू बंगालचे 'अधिकारी'

## आज घेणार मुख्यमंत्रिपदाची शपथ

### सरकार स्थापनेचा केला दावा

**कोलकाता, ८ मे**

पश्चिम बंगालमधील भाजपाच्या विजयाचे शिलेदार शुभेंदू अधिकारी यांची शुक्रवारी भाजपा पक्ष विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत पक्षनेतेपदी बिनविरोध निवड करण्यात आली. या निर्णयामुळे अधिकारी हेच बंगालचे नवे मुख्यमंत्री होणार असल्याचे आता निश्चित झाले असून शनिवारी सकाळी ११ वाजता त्यांचा भव्य शपथविधी सोहळा कोलकाताच्या ऐतिहासिक ब्रिगेड परेड ग्राऊंडवर पार पडणार आहे.

पक्षनेतेपदी निवड झाल्यानंतर शुभेंदू अधिकारी यांनी लोकभवन येथे राज्यपाल आर. एन. रवी यांची भेट घेतली आणि सरकार स्थापनेचा दावा सादर केला. राज्यपालांनी त्यांना शपथविधी आणि सरकार स्थापनेसाठी मंजुरी दिली आहे. कोलकाता येथील कन्व्हेन्शन सेंटर येथे पार पडलेल्या भाजपा आमदारांच्या बैठकीत शुभेंदू अधिकारी यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. या बैठकीला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह स्वतः निरीक्षक म्हणून उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत सर्व आमदारांनी एकमताने अधिकारी यांच्या नेतृत्वाला पसंती दिली. त्यानंतर शाह यांनी अधिकृतरीत्या अधिकारी यांच्या नावाची घोषणा केली. पाठिंबा दर्शविणारे आठ प्रस्ताव सादर झाले होते. हे सर्व प्रस्ताव एकाच नावासाठी होते. सर्वांना दुसरे नाव सुचवण्यासाठी वेळ देण्यात आला होता, परंतु दुसरे कोणतेही नाव पुढे आले नाही. त्यामुळे केंद्रीय निरीक्षक म्हणून, मी अधिकारी यांची पश्चिम बंगाल विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून निवड करीत असल्याचे शाह यांनी सांगितले.

*(वृत्तसंस्था)*



विधिमंडळ नेतेपदी निवड झाल्यानंतर शुभेंदू अधिकारी यांचे अभिनंदन करताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

### महिला सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य : अधिकारी

**आमदारांना संबोधित करताना अधिकारी म्हणाले, येणारे मंत्रिमंडळ, विधिमंडळ पक्ष जाहीरनाम्यातील प्रत्येक वचन आणि पंतप्रधानांनी जनतेला दिलेली आश्वासने निर्धारित वेळेत पूर्ण करेल. महिला सुरक्षेला आमच्या सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असेल. बंगालच्या भूमीला सोनार बांगलामध्ये रूपांतरित करण्याचे आमचे ध्येय आहे. संदेशखालीपासून आर. जी. कारपर्यंत महिलांवर झालेल्या अत्याचारांची चौकशी करण्यासाठी आयोग स्थापन केला जाईल.**

### खाते वाटपावर चर्चा

**पक्षाच्या विधिमंडळ बैठकीपूर्वी शाह यांनी पक्षातील वरिष्ठ नेत्यांसोबत नवीन मंत्रिमंडळाची रचना, प्रमुख खात्यांचे वाटप आणि सरकारचे प्राधान्यक्रम यांवर चर्चा केल्याची माहिती सूत्रांनी दिली. शनिवारी होणाऱ्या शपथविधी समारोहाला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री आणि रालोआचे प्रमुख नेते उपस्थित राहणार आहे. या सोहळ्याला ५०,००० हून अधिक लोक उपस्थित राहण्याची शक्यता आहे.**

केरळमध्ये मुख्यमंत्रिपदाचा पेच; दिल्लीत होणार निर्णय (पान ३ वर)




### एकनिष्ठ कार्यकर्त्याने उलथविले साम्राज्य

स्पष्टवक्ते आणि जनतेसाठी लढणारे नेते म्हणून ख्यातीप्राप्त असलेले शुभेंदू अधिकारी हे कधीकाळी ममता बॅनर्जी यांचे विश्वासू होते. नंदीग्रामच्या लढ्यातील त्यांच्या योगदानामुळे तृणमूल काँग्रेसचा सत्तेचा मार्ग मोकळा झाला होता. राजकीय मतभेदांमुळे त्यांनी दीदींची साथ सोडली आणि भारतीय जतना पक्षात प्रवेश केला. भाजपानेही त्यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवित त्यांच्याच नेतृत्वात विधानसभेच्या दोन निवडणुका लढल्या. २०२१ च्या निवडणुकीत भाजपाने मुंसडी मारीत ७० जागा जिंकल्या होत्या. या निवडणुकीत मात्र, बहुमत मिळवित इतिहास घडविला. मेदिनीपूरचा हा लढवय्या आता पश्चिम बंगालचे नेतृत्व करणार आहे.


### भाजपाने तिसऱ्यांदा दाखवला बाहेरच्या नेत्यावर विश्वास

मुळ भाजपाचे नसलेले पण राज्यात सत्ता आल्यानंतर मुख्यमंत्री बनलेले शुभेंदू अधिकारी हे तिसरे नेते आहेत. याआधी २०२१ मध्ये भाजपाने काँग्रेसमधून भाजपात आलेले हिमंता बिस्व सरमा यांना आसामचे मुख्यमंत्री बनवले होते. २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत हिमंता बिस्व सरमा यांनी दुसऱ्यांदा आसाममध्ये भाजपाला बहुमत मिळवून दिले, त्यामुळे त्यांची मुख्यमंत्रिपदी फेरनिवड झाली आहे.

DAIKIN
WORLD'S LEADING AIR CONDITIONING COMPANY FROM JAPAN



सुपीरियर कूलिंग फॉर
केयरफ्रीसमर्स




55 डिग्रीमध्येही कूलिंग, 22M लांब एअर थ्रो,
आणि पॉवर चिल ऑपरेशन - जे तुम्हाला तीव्र उष्णतेपासून आराम देते.

#1 MOST TRUSTED Air Conditioners BRAND IN INDIA
TRA'S BRAND TRUST REPORT 2026 — Power of Trust

Daikin - द एअर स्पेशलिस्ट

5 YEARS# COMPREHENSIVE WARRANTY | Green Exchange Offer* UPTO ₹6000* | STANDARD INSTALLATION OFFER* | 5% CASHBACK* | EASY EMI
AXIS BANK | HDFC BANK | ICICI Bank | SBI card
Check offer with Daikin Authorized channel partner before purchase.

आता तुमच्या जवळच्या अधिकृत डायकिन डीलरशिपला भेट द्या

DAIKIN AIRCONDITIONING INDIA PVT. LTD.
BRANCH OFFICE: 704 & 705A, 7th Floor, Orville Business Port, West Avenue Road, Opposite Konark Epitome Viman Nagar, Pune, Maharashtra - 411014. Tel: 020-47248158.
For service related queries: WhatsApp "Hi" at 987 140 9300, Call our Customer Contact Centre at 011-4031-9300/1860-180-3900, or write to us at customerservice@daikinindia.com.
Follow us on: www.facebook.com/daikinindia www.twitter.com/daikinindia www.instagram.com/daikinindia in.company/daikin-airconditioning-india-pvt.-ltd. www.youtube.com/user/DaikinACIndia
Daikin adheres to E-waste Rules notified by MoEF. For more information on E-waste disposal and exchange policy please contact our Customer Service Centre.
Product image is for representation only. The above features mentioned may vary in different AC Models. #~Check www.daikinindia.com/terms-conditions for further T&C. *Figure mentioned is for FTKF35.
Source: TRA Research - Brand Trust Report 2026, based on syndicated consumer research across 16 cities in india.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# शहरातील शाळांची दहावी परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी

**सोलापूर दि. ८ मे-**

**महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावी परीक्षेत सोलापूर शहर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. यात मुलांचा ८७.९१ तर मुलींचा ९५.३२ असा सोलापूर जिल्ह्याचा एकूण निकाल ९१.३१ टक्के इतका लागला आहे.**

## दहावीतील गुणवंत शाळा...



## श्री मल्लिकार्जुन हायस्कूल ९३.८१टक्के; शाश्वती करंडे प्रथम

**सोलापूर, दि. ८ मे-**

इ. १० वी बोर्ड परीक्षेत श्री मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरे नगर, सोलापूरचा निकाल ९३.८१% लागला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थापक अप्पासाहेब हत्तुरे, संस्थेचे अध्यक्ष सिध्दप्पा वरनाळ, संस्थेचे सचिव नागप्पा सिंदगी, माजी प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे, मार्गदर्शक धरेप्पा हत्तुरे, विनायक हत्तुरे, प्र.मुख्याध्यापक रमेश दिंडोरे यांनी अभिनंदन केले. **प्रथम तीन विद्यार्थी** : शाश्वती सुनील करंडे ९२.८०%, दुर्गा संतोष सूर्यवंशी ९१.८०%, धनश्री सिद्धाराम येणगुरे ९१.४०%.



## गांधी नाथा रंगजी विद्यालय १०० टक्के; समर्थ वावरे प्रथम

**सोलापूर, दि. ८ मे-**

गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जन मंगल प्रतिष्ठान संचालित गांधी नाथा रंगजी विद्यालयाचा दहावी परीक्षेचा निकाल१०० टक्के लागला आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी, मुख्याध्यापिका स्मिता रणदिवे, सरोजना मुलिटी, दिपाली अनभुले रेखा बोदार्डे, वीरभद्र स्वामी, शिवानंद सुतार, मृणाली जैन, रूपाली लामकाने, भाग्यश्री बळे यांनी अभिनंदन केले.

**प्रथम तीन विद्यार्थी** : समर्थ यशवंत वावरे ९४:६०, सोहम सोमनाथ रासुरे ९२:२०, अमर शिरसागर ९२:००.



## सहस्रार्जुन इंग्रजी माध्यम १०० टक्के; अक्षरा पवार, स्नेहल कलशेट्टी प्रथम

**सोलापूर, दि. ८ मे-**

भवानी पेठ येथील सहस्रार्जुन शैक्षणिक संकुल अंतर्गत इयत्ता १० वी परीक्षेचा निकाल मराठी माध्यमाचा निकाल ९७ टक्के तर इंग्रजी माध्यमाचा निकाल १०० टक्के लागला आहे. या यशाबद्दल सहस्रार्जुन शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष राजुसा भुमकर, सो.स.क्षत्रिय समाज (विठ्ठल मंदिर)ट्रस्टचे अध्यक्ष संजीवसा बिद्री, सचिव जयकुमारसा कोल्हापुरे., शैक्षणिक संस्थेचे सचिव गजाननसा गोयल मुख्याध्यापक,शिक्षक व शिक्षकेतर यांनी अभिनंदन केले.

**प्रथम तीन विद्यार्थी** : मराठी माध्यम- अक्षरा संतोष पवार ९०%, मानसी नागेश पाटील ८९%, प्रगती नंदकुमार भोसले ८८.६०%. इंग्रजी माध्यम : स्नेहल सिद्राम कलशेट्टी ८६%, पायल लक्ष्मण जबडे ८४%, दर्शना महेश वीर ८४%, श्रेयश चंद्रकांत कुलकर्णी ८३.४०%.

## सरस्वती प्रशाला सेमी माध्यमचा १०० टक्के, श्रेयश पाटील प्रथम

**सोलापूर, दि. ८ मे-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील सरस्वती विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी फेब्रुवारी /मार्च २०२६ दहावीच्या परीक्षेचा ९२.८९ टक्के तर सेमी माध्यमाचा १०० टक्के निकाल लागला आहे. एकूण १६९ त्यापैकी १५७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष बसवणाप्पा मसुते, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, सचिव यशवंत लोंढे, प्रशालेचे प्राचार्य सुहास वडणे, पर्यवेक्षक महादेव मसुते, ज्येष्ठ संचालक मल्लिकार्जुन मसुते, अब्बास भाई पटेल, बाळासाहेब जगताप, गोरख माळी, संचालक नागनाथ मसुते, जितेंद्र माळी, महेश कुमार जगताप आदींनी अभिनंदन केले.

**प्रथम तीन विद्यार्थी** : पाटील श्रेयश हनुमंत (९१.८०%), पाटील गौरी प्रवीण (९१.८०%), सिद्धगणेश श्लोक काकाजी (९१.२०%) जाधव नयन विष्णू (९०.00%).

## एस. बी. विद्यालय व ज्यु. कॉलेज हिरज १०० टक्के

**सोलापूर, दि. ८ मे-**

हिरज येथील एस.बी. विद्यालय व ज्यु कॉलेजचा निकाल १०० टक्के लागला. मराठी माध्यमात प्रथम - पूजा गाडी ९३ टक्के, व्दितीय क्रमांक संतोष कापणे ९०.४० टक्के, तृतीय क्रमांक - सृष्टी गाडे ९० टक्के.सेमी इंग्रजी माध्यम प्रथम क्रमांक संस्कृती सुरवसे ७९.८० टक्के, व्दितीय - वैदेही लिंबाळे ७९ टक्के, अंकिता येजगर ७८.८० टक्के. इंग्रजी माध्यम - प्रथम क्रमांक - भाग्यश्री होळीकट्टी ९१.८० टक्के, व्दितीय क्रमांक पल्लवी सातलोल्लू व प्रशांत बंडा प्रत्येकी ८९.४० टक्के, तृतीय क्रमांक दीक्षा मच्छा ८९ टक्के. संस्थापक अशोक भांजे, मनीषा भांजे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## नृसिंह विद्यालय पाकणी १०० टक्के

**सोलापूर, दि. ८ मे-**

पाकणीच्या नृसिंह विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला. १०० टक्के निकालाचे हे अकरावे वर्ष आहे. परिक्षेला ३२ विद्यार्थी बसले होते. सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. श्रावणी भागवत शिंदे हिने ९३ टक्के गुण घेऊन प्रथम, सानिका नंदकुमार गरड हिने ९०.४० टक्के गुण घेऊन व्दितीय, प्रिती दत्तात्रय शिंदे हिने ८७.८० टक्के गुण घेऊ तृतीय क्रमांक पटकविला. संस्थेचे सचिव सुबोध शिंदे, मुख्याध्यापक कोकरे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



## नेताजी प्रशाला ९१.४८ टक्के, सृष्टी बोरामणी प्रथम

**सोलापूर दि. ८ मे-**

नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेचा दहावीचा ९१.४८ टक्के इतका निकाल लागला. १९ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य श्रेणी, ६० विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ७८ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर ५८ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार, सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुभाष धुमशेट्टी, विजयकुमार हुल्ले, प्राचार्य रविशंकर कुंभार, मुख्याध्यापक शिवानंद मेणसंगी, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, ज्येष्ठ शिक्षक राजकुमार मरगुरे, राजेंद्र मुलगे, काशिनाथ माळगोंडे, शितल पाटील, बसवराज तेग्गेळी, शिवानंद पुजारी, प्रशांत स्वामी, रेवणसिद्ध दसले आदींनी अभिनंदन केले.

**प्रथम तीन विद्यार्थी** :सृष्टी बोरामणी ८८.00, यशोदा पुजारी ८६.२०, संतोष खराडे ८५.६० टक्के.



## कुचन प्रशाला : अविनाश श्रीपुरम, देविका बत्तुल प्रथम

**सोलापूर, दि. ८ मे-**

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित, कुचन प्रशालेचा दहावी परीक्षेचा निकाल ९३.४९% तसेच तेलगू विभागाचा निकाल १००% लागला असून प्रशालेतील एकूण २९२ पैकी २७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यात २८ विद्यार्थी विशेष प्रविण्य मध्ये तर ८१ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. त्यांचे पद्मशाली शिक्षण संस्थेचे खजिनदार गोवर्धन कमटम व विश्वस्त श्रीधर चिट्याल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, उपाध्यक्ष श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम, शालेय समितीचे अध्यक्ष विजयकुमार गुल्लापल्ली, सर्व विश्वस्त तसेच प्राचार्य युवराज मेटे, उपप्राचार्य अनिल निंबाळकर, उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगु, प्रणिता सामल, मल्लिकार्जुन जोकारे व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

**प्रथम तीन विद्यार्थी** : अविनाश वेणू श्रीपुरम ८५.२०, देव्हारे प्रणिता श्रीनिवास ८४.00, मेरगू राम बालाजी ८३.८०.

**तेलगू विभाग** : देविका सिताराम बत्तुल ८८.६०, श्वेता कुमारस्वामी गत्तुक ८८.२०, लोहित गुरुमुर्ती जम्मूला ८१.६०.



## एस.व्ही.सी.एस.प्रशाला ९४.३७ टक्के, श्रेया गाजूल प्रथम

**सोलापूर, दि. ८ मे-**

एस.व्ही.सी.एस. हायस्कूल एमआयडीसी येथील दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल ९४.३७ टक्के लागला आहे. प्रशालेतील ३९१पैकी ३६९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. प्रशालेतील १४ विद्यार्थ्यांनी ९५ टक्के पेक्षा जास्त गुण मिळविले असून विशेष प्राविण्य श्रेणीत १५०,प्रथम श्रेणीत १०० व द्वितीय श्रेणीत ११९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्ण विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे काशी जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी, संचालक शशिकांत रामपुरे, मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे, उपमुख्याध्यापक धनंजय नकाते व पर्यवेक्षक केदार पटणे यांनी अभिनंदन केले.

प्रथम तीन विद्यार्थी : श्रेया गाजूल ९५.४० टक्के, सेजल पंडित ९३.00 अवंती केंदुळे ९२.२० टक्के.



## ज्ञान प्रबोधिनी प्रशाला १०० टक्के, कौस्तुभ कुलकर्णी प्रथम

**सोलापूर, दि. ८ मे-**

ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर प्रशालेचा निकाल १०० टक्के लागल आहे. ७२ विद्यार्थी प्रविष्ट होते. यात ९०% पेक्षा अधिक गुण १७ विद्यार्थी, ८० ते ८९% गुण २२ विद्यार्थी, ६० ते ७९% गुण ३१ विद्यार्थी, ६० पेक्षा कमी २ विद्यार्थी आहेत. प्रांजली प्रशांत शिरुरे व दिशा बसवराज धमगुंडे हिने संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण मिळविले आहेत. त्यांचे मुख्याध्यापिका प्रवीणा काळे, पर्यवेक्षिका उज्वला अलकुंटे व सर्व शिक्षकवृंद यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. **प्रथम तीन विद्यार्थी** : कौस्तुभ कुलकर्णी ९६.६०%, प्रांजली प्रशांत शिरुरे ९६.२०%, रिद्धी उमेश हेडगिरे ९५.८०%.



## पी. एस. टेक्निकल हायस्कूल १०० टक्के, भार्गवराम तमशेट्टी प्रथम

**सोलापूर, दि.८ मे-**

दहावीचा परीक्षेचा पी. एस. इंग्लिश मीडियम टेक्निकल शाळेचा निकाल सकला अकराव्या वर्षी १०० टक्के निकाल लागला आहे. त्यांचे श्राविका संस्थेचे सचिव यतीन शहा, विश्वस्त देवई शहा, करण शहा, विभाग प्रमुख प्राचार्य स्वाती कांबळे, पर्यवेक्षक जयेश शिरढोणे आदींनी अभिनंदन केले.

**प्रथम तीन विद्यार्थी** : भार्गवराम मल्लिनाथ तमशेट्टी ९७.४०%, कृतिका अशोक गायकवाड ९६.६०%, अनुष्का दशरथ मोरे ९५.६०%.

## स.हि.ने. प्रशाला ९८.१४ टक्के, सिद्धी कुलकर्णी प्रथम



**सोलापूर, दि. ८ मे-**

स.हि.ने. प्रशालेचा निकाल एस.एस.सी. परीक्षेचा निकाल ९८.१४ टक्के लागला.

परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांपैकी उच्च श्रेणीमध्ये १७, प्रथम श्रेणी मध्ये १३ व द्वितीय श्रेणीत १९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांचे सरस्वती मंदिर संस्थेचे अध्यक्ष ॲड. पांडुरंग देशमुख, सचिव रोहिणी तडवळकर, उपाध्यक्ष मकरंद जोशी, रेवती कुलकर्णी, सहसचिव दत्तात्रय कुलकर्णी, खजिनदार सुधीर देव, संस्थेचे सदस्य ॲड. रघुनाथ दामले, शरीष कुलकर्णी, प्रशांत बडवे, प्रिति चिलजवार, किरण वळसंगकर, शशिकांत जिड्डीमनी, मंजिरी अंत्रोळीकर, राहुल औरंगाबादकर, सुनील कुलकर्णी, किशोरजी चंडक, राजेंद्र गांधी, मुख्याध्यापिकानीता येरमाळकर,पर्यवेक्षक मुकुंद गिरी आणि मार्गदर्शक शिक्षकांचे आदी मान्यवरांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

**अंतिम तीन विद्यार्थी** : कुलकर्णी सिद्धी दामोदर (९३.00%), जाधव वेदांत विजय (८८.२०%), गायकवाड समर्थ सुहास (८७.८०%).

## कुमठे प्रशाला

**सोलापूर, दि. ८ मे-**

कुमठे प्रशालेत परिक्षेला १०६ विद्यार्थी बसले. यापैकी १०३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. प्रशालेचा निकाल ८१.७४ टक्के लागला. प्रथम - अनुराग आप्पासाहेब फुलारी ९१ टक्के, व्दितीय - अंकिता कृष्णा घोडके ९०.६० टक्के, तृतीय क्रमांक ऋतुजा दत्तात्रय जाधव ८९.६० टक्के यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष व सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीपराव माने, मुख्य विश्वस्त व नगरसेवक जयकुमार माने, विश्वस्त स्वाती माने, मुख्याध्यापक जयसिंग गायकवाड यांनी अभिनंदन केले.



## युनिक स्कूलमध्ये मैत्रेयी ब्याले प्रथम

**सोलापूर, दि. ८ मे-**

सोलापूर युनिक इंग्लिश मीडियम स्कूल येथील इयत्ता दहावीच्या परीक्षेत ९०%पेक्षा अधिक गुण एकूण ११विद्यार्थ्यांना मिळवले. ८०%मिळवलेले एकूण २२विद्यार्थी तसेच ७५%गुण प्राप्त केलेले एकूण २०विद्यार्थी आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे, मुख्याध्यापक पूजा बाजपेयी, शाळेच्या शैक्षणिक सल्लागार अंजली तिवारी व विश्वस्त भीमाशंकर शेटे आणि सदस्या डॉ शुभदा उपासे यांनी अभिनंदन केले. **प्रथम तीन विद्यार्थी** : मैत्रेयी ब्याले ९५.२०%, सिमरा शेख हिला ९५%, शर्वरी बनसोडे हिने ९४.८०.

## नालंदा माध्यमिक आश्रमशाळा भोगाव

नालंदा प्रशालेचा निकाल ९३.३३ टक्के लागला. प्रथम - मोहिनी धनराज जाधव ८७.४० टक्के, व्दितीय - यदाबाई महादेव पवार ८२.८० टक्के, तृतीय- शुभांगी शहाजी गंजे ७९ टक्के. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थापक सचिव राजाभाऊ सरवदे, मुख्याध्यापक महेशकुमार सरवदे यांनी अभिनंदन केले.

## महात्मा फुले हायस्कूल मार्डी

फुले प्रशालेचा निकाल ९३ टक्के लागला. प्रथम - राजनंदिनी गिरे - ९३.६० टक्के, व्दितीय श्रेया पवार ८७ टक्के, दिपाली कटरमल ८४ टक्के. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष अविनाश मार्तंडे, मुख्याध्यापक सुजितकुमार इनामदार, वर्गशिक्षक कमलाकर जाधव स्वप्नाली मार्तंडे यांनी अभिनंदन केले.

## उमाबाई श्राविका प्रशाला १०० टक्के, श्रवण मकरिये प्रथम



**सोलापूर, दि. ८ मे-**

उमाबाई श्राविका विद्यालयाचा दहावी बोर्ड परीक्षेचा १००% निकाल लागला आहे. प्रशालेतील ६ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळविले आहेत. २४ विद्यार्थ्यांनी ८० टक्के पेक्षा जास्त गुण तर ५८ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले. त्यांचे संस्थेचे विश्वस्त यतीन शहा, विश्वस्त. देवई शहा, विश्वस्त करण शहा, विश्वस्त अंजली शहा, डॉ.रोहिणी शहा, अतुल शहा, मार्गदर्शिका दीप्ती शहा, मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ, ज्येष्ठ शिक्षिका माधवी खोत, वर्गशिक्षिका सरस्वती शेटे, अभिनंदन उपाध्ये, अनंत बळ्ळे , सुहास छंचुरे, अभिजित पाटील, वैभव बारडकर आदींनी अभिनंदन केले

**प्रथम तीन विद्यार्थी याप्रमाणे**

श्रवण सजन मकरिये ९५ %, आदित्य अविनाश मुळकटकर ९३.४०%, आदित्य विक्रम होनपारखे ९१.२० %

सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शनिवार, ९ मे २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# ‘होर्मुझ’मध्ये संघर्ष भडकला

**अमेरिकी नौदलाच्या तीन जहाजांवर हल्ला** | **प्रत्युत्तरात इराणची पाच जहाजे उद्ध्वस्त** | **ओमान-यूएईवर क्षेपणास्त्रांचा मारा** | **तणावामुळे १५०० जहाजे, तेल टँकर अडकले**



♦ **दुबई, ८ मे**

होर्मुझ सामुद्रधुनीतील अमेरिकेच्या नाकाबंदीला विरोध करत इराणने अमेरिकी नौदलाच्या तीन जहाजांवर क्षेपणास्त्रांचा मारा केला. इराणचे हल्ले उधलून लावत अमेरिकन नौदलाने ओमानच्या आखातात इराणच्या अनेक जहाजांना लक्ष्य करत त्यांना उद्ध्वस्त केले. युद्धविरामातही नव्याने झालेल्या हल्ल्याने होर्मुझ जलमार्गात संघर्ष भडकला आहे.

होर्मुझ नाकाबंदीला विरोध करत इराणने अमेरिकन नौदलांवर हल्ले केले. अमेरिकेच्या प्रत्युत्तराने संतप्त झालेल्या इराणच्या इस्लामिक रिव्हाल्यूशनरी गार्ड कॉर्प्स अर्थात् आयआरजीसीने ओमान आणि संयुक्त अरब अमिराती (युएई) वर ड्रोन आणि क्षेपणास्त्राचा मारा केला. होर्मुझमधील तणावामुळे या जलमार्गात १५०० पेक्षा अधिक जहाजे व तेल टँकर अडकले आहे. अमेरिकेच्या हल्लात पाच जहाजांचे नुकसान झाल्याची पुष्टी इराणच्या वतीने करण्यात आली आहे. दुसरीकडे अमेरिकी लष्कराने दावा केला की, इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये अमेरिकी नौदलाच्या तीन जहाजांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला, परंतु अमेरिकी लष्कराने हे हल्ले रोखले. यूएस सेंट्रल कमांडच्या माहितीनुसार शुक्रवारी अमेरिकी नौदलाची युद्धनौका होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जात असताना इराणने त्यांच्यावर कोणत्याही कारणाशिवाय हल्ला केला. प्रत्युत्तरादाखल, अमेरिकी लष्कराने आत्मसंरक्षणासाठी इराणच्या जहाजांवर आणि लष्करी तळांवर कारवाई केली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले की, इराणकडून झालेल्या हल्ल्यानंतरही अमेरिकेच्या तीन युद्धनौका सुरक्षित असून, त्यांनी होर्मुझ सामुद्रधुनी सुरक्षित पार केला. (वृत्तसंस्था)

## इराणी नौका बुडविल्या : ट्रम्प



**नाकाबंदीसाठी तैनात करण्यात आलेल्या अमेरिकन युद्धनौका सुरक्षित आहे, हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इराणी हल्लेखोरांच्या अनेक नौका आणि जहाजे पूर्णपणे नष्ट करण्यात आली. इराण आपल्या कमकुवत नौदलाची जागा घेण्यासाठी वापरत असलेल्या अनेक लहान नौका होर्मुझच्या सागरात बुडवण्यात आल्या. अमेरिकेच्या युद्धनौकांवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोन डागण्यात आले, परंतु सैन्याने हवेतच सर्व हल्ले परतवून लावले. इराणकडे करार करण्यासाठी कमी वेळ शिल्लक आहे, त्यांनी अटी मान्य करण्यास उशिर केल्यास अमेरिकन सैन्य हल्ल्यासाठी सज्ज आहे.**

## जहाजांची वाहतूक पुन्हा थांबली

**इराणच्या सरकारी माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, केशम बेट परिसरात इराणी सैन्य आणि अमेरिकन नौदल यांच्यात गोळीबार झाला. दक्षिण इराणमधील बंदर अब्बास परिसरातही स्फोट झाले. तणावामुळे शेकडो व्यापारी जहाजे पर्शियन आखातात अडकली आहेत आणि जागतिक बाजारात तेलाच्या किमती झपाट्याने वाढत आहेत. अनेक देशांनी याला आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन म्हटले आहे.**

## युद्धविरामावर प्रश्नचिन्ह

**युएई आणि ओमानच्या परराष्ट्र मंत्रालयाने इराणच्या हल्ल्याची पुष्टी केली. त्यांनी म्हटले की, शुक्रवारी क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले हवाई संरक्षण प्रणालीद्वारे रोखण्यात आले आणि यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. अमेरिका आणि इराण यांच्यात ८ एप्रिल पासून तात्पुरती युद्धबंदी लागू असतानाही शुक्रवारी झालेल्या हल्ल्यामुळे युद्धविरामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले.**

# संसाधनांपासून भूगोलापर्यंत शस्त्रासारखा वापर सुरू

## होर्मुझ जलमार्ग तणावावर जयशंकर यांनी सुनावले

♦ **परमारिबो, ८ मे**

वित्त, तंत्रज्ञान, संसाधने आणि अगदी भूगोलाचाही आता सामरिक शस्त्र म्हणून वापर केला जात आहे. जागतिक सत्ता संतुलन बदलत आहे आणि जग पूर्वीपेक्षा अधिक अनिश्चित झाले आहे. प्रमुख शक्ती आता त्यांचे सामरिक हितसंबंध पुढे नेण्यासाठी बाजारपेठा, संसाधने आणि प्रभावाचा वापर करत आहेत, अशा शब्दात परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी जगातील बड्या देशांना सुनावले आहे.



दक्षिण अमेरिकेच्या उत्तरेकडील सुरीनाम देशाच्या दौऱ्यावर असलेल्या जयशंकर यांनी गुरुवारी सुरीनाम समाजाच्या विविध स्तरांतील प्रतिनिधींना एका कार्यक्रमात संबोधित केले. यावेळी होर्मुझ जलमार्गातील तणावावर भाष्य करताना ते म्हणाले, आज जगात वित्त, संसाधने, तंत्रज्ञान, कनेक्टिव्हिटी आणि अगदी भूगोलाचाही शस्त्र म्हणून वापर केला जात आहे. प्रमुख शक्ती आता त्यांचे सामरिक हितसंबंध पुढे नेण्यासाठी बाजारपेठा, संसाधने आणि प्रभावाचा वापर करत आहेत. जागतिक सत्ता संतुलन वेगाने बदलत आहे. एकेकाळी ऊर्जा आयातदार मानला जाणारा अमेरिका आता जगातील सर्वात मोठ्या ऊर्जा निर्यातदारांपैकी एक बनला आहे, ज्याचा जागतिक धोरणांवर महत्त्वपूर्ण परिणाम झाला आहे. जग एका नव्या युगात प्रवेश करत आहे, जिथे जोखीम पत्करण्याचे प्रमाण वाढले आहे आणि अनिश्चितता पूर्वीपेक्षा अधिक आहे. (वृत्तसंस्था)

### बदलत्या व्यवस्थेत भागीदारी महत्त्वाची


**भारत आणि सुरीनामसारख्या देशांना अधिक सर्वसमावेशक आणि संतुलित जागतिक व्यवस्था पाहायची आहे. बदलत्या जागतिक व्यवस्थेत विश्वासार्ह भागीदारी आणि जागतिक सहकार्याची भूमिका पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाची झाली आहे. कोरोना महामारीचा संदर्भ देत जयशंकर म्हणाले, त्यावेळी अनेक देशांनी लसींचा साठा केला होता. कोणत्याही देशाचे नाव न घेता ते म्हणाले की, एका विकसित देशाने आपल्या लोकसंख्येच्या आठपट लसींचा साठा केला होता. याउलट, भारताने आपली जागतिक जबाबदारी पार पाडत मोठ्या संख्येने लसी पुरवल्या.**

### भारत जगातील सर्वात वेगवान अर्थव्यवस्था

**एका चांगल्या भागीदाराचे वैशिष्ट्य म्हणजे, तो आपल्या राष्ट्रीय हिताचा आणि जागतिक कल्याणाचा समतोल साधतो. भारताने कोरोना महामारीच्या काळात हाच दृष्टिकोन स्वीकारला. आगामी काळात जागतिक आर्थिक विकासात भारताचे योगदान १७ टक्के असेल. भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी मोठी अर्थव्यवस्था आहे आणि जागतिक विकासाला गती देण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. आयएमएफच्या आकडेवारीचा हवाला देत ते म्हणाले की, २०२६ मध्ये वास्तविक जागतिक जीडीपी वाढीमध्ये भारताचे सर्वाधिक योगदान अपेक्षित आहे.**

## चित्रपट वार्ता

### ‘बंदर’ चित्रपटाचा टीझर प्रदर्शित




**मुंबई** : बॉबी देओलच्या आगामी ‘बंदर’ चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला. १ मिनिट २९ सेकंदांच्या टीझरमध्ये बॉबी देओल समर नावाच्या एका अभिनेत्याच्या भूमिकेत दिसतो आहे. तो आपली ओळख गमावत असून त्याचे आयुष्य एका केसमुळे कायमचे बदलून जाते. या चित्रपटाचे दिग्दर्शन अनुराग कश्यपने केले आहे. हा बॉबी आणि अनुरागचा पहिला चित्रपट आहे. चित्रपटात बॉबी देओल, सपना पब्बी, सबा आझाद यांच्याशिवाय सान्या मल्होत्रा, राज बी शेट्टी आणि रिद्धी सेन यांसारखे कलाकारही आहेत. ‘बंदर’ हा चित्रपट भारतात घडलेल्या एका वास्तविक घटनेवर आधारित आहे. चित्रपटाचे लेखन सुदीप शर्मा आणि अभिषेक बॅनर्जी यांनी एकत्र केले आहे. निखिल द्विवेदी यांच्या सॅफ्रन मॅजिकवर्क्सच्या निर्मितीखाली तयार झालेला हा चित्रपट झी स्टुडिओजच्या सहकार्याने ५ जून २०२६ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होईल.

### ‘धुरंधर’चा येणार तिसरा भाग

**मुंबई** : ‘धुरंधर’ आणि ‘धुरंधर: द रिव्हेंज’च्या यशानंतर, दिग्दर्शक आदित्य धर आता त्यांच्या पुढच्या मोठ्या चित्रपटाच्या तयारीत आहेत. चित्रपटाच्या सह-निर्मात्या ज्योती देशपांडे यांनी या वर्षाच्या शेवटी चाहत्यांना एक मोठे सरप्राईज मिळणार असल्याचे सांगितले. ‘धुरंधर’चा प्रवास अजून संपलेला नाही. आम्ही अजून धुरंधरसोबत थांबलो नाही. या वर्षाच्या शेवटी प्रेक्षकांसाठी आमच्याकडे एक सरप्राईज असेल अशी आशा आहे. आम्ही काहीतरी नवीन योजना करत आहोत, असे जिओ स्टुडिओजच्या ज्योती देशपांडे यांनी एका मुलाखतीत सांगितले. आदित्य धर यांच्याकडे सध्या तीन मोठ्या स्तरावरील प्रकल्प आहेत. यामध्ये ‘द इमोर्टल अश्वत्थामा’ आणि एक हाय-व्होल्टेज स्पोर्ट्स ड्रामा यांचा समावेश आहे.

### ‘देऊळ बंद २’चा टीझर प्रदर्शित




**अक्कलकोट** : २०१५ मध्ये बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालणाऱ्या ‘देऊळ बंद’ या चित्रपटाचा दुसरा भाग तब्बल ११ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. नुकताच या चित्रपटाचा टीझर अक्कलकोट येथील स्वामी समर्थांच्या मंदिरात प्रदर्शित करण्यात आला. या सोहळ्याला प्रवीण तरडे यांच्यासह चित्रपटातील सर्व कलाकार उपस्थित होते. ‘देऊळ बंद २’ मध्ये स्वामी एका गरीब महिलेच्या साध्या दुचाकीवरून प्रवास करताना दिसणार आहेत. एका सामान्य कुटुंबाची ही असामान्य गोष्ट मांडणारा हा चित्रपट २१ मे रोजी प्रदर्शित होणार असून, नुकताच अक्कलकोट येथील स्वामी समर्थ मंदिरात या चित्रपटाचा टिझर सोहळा मोठ्या जल्लोषात पार पडला.

## १२ आंतरराज्यीय तस्करांना अटक

♦ **अलीगढ, ८ मे**

अवैध गावठी शस्त्रांच्या तस्करीमध्ये कथितरित्या सामील असलेल्या एका आंतरराज्यीय टोळीच्या बारा सदस्यांना अलीगढच्या बाहेरील एका जुन्या किल्ल्याच्या अवशेषांमधून अटक करण्यात आली, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

आरोपींची गुन्हेगारी पृष्ठभूमी होती आणि त्यांनी उत्तर प्रदेश व शेजारील राज्यांमधील विविध भागांतील ग्राहकांना अवैध शस्त्रे पुरवण्यासाठी एक जाळे विकसित केले होते, असे वरिष्ठ पोलिस अधीक्षकांनी सांगितले. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून वेगवेगळ्या कॅलिबरची १० गावठी शस्त्रे आणि मोठ्या प्रमाणात काडतुसे जप्त केली, असे वरिष्ठ पोलिस अधीक्षकांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# केरळमध्ये मुख्यमंत्रिपदाचा पेच

## खडगेंकडे सोपविणार अहवाल, दिल्लीत होणार निर्णय

♦ **तिरुवनंतपुरम, ८ मे**

केरळ विधानसभा निवडणुकीत काँग्रेस आघाडीला स्पष्ट बहुमत मिळाले असले तरी मुख्यमंत्रिपदावरुन पक्षात पेच निर्माण झाला आहे. मुख्यमंत्रिपदासाठी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व्ही. डी. सतीशन, के. सी. वेणुगोपाल आणि रमेश चेन्नीथला इच्छूक आहेत. या नेत्यांच्या समर्थनार्थ त्यांचे समर्थक रस्त्यावर आणि सोशल मीडियावर उघडपणे पाठींबा दर्शवत आहेत. दरम्यान, तिन्ही नेत्यांनी मुख्यमंत्रिपदासाठी दावा केल्यामुळे पक्षश्रेष्ठींपुढे पेच निर्माण झाला आहे. अशात केरळच्या पुढील मुख्यमंत्र्यांची निवड करण्याची जबाबदारी आता काँग्रेसच्या सर्वोच्च नेतृत्वाकडे सोपवण्यात आली आहे.

एआयसीसीचे निरीक्षक मुकुल वासनिक आणि अजय माकन गुरुवारी काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या (सीएलपी) बैठकीला उपस्थित राहण्यासाठी आणि पक्षाच्या ६३ आमदारांशी स्वतंत्र चर्चा करण्यासाठी दाखल झाले असतानाच, तिरुवनंतपुरममधील इंदिरा भवनजवळ खासदार के. सी. वेणुगोपाल यांच्या समर्थनार्थ सहा मोठे फ्लेक्स बोर्ड लावण्यात आले. वेणुगोपाल यांनी केरळ विधानसभा निवडणूक लढवली नव्हती. तिरुवनंतपुरममध्ये गुरुवारी वेणुगोपाल यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या एका फ्लेक्स बोर्डवर ग्रीस ऑइल फेकल्याचा आरोप आहे.

राज्याच्या अनेक भागांमध्ये व्ही. डी. सतीशन यांच्या समर्थनार्थ निदर्शने करण्यात आली. याव्यतिरिक्त, कन्नूर जिल्ह्यातील अलाप्पुझा आणि इरिकूर येथे वेणुगोपाल यांच्या विरोधात आणि सतीशन यांच्या समर्थनार्थ पोस्टर्स लावण्यात आले. तथापि, पक्षाच्या नेत्यांनी या संदर्भात कोणतेही थेट विधान केलेले नाही. त्याऐवजी, सोशल मीडिया पोस्ट्स आणि माध्यमांशी संवाद साधून अप्रत्यक्ष संकेत दिले जात आहेत. (वृत्तसंस्था)



रमेश चेन्नीथला



व्ही.डी. सतीशन्



के.सी. वेणुगोपाल

### पक्षनेता निवडण्याचा अधिकार अध्यक्षांना

**नवनिर्वाचित आमदारांच्या गटाने एक ठराव मंजूर केला आहे, ज्यानुसार विधानसभा पक्षाचा नेता निवडण्याचा अधिकार अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षांना देण्यात आला आहे. अध्यक्षच मुख्यमंत्रिपदाबाबतचा निर्णय घेतील. परिणामी, ही तिरंगी लढत आता नवी दिल्ली आणि पक्षाच्या मुख्यालयात पोहोचण्याची शक्यता आहे.**

### दिल्लीतच होणार घोषणा

**निरीक्षक शुक्रवारी आपला अहवाल अखिल भारतीय काँग्रेस समितीला सादर करतील अशी, अपेक्षा आहे. यानंतर, अंतिम चर्चेसाठी केरळच्या नेत्यांना पक्षाच्या मुख्यालयात बोलावले जाऊ शकते, ज्यानंतर मुख्यमंत्रीपदाच्या उमेदवाराची घोषणा केली जाईल. संयुक्त लोकशाही आघाडीचे बहुतेक मित्रपक्ष व्ही. डी. सतीशन यांच्या बाजूने असले तरी, त्यांनीही या प्रकरणी कोणतेही सार्वजनिक विधान केलेले नाही.**

# बंगालच्या सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये गस्त

## चंद्रनाथ रथचे मारेकरी बांगलादेशात पळून जाण्याची शक्यता

♦ **कोलकाता, ८ मे**

भाजपा नेते सुवेंदू अधिकारी यांच्या निकटवर्तीयाच्या हत्येमध्ये शेजारील राज्यांतील व्यावसायिक नेमबाजांचा सहभाग असल्याचा तपास अधिकाऱ्यांना संशय असल्याने, पश्चिम बंगालच्या सीमावर्ती जिल्ह्यांमधील पोलिस ठाण्यांनी पाळत आणि शोधमोहीम तीव्र केली आहे, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने शुक्रवारी सांगितले.

हल्ला करणाऱ्यांना रसद पुरवणाऱ्या स्थानिक गुन्हेगारांच्या भूमिकेचाही पोलीस तपास करत आहेत, असेही ते म्हणाले. उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील मध्यमग्राम येथे मोटारसायकलवरून आलेल्या बंदूकधाऱ्यांनी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक चंद्रनाथ रथ यांची हत्या केल्यानंतर ३६ तासांहून अधिक काळ लोटला तरी, पोलिसांनी अद्याप कोणालाही अटक केलेली नाही. सखोल तपास सुरू आहे. ज्या पद्धतीने हा हल्ला करण्यात आला, त्यावरून व्यापक टेहळणी आणि राज्याबाहेरील भाडोत्री नेमबाजांचा संभाव्य सहभाग असल्याचे सूचित होते, असे एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. सीमावर्ती जिल्ह्यांमधील सर्व पोलिस ठाण्यांना सतर्क करण्यात आले आहे. अनेक ठिकाणी तपासणी केली जात आहे आणि जेस्सोर रोडजवळील परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची कसून तपासणी केली जात आहे, असे आणखी एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

**स्थानिकांनी मदत केल्याची शक्यता**

तपासातील निष्कर्षांनुसार, बंदूकधाऱ्यांनी हल्ला करण्यापूर्वी रथ यांच्या वाहनाचा पाठलाग केला होता. बंदूकधाऱ्यांच्या पळून जाण्याच्या मार्गावरून ते त्या परिसराशी परिचित होते किंवा स्थानिक गुन्हेगारांनी त्यांना मदत केली असावी, असे सूचित होते. स्थानिक मदतीशिवाय, गल्ल्यांमधून इतक्या वेगाने पळून जाणे कठीण झाले असते, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. (वृत्तसंस्था)

## परराष्ट्र सचिव मिस्रींनी दिली यूएईला भेट

♦ **नवी दिल्ली, ८ मे**

परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी गुरुवारी संयुक्त अरब अमिरातीचा दौरा केला आणि राज्यमंत्री रीम अल हाशिमी यांच्यासोबत पश्चिम आशियातील सद्यस्थितीवर चर्चा केली.



परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, दोन्ही बाजूंनी व्यापार, गुंतवणूक, आर्थिक सहकार्य, ऊर्जा, कनेक्टिव्हिटी, संरक्षण आणि सुरक्षा, फिनटेक, आरोग्य, शिक्षण, संस्कृती आणि लोकांमधील संबंध या क्षेत्रांमधील सुरू असलेल्या द्विपक्षीय सहकार्याचा आढावा घेतला. हाशिमी या भारतासाठी संयुक्त अरब अमिरातच्या विशेष दूत देखील आहेत. यावर्षी संयुक्त अरब अमिरातचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायद अल नाहयान आणि अबू धाबीचे युवराज शेख खालिद बिन मोहम्मद बिन झायद अल नाहयान यांनी भारत दौऱ्यादरम्यान घेतलेल्या निर्णयांवर झालेल्या प्रगतीचे मिस्री आणि हाशिमी यांनी सकारात्मक मूल्यांकन केले, असे परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले. (वृत्तसंस्था)

# शिक्षक भरती मागणीसाठी उमेदवारांचे आंदोलन

## पाटण्यात पोलिसांचा तरुणाईवर लाठीचार्ज



♦ **पाटणा, ८ मे**

बिहारमध्ये नवीन मंत्रिमंडळाचा शपथविधीच्या काही तासातच हजारो विद्यार्थी राजधानी पाटणा येथे शिक्षक भरतीची मागणी आणि भरतीतील त्रूटी दूर करण्याच्या मागणीसाठी रस्त्यावर उतरले. यावेळी आंदोलन करणाऱ्या तरुणांवर पोलिसांनी लाठीचार्ज केला.

शिक्षक भरतीच्या चौथ्या टप्प्याची जाहिरात तत्काळ काढावी, या मागणीसाठी हजारो उमेदवार रस्त्यावर उतरले. आंदोलन तीव्र होताच पोलिसांनी आंदोलकांवर लाठीमार केला, ज्यामध्ये अनेक विद्यार्थी जखमी झाले. विद्यार्थी नेता दिलीप कुमार यांच्या नेतृत्वाखाली १० हजारहून अधिक उमेदवार पाटणा कॉलेजपासून डाकबंगला चौकापर्यंत धडकले. सरकार केवळ टीआरई-३ ची प्रक्रिया राबविण्याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप उमेदवारांनी केला. त्यांनी नवीन भरतीची जाहिरात तत्काळ काढण्याची तसेच, सरकारने रिक्त जागांची नेमकी संख्या जाहीर करावी आणि जाहिरातीची अंतिम तारीख स्पष्ट करावी अशी मागणी केली. शिक्षक भरतीत बिहारमधील स्थानिक युवकांना प्राधान्य देण्यासाठी डोमिसाइल नीती कडकपणे लागू करावी असेही त्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# 'डबल इंजिन'ची पुढची दिशा

बिहार हे देशातील अनेक राज्यांपैकी एक राज्य असले, तरी देशाच्या राजकारणात त्याचे आगळेवेगळे महत्त्व आहे. स्वातंत्र्य आंदोलनात या राज्याचे अनन्यसाधारण असे योगदान होते. दुसऱ्या स्वातंत्र्य आंदोलनात म्हणजे आणिबाणीविरोधी लढ्याचे नेतृत्व या राज्याने केले होते. लोकनायक जयप्रकाश नारायण यांनी संपूर्ण क्रांतीची हाक बिहारमधूनच दिली होती. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना सत्तेवरून घालवण्यात या राज्याचे मोठे योगदान होते. मधली काही वर्षे बिहार हे चारा घोटाळा फेम लालूप्रसाद यादव आणि त्यांच्या पत्नी राबडीदेवी यांच्यामुळे देशात ओळखले जात होते; दुसऱ्या शब्दात सांगायचे तर बदनाम झाले होते. त्यानंतर गेली दोन दशके बिहार जदयुचे सर्वेसर्वा आणि बिहारचे मुख्यमंत्रिपद दीर्घकाळ भूषविणाऱ्या नितीशकुमार यांच्यामुळे ओळखले जात होते. भाजपाचे सम्राट चौधरी आता बिहारचे नवे मुख्यमंत्री आहेत. बिहारमध्ये भाजपा हा पक्ष दीर्घकाळापासून आघाडीच्या राजकारणात सत्तेवर होता, पण त्याला मुख्यमंत्रिपद कधी मिळाले नाही. नेहमी उपमुख्यमंत्रिपदावरच समाधान मानावे लागले. बिहारचे असलेले नितीन नवीन भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाल्यानंतर भाजपाचा मुख्यमंत्री बिहारमध्ये सत्तारूढ झाला. मुख्यमंत्रिपदाची दहाव्यांदा शपथ घेतल्यानंतर सहा महिन्यातच नितीशकुमार यांनी अचानक राजीनामा दिला आणि कोणाला काही कळायच्या आत राज्यात भाजपाच्या मुख्यमंत्र्याचा शपथविधी झाला. सम्राट चौधरी यांच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ पडली. नितीशकुमार यांच्या मंत्रिमंडळात भाजपाचे दोन उपमुख्यमंत्री असायचे. आता सम्राट चौधरी यांच्या मंत्रिमंडळात जदयुच्या दोन नेत्यांचा उपमुख्यमंत्री म्हणून समावेश झाला.

भाजपाच्या सम्राट चौधरी मंत्रिमंडळाचा गुरुवारी विस्तार झाला. ३२ जणांचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला. यात मुख्यमंत्री धरून भाजपाच्या १६ मंत्र्यांचा समावेश आहे. जदयुच्या वाट्यालाही १६ मंत्रिपदे आली. यात दोन उपमुख्यमंत्री आणि १३ मंत्र्यांचा समावेश आहे. जदयुने आपल्या कोट्यातील एक मंत्रिपद रिकामे ठेवले आहे. लोजपा रामविलास पासवान गटाच्या दोघांचा तर जितनराम मांझी यांच्या हिंदुस्थान अवाम मोर्चाच्या आणि उपेंद्र कुशवाह यांच्या राष्ट्रीय लोकतांत्रिक मोर्चाच्या एकाचा मंत्रिमंडळात समावेश झाला आहे. मंत्रिमंडळ विस्ताराच्या या समारंभाला पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथसिंह, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन आणि आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा प्रामुख्याने उपस्थित होते. मंत्रिमंडळ विस्ताराच्या कार्यक्रमाला पंतप्रधानांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे हे बिहारचे भाजपाच्या दृष्टीने असलेले राजकीय महत्त्व दर्शवणारे आहे. २०१४ च्या आधी सामान्यपणे मुख्यमंत्र्यांचा शपथविधी राजभवनात होत असे. काही अपवादात्मक शपथविधीच बाहेर होत होते. आता काळ बदलला आहे. राजभवनचे लोकभवन झाले आहे. आता मुख्यमंत्र्यांचा शपथविधी खुल्या मैदानात व्हायला लागला. कोणत्याही राज्याच्या मुख्यमंत्र्याच्या शपथविधीकडे राजकीय शक्तिप्रदर्शन म्हणून पाहिले जाऊ लागले. पंतप्रधानांपासून बहुतांश केंद्रीय मंत्री, भाजपाशासित राज्यांचे मुख्यमंत्री आणि मित्रपक्षांच्या मुख्यमंत्र्यांनाही या समारंभासाठी आमंत्रित केले जाऊ लागले. शपथविधी समारंभाला राजकीय दिवाळीचे स्वरूप दिले जाऊ लागले. नितीशकुमार मुख्यमंत्रिपदावरून पायउतार झाल्यानंतर सम्राट चौधरी यांच्या शपथविधी समारंभाला पंतप्रधान उपस्थित नव्हते; त्याची कसर त्यांनी मंत्रिमंडळ विस्ताराच्या कार्यक्रमाला उपस्थित राहून भरून काढली, असे म्हणायला हरकत नाही. बिहारच्या मंत्रिमंडळ विस्ताराचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात राज्याच्या तीन माजी मुख्यमंत्र्यांच्या तीन मुलांचा समावेश झाला आहे. नितीशकुमार यांचा मुलगा निशांतकुमार, जितनराम मांझी यांचा मुलगा संतोषकुमार सुमन आणि जगन्नाथ मिश्र यांचे पुत्र नितीश मिश्र यांचा मंत्रिमंडळात समावेश झाला आहे. यातील सर्वात लक्षवेधी समावेश हा नितीशकुमार यांचे पुत्र निशांतकुमार यांचा म्हणायला पाहिजे. नितीशकुमार दोन दशके बिहारचे मुख्यमंत्री असताना निशांतकुमार राजकारणात नव्हते. ते राजकारणापासून दूर होते.

लालूप्रसादांच्या कार्यकाळात बिहारमध्ये गुंडाराज होते. तेथे कायद्याचे राज्य नव्हते, तर जंगलराज होते. त्या राज्यात कोणीच सुरक्षित नव्हते. एक काळ होता की, बाहेरच्या लोकांना बिहारमध्ये जायचीही भीती वाटायची. नितीशकुमार यांनी बिहारची गुंडाराज आणि जंगलराजमधून सुटका केली. राज्यात कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित केली. बिमारू राज्याच्या श्रेणीतून बिहारला बाहेर काढण्याचे काम नितीशकुमार यांनी केले, हे मान्य करावेच लागेल. नितीशकुमार यांच्या आधीचा बिहार आणि नितीशकुमार यांच्या काळातील बिहार यात जमीन-अस्मानचा फरक आहे. बिहार हे त्याच्या घराणेशाहीच्या राजकारणासाठी ओळखले जाते. लालूप्रसाद यादवांचे अख्खे कुटुंबच राजकारणात आहे. पत्नी राबडीदेवी मुख्यमंत्री होत्या. तेजस्वी यादव आणि तेजप्रताप यादव ही दोन मुले बिहारच्या मंत्रिमंडळात होती. तेजस्वी तर उपमुख्यमंत्री होते. केंद्रात मंत्री असलेले चिराग पासवान हे रामविलास पासवान यांचे चिरंजीव आहेत, तर संतोषकुमार सुमन हे जितनराम मांझी यांचे. हे दोघेही प्रदीर्घ काळापासून राजकारणात आहेत. अशा परिस्थितीत नितीशकुमार यांचा मुलगा निशांतकुमारने राजकारणापासून दूर राहणे हे आश्चर्य होते. घराणेशाहीच्या राजकारणाला असलेल्या नितीशकुमार यांच्या विरोधांची यावरून आपण कल्पना करू शकतो. निशांतकुमार यांनी राजकारणात यावे, असा आग्रह जदयुच्या नेत्यांनी अनेक वेळा धरला होता; मात्र तो नितीशकुमार यांनी मान्य केला नाही. आता बदलत्या राजकीय परिस्थितीत निशांतकुमार यांना राजकारणात यावे लागले. पण त्यातही नितीशकुमार यांनी आपल्याला राज्याच्या राजकारणापासून दूर केल्यानंतर निशांतकुमार यांचा राज्याच्या राजकारणात समावेश झाला आहे. मनात आणले असते तर निशांतकुमार यांना उपमुख्यमंत्री होणे फारसे कठीण नव्हते; पण त्यांनी मंत्रिपदापासून राजकीय कारकीर्दीला सुरुवात करायचे ठरवले. असे असले तरी सम्राट चौधरी यांच्या मंत्रिमंडळ विस्तारावर घराणेशाहीची छाप असल्याचा आरोप करणे हे घाईचे होईल. कारण आज घराणेशाही हा राजकारणाचा अपरिहार्य भाग झाला आहे. आज आपण कोणत्याही राज्याच्या राजकारणाचा घराणेशाहीशिवाय विचार करू शकत नाही. राजकारणात घराणेशाही अपरिहार्य झाली आहे. कारण तिची व्याख्या काळाच्या ओघात बदलली आहे. घराणेशाही ही प्रत्येक वेळी वाईटच असते असे नाही; कधी कधी तिचा सकारात्मक परिणामही दिसून येत असतो. तसा तो दिसला तर या विस्ताराचा उपयोग.मंत्रिमंडळ विस्तारानंतर मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्यासमोर बेरोजगारी दूर करण्याचे आणि राज्याचा औद्योगिक विकास करण्याचे मोठे आव्हान आहे. औद्योगिक विकास झाल्यावर बेरोजगारीची समस्या आपोआप कमी होणार आहे. नितीशकुमारांनी बिहारमध्ये कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित केली असली, राज्यातील पायाभूत सुविधांचा विकास झाला असला, तरी राज्याचा अपेक्षित औद्योगिक विकास झाला नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे आजही राज्यात रोजगार मिळत नसल्यामुळे बेरोजगार तरुणांचे तांडेच्या तांडे बाहेर जात आहेत. यातून बाहेरच्या राज्यात नवे प्रश्नही निर्माण होत आहेत, हा भाग वेगळा. राज्यातील तरुणांना राज्यातच रोजगार मिळेल, अशी व्यवस्था सम्राट चौधरी यांना उभी करावी लागणार आहे. बिहारमध्ये आता डबल इंजिन सरकार आहे. या डबल इंजिनचा फायदा घेत बिहारला वेगाने प्रगतीच्या वाटेवर नेण्याचे आव्हान चौधरी यांना पेलावे लागणार आहे. चौधरी यांच्यात ती क्षमता आहे, हे नक्की. महत्त्वाचे म्हणजे केंद्रातील मोदी सरकार या कामात भक्कमपणे त्यांच्या पाठीशी उभे राहील, यात शंका नाही. त्यांनी आपल्या मंत्रिमंडळात जातीच्या संतुलनाचा नाही तर मंत्र्यांमधील क्षमतेचा आणि गुणवत्तेचा विचार केला आहे. त्यामुळे आपल्या मंत्रिमंडळ विस्ताराचा उपयोग चौधरी यांनी बिहारच्या विकासासाठी करून घेतला पाहिजे. बिहारबाबत जे गैरसमज बाहेरच्या राज्यात आहेत, ते आपल्या कामाने दूर केले पाहिजे.

## यंगिस्तान

# कम्युनिझम मुक्त लोकशाही?

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

आज भारताच्या राजकीय पटलावर एक ऐतिहासिक पर्व सुरू झाले आहे. एकेकाळी देशाच्या काही भागांवर आपली पकड मजबूत ठेवणारे कम्युनिस्ट एकाही राज्याच्या सत्तेवर नाहीत. केरळमध्ये शेवटची कम्युनिस्ट सत्ताही इतिहासजमा झाली आहे. तिथे भारतीय मूल्यांचा अपमान करणाऱ्या काँग्रेसचा विजय झाला असला, तरी भारतीय मूल्ये व लोकशाही न मानणाऱ्या कम्युनिस्ट पक्षाचा पराभव झाला. अशा वेळी कम्युनिस्टांनी पेरलेल्या हिंसेची, दगाबाजीची आणि लोकशाहीविरोधी कारवायांची पृष्ठभूमी समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. कम्युनिझम हा एक असा विचार आहे, ज्याने जगभरात क्रांतीच्या नावाखाली कोट्यवधी लोकांचे बळी घेतले. कार्ल मार्क्सने मांडलेला हा सिद्धांत सुरुवातीला शोषितांच्या मुक्तीचा मुखवटा घालून आला; प्रत्यक्षात या विचाराने हुकूमशाही, दमन आणि मानवी हक्कांचे हनन केले. भारतात कम्युनिझमचा प्रवेश स्वातंत्र्यापूर्वी झाला. सुरुवातीला ब्रिटिशविरोधी आंदोलनात सहभागी झाल्याचे भासवण्यात आले किंवा खरोखरच इथल्या तरुणांनी कम्युनिझमचा वापर इंग्रजांच्या विरुद्ध केला. हा नवा विचार होता आणि तरुणांना नवा विचार आकर्षित करतो. पण या कम्युनिस्टांच्या आकांचे खरे उद्दिष्ट नेहमीच भारताच्या मूळ संस्कृती आणि राष्ट्रीयत्वाला सुरुंग लावण्याचे राहिले आहे. केरळ आणि पश्चिम बंगालसारख्या राज्यांमध्ये त्यांनी सत्ता मिळविली; तिथेही त्यांनी आपल्या विचारधारेनुसार विरोधकांना दडपशाहीने चिरडण्याचा प्रयत्न केला.

कम्युनिस्ट विचारधारेचे सर्वात क्रूर आणि हिंसक रूप म्हणजे नक्षलवाद. माओवादी विचारसरणीतून जन्माला आलेला हा नक्षलवाद भारताच्या आदिवासीबहुल आणि दुर्गम भागांमध्ये पसरला. शोषितांना न्याय देण्याच्या नावाखाली त्यांनी आदिवासींना आणि सामान्य लोकांना आपल्या हिंसक कारवायांमध्ये ओढले. त्यांच्या हाती शस्त्रे दिली, त्यांच्या मनात सरकारविरोधात द्वेष पेरला आणि त्यांना लोकशाही व्यवस्थेपासून दूर केले. नक्षलवाद्यांनी अनेक निष्पाप लोकांची हत्या केली, सरकारी मालमत्तेची नासधूस केली. त्यांनी आदिवासींच्या जमिनी बळकावल्या, त्यांच्या मुला-मुलींना जबरदस्तीने आपल्या संघटनेत सामील केले आणि त्यांना मानवतेच्या अधिकारांपासून वंचित ठेवले. जंगली नक्षलवादाने भारताच्या लोकशाहीचे कंबरडे मोडण्याचा प्रयत्न केला, पण सरकारने कठोर पावले उचलून या हिंसक चळवळीचा चांगलाच निकाल लावला आहे. आज नक्षलवादाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे, पण त्याचे अवशेष अजूनही काही ठिकाणी शिल्लक आहेत. जंगली नक्षलवादाचा बीमोड होत असतानाच कम्युनिस्टांनी आपले डावपेच बदलले आहेत. आता ते शहरी नक्षलवाद आणि सांस्कृतिक मार्क्सवादाच्या माध्यमातून लोकशाहीला पोखरण्याचा प्रयत्न करीत आहेत. शहरी नक्षलवाद म्हणजे थेट शस्त्रे न वापरता, बौद्धिक आणि सामाजिक स्तरावर देशाच्या मूळ विचारधारेला, संस्कृतीला आणि संस्थांना कमजोर करणे. हे लोक विद्यापीठांमध्ये, माध्यमांमध्ये, स्वयंसेवी संस्थांमध्ये आणि कला क्षेत्रात घुसून आपली विषारी विचारधारा पसरवत आहेत. सध्या प्रांतवाद हे त्यांचे शस्त्र बनले आहे. महाराष्ट्रातही प्रांतवादाच्या नावाने कम्युनिज्म पुन्हा एकदा डोके वर काढत आहे. त्यांचे चेहरे गोड गोंडस, सुशिक्षित वाटत असले तरी त्यांचा मूळ उद्देश भारताला आतून कमजोर करून अराजकता निर्माण करणे हाच आहे. शहरी नक्षलवादाचेच एक रूप म्हणजे 'सांस्कृतिक मार्क्सवाद' आणि 'वोकवाद.' हे दोन्ही विचार समाजाच्या पारंपरिक मूल्यांवर, कुटुंब संस्थेवर, धर्मावर आणि राष्ट्रावर हल्ला करतात. ते लैंगिक समानता, सामाजिक न्याय आणि मानवाधिकार यांसारख्या उदात्त संकल्पनांचा वापर करून समाजाला विभाजित करतात. २०२१ मध्ये अमेरिकेत झालेल्या 'जागतिक हिंदुत्वाचे विघटन' आणि २०२४ मध्ये बंगळुरू येथील अझीम प्रेमजी विद्यापीठात झालेल्या 'हिंदुत्वाचा नायनाट' यांसारख्या परिषदा याच सांस्कृतिक मार्क्सवादाची उदाहरणे आहेत. या परिषदांमधून एका विशिष्ट धर्माला आणि संस्कृतीला लक्ष्य करून समाजात द्वेष आणि गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न केला जातो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यांत ५७ टक्के मुसलमान होते. ते बेंबीच्या देठापासून सांगतात, ज्या काळी युरोपलाही सेक्युलरिझम माहीत नव्हता त्या काळी महाराज सेक्युलर होते, असा खोटा प्रचार करतात.

वोकवाद हा सांस्कृतिक मार्क्सवादाचाच एक पुढचा टप्पा आहे, जो अत्यंत धोकादायक आणि विकृत स्वरूपात समोर येत आहे. याचा एक धक्कादायक प्रकार इंग्लंडमध्ये पाहायला मिळाला. बलात्काराच्या एका आरोपीला वाटले की तो महिला आहे, म्हणून त्याला महिलांच्या कोठडीत ठेवण्यात आले. ही विकृतीची पराकाष्ठा आहे. जर एखाद्या व्यक्तीला वाटले की तो कुत्रा आहे तर त्याला कुत्रा मानायचे का? ही विचारसरणी मानवी अस्तित्वाच्या मूलभूत संकल्पनांनाच आव्हान देत आहे. यामुळे समाजातील नैसर्गिक व्यवस्था कोलमडून पडू शकते, स्त्री-पुरुष यांच्यातील नैसर्गिक समतोल नष्ट करण्याचा प्रयत्न केला जात आहे. याचा परिणाम म्हणून महिलांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होत आहे आणि सामाजिक अराजकता वाढत आहे. कम्युनिस्टांनी लोकशाहीच्या माध्यमातून सत्ता गमावली असली, तरी शहरी नक्षलवाद आणि सांस्कृतिक मार्क्सवादाच्या माध्यमातून त्यांचा धोका अजूनही कायम आहे. ही कम्युनिस्ट शक्ती वेगवेगळ्या माध्यमांतून समाजात भ्रम निर्माण करीत आहे. तरुणांची माथी भडकवत आहे आणि देशाच्या एकात्मतेला आव्हान देत आहे. या अदृश्य शत्रूचा सामना करण्यासाठी आपल्याला अधिक सतर्क राहावे लागेल. आपल्या मुलांना आणि तरुण पिढीला या विचारधारेच्या धोक्यांबद्दल शिक्षित करणे, आपल्या संस्कृती आणि मूल्यांचे रक्षण करणे आणि लोकशाही संस्थांना मजबूत करणे हे आपले कर्तव्य आहे. कम्युनिस्टमुक्त लोकशाही झाली असली, तरी आव्हान अजूनही मोठे आहे. राज्यकर्त्यांनी आता थोडे कठोर होऊन राजधर्माचे पालन केले पाहिजे तसेच हिंदूंनी खऱ्या अर्थाने जागं झालं पाहिजे. पुढची ५० वर्षे हिंदूंनी एकमेकांसोबत भांडण, मारामाऱ्या करणे सोडून दिले पाहिजे. जसं मंदिरात जाताना आपण चपला बाहेर सोडतो, त्याचप्रकारे घराच्या बाहेर पडताना आपली जात आणि प्रांत घरीच सोडून हिंदू म्हणून बाहेर पडावं लागणार आहे. शिवाजी आमचे, सावरकर तुमचे, समर्थ आमचे, तुकाराम तुमचे - असला वाह्यातपणा सर्वात आधी हिंदूंनी फेकून दिला पाहिजे. विचारांवरून आपापसात वाद घालणं सोडून दिलं पाहिजे. पुढील ५० वर्षे आपण फक्त आणि फक्त हिंदू आहोत. तुम्हाला कोणतेही महापुरुष आवडू देत, कोणताही देव आवडू दे, कोणत्याही उपासना पद्धतीचे तुम्ही उपासक असा त्याने काहीही फरक पडणार नाही. सामूहिकरीत्या आपण हिंदू आहोत. फक्त आणि फक्त हिंदू. तरंच ही कम्युनिस्ट, वाळवंटी कीड आपण उमटून टाकू शकतो.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

# ...म्हणून 'त्याला' सोडू नका!

सोनाली पवन ठेंगडी



गेल्या कित्येक दशकांपासून बलात्काराच्या घटना; मग त्या देशातील असो किंवा राज्यातील असो; थरकाप उडवणाऱ्या ठरल्या. प्रत्येक वेळी गुन्ह्याची भीषणता आधीपेक्षा जास्तच असते, असे चित्र वारंवार उभे राहणे अतिशय लाजिरवाणी बाब आहे. कोणत्याही वयातील मुलगी किंवा स्त्री यात पीडिता असली, तरी शेवटी गुन्ह्याची तीव्रता कमी होत नाही. पुण्याजवळील नसरापूरच्या घटनेने आता राज्यात खळबळ माजली आहे. अवघ्या साडेतीन वर्षांच्या चिमुकलीला किती भयानक प्रसंगाला सामोरे जावे लागले, याची कल्पना कोणतीही संवेदनशील व्यक्ती करूच शकेल. आता या पीडितेच्या उत्तरीय तपासणीचा अहवाल समोर आला आहे. नराधमाला आधीच अटक झाली आहे. पण, शेवटी कायदा हा त्यातील कलमांनुसार, गुन्ह्याच्या स्वरूपानुसार शिक्षा ठरवत असतो.

उत्तरीय तपासणी अहवालात हे स्पष्ट झाले आहे की, आरोपी नराधमाने आवाज दाबण्यासाठी तिच्या तोंडात मोजा कोंबला होता आणि त्यामुळे जीव गुदमरून तिचा मृत्यू झाला. वैद्यकीय भाषेत याला 'अॅस्फिक्सिया' म्हणतात. म्हणजेच श्वसन बंद पडल्याने मृत्यू झाल्याचे अहवालात नमूद आहे. उद्या जर त्याच्या वकिलाने पीडितेच्या मृत्यूचे कारण जीव गुदमरून झाल्याचे सांगितले आणि शिक्षेत नरमाई मागितली तर कायद्याने त्याला कोणत्याही प्रकारची सूट देऊ नये. कारण शेवटी घडलेली अमानुषता वैद्यकीय शब्दावलीतील कोणत्याही क्षणिक कारणापेक्षा फार भीषण आहे.

आज आपल्या सुदैवाने राज्यात असे सरकार आहे, ज्यातील तिन्ही नायक संवेदनशील आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी घटनेनंतर लगेचच अशा आरोपींना पॅरोलही दिला जाऊ नये, या अर्थाचा कायदा करण्याचे सूतोवाच केले. विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे तर आनंद दिघे यांच्या तालमीत तयार झालेले नेते असल्याने त्यांच्या लेखी अशा नराधमांना कधीही माफी मिळणे नाहीच. शिवाय अजितदादांच्या सुविद्य पत्नी सुनेत्राताई पवार राज्यात दुसऱ्या क्रमांकाच्या सर्वोच्च पदावर आसीन आहेत. एक स्त्री म्हणून त्यांना अशा घटनेचे गांभीर्य वेगळ्याने पटवून देण्याची गरजच नाही. आपल्या राज्याला असे नेतृत्व मिळाले असताना भीषण गुन्ह्यांतील आरोपींना कठोरतम शासन व्हायलाच हवे. काही दिवसांपूर्वी बंगाल निवडणुकीच्या काळात तेथील महिलांनी ममता बॅनर्जीविषयी असे काही उद्गार काढले की, त्यातून त्या जनतेची मानसिकता लक्षात आली. ती महिला उपरोधाने म्हणाली, 'ममता तो बहुत ही अच्छी है, वो दस लाख रुपये देती है। जिसका रेप हो जाए उसे दस लाख रुपये देकर चूप रहने को बोलती है।' ही वाक्ये किती बोचणारी आहेत, हे आपल्या लक्षात येईल. स्वतः महिला असूनही ममता बॅनर्जींनी दाखवलेला कोरडेपणा आज त्यांच्याच अंगलट आला आहे. नसरापूरच्या चिमुकलीला न्याय मिळेलच. पण, कोणत्याही कारणाने आरोपीची शिक्षा कमी होता कामा नये, अशी मागणी प्रत्येक संवेदनशील नागरिक करीत आहे. अशा घटना समोर आल्या की देशात याआधी घडलेल्या घटनांची भीषणता आठवते. मग ती दिल्लीतील निर्भया असो किंवा कोलकाता येथील आरजी कर रुग्णालयातील डॉक्टर असो. या सर्वांमध्ये हैदराबादमधील महिला डॉक्टरची अमानुष हत्या लक्षात राहिली ती आरोपींच्या एन्काऊंटरमुळे. महिला डॉक्टरवर अत्याचार करून तिचे तुकडे करून जाळून टाकणाऱ्या नराधमाचे घटनेच्या तिसऱ्या दिवशी एन्काउंटर झाले. कायद्याने संबंधित पोलिसांना जाब विचारण्याचे काम केले. पण, त्यावेळी जनभावना पोलिसांच्या बाजूने होती. अशा अमानवीय गुन्ह्यांसाठी काही वर्षांची शिक्षा काय तर जन्मठेपदेखील कमी आहे. त्यातही गुन्हेगाराला फाशी दिली तर तो झटक्यात त्रासातून सुटेल. म्हणून शिक्षा अशी असावी ज्यात त्याला केलेल्या गुन्ह्याचे मरेपर्यंत शल्य वाटेल आणि इतरांनाही असा गुन्हा करण्याची ताब राहणार नाही. छत्रपती शिवरायांनी आपल्या शासनकाळात अशा नराधमांना कधीही क्षमा केली नाही. तोच आदर्श आता आपल्या शासनकर्त्यांनी समोर ठेवावा आणि शिवरायांच्या भूमीत प्रत्येक बलात्काऱ्याला जिवाचा थरकाप उडेल, अशी शिक्षा द्यावी. कारण जोवर शिक्षेची तीव्रता वाढणार नाही तोवर सराईत गुन्हेगारांच्या मनात भीती निर्माण होणार नाही आणि अशा घटनाही थांबणार नाहीत. हे दुष्टचक्र थांबण्यासाठी कायद्याचे सुदर्शन चक्र अधिक वेगवान आणि भेदक व्हायला हवे, हाच उपाय आहे.

७७५५९३८८२२


## मुंबई वार्तापत्र

# बंगालमधील 'शाह' नीती!

नागेश दाचेवार

पश्चिम बंगालच्या राजकारणात सरकारे सहजासहजी बदलत नाहीत, हा इतिहास आहे. गेल्या पाऊण शतकापासून या राज्याची ओळख ठरावीक पक्षांच्या दीर्घकालीन वर्चस्वाची राहिली आहे. १९४७ ते १९७७ पर्यंत काँग्रेसची राजवट, त्यानंतर सलग ३४ वर्षे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा लाल किल्ला आणि २०११ पासून गेल्या १५ वर्षांपासून तृणमूल काँग्रेसने विणलेले सत्तेचे जाळे या सर्व पृष्ठभूमीवर 'शाह' नीतीने मिळविलेला हा विजय केवळ सत्तांतर नसून एक अभूतपूर्व राजकीय चमत्कार मानला जात आहे. बंगालमध्ये सत्ता मिळविणे जितके कठीण, तितकेच ती टिकविणेही आव्हानात्मक असते. मात्र, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या सूक्ष्म नियोजनाने आणि 'बूथ-स्तरीय' अचूकतेने तृणमूलची अभेद्य यंत्रणा मोडीत काढली. २०१६ मध्ये केवळ ३ जागांवर असलेला भाजपा २०२६ मध्ये थेट सत्तेच्या खुर्चीपर्यंत पोहोचला, यामागे अमित शाह यांनी आखलेली संघटनात्मक गणिते आणि प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्याची रणनीती अत्यंत कळीची ठरली आहे. २०१६ मध्ये भाजपाला पश्चिम बंगालमध्ये अवघ्या ३ जागा मिळाल्या. पाच वर्षांत २०२१ मध्ये त्यांनी ७७ जागांपर्यंत मजल मारली. या यशानंतरही हा पक्ष तृणमूलचा अभेद्य किल्ला भेदायला तयार झाला आणि एक आव्हानकर्ता पक्ष ठरला, यशस्वीदेखील झाला. हे सगळं सहज सोप्या पद्धतीने मिळालेलं नाही. त्यामागे आहे कठीण परिश्रम आणि त्याग. त्यालाच जोड मिळाली संघटनात्मक कौशल्याच्या गणिताशी सांगड घालण्याच्या हातोटीची. २०२१ मध्ये बंगालमध्ये विधानसभेच्या ४० हून अधिक जागा भाजपाने १० हजारांपेक्षा कमी मतांच्या फरकाने गमावल्या होत्या. याचा अर्थ भाजपाने तेथे आपली पोहोच निर्माण केली होती; पण त्याचे रूपांतर विजयात करण्यात त्यांना यश आले नव्हते.

रणनीतीकार अशी ओळख असलेल्या अमित शाह यांनी नेमके हेच हेरले. त्यांच्या प्रचारयंत्रणेने या उणिवेवर लक्ष केंद्रित केले. बूथ-स्तरावरील अचूकतेवर त्यांनी लक्ष दिले. जवळपास ४० हजार बूथ एजंट तैनात करण्यात आले. 'पन्ना प्रमुख' प्रणाली अंतर्गत प्रत्येक कार्यकर्त्याला मतदारांचा एक छोटा, निश्चित गट नेमून देण्यात आला, जे त्यांच्यावर लक्ष ठेवून त्यांना मतदानासाठी प्रवृत्त करतील. त्यामुळे पक्षाच्या स्थानिक कार्यकर्त्याला माहीत होते की, आपल्या भागातून कोणाला मतदानासाठी बाहेर काढायचे आहे. या सूक्ष्म नियोजनामुळे मतांचा फरक कमी झाला. प्रत्येक बूथमागे ८ ते १० अतिरिक्त मतांची वाढ झाली.



त्यामुळे पूर्वी हातातून निसटलेल्या मतदारसंघांत भाजपाचा विजय निश्चित झाला. अमित शाह यांच्याकडे बंगालच्या निवडणुकीची सारी सूत्रे होती. त्यांची पक्षातली केंद्रीय यंत्रणा तळागाळातल्या लोकांकडून येणाऱ्या अभिप्रायाची नोंद घ्यायची. त्यानुसार त्या-त्या भागात प्रचाराच्या पद्धतीत आवश्यक ते बदल केले जायचे. त्यांचा भर देखाव्यावर नव्हे तर सुसंगततेवर होता. प्रत्येक बूथवर लक्ष ठेवले जात होते आणि प्रत्येक बारीकसारीक गोष्टीचा मागोवा घेतला जात होता. अमित शाहांच्या या निवडणूक बारकाव्यांच्या नियोजनाचा अनुभव महाराष्ट्रातील निवडणुकांमध्येदेखील आलाच आहे.

बंगालमधील सत्ताविरोधी लाटेकडे अनेकदा दुर्लक्ष केले गेले आहे. असंतोष अस्तित्वात असतो, पण तो नेहमीच राजकीय परिणामात रूपांतरित होत नाही. या खेपेला भाजपाच्या प्रचारयंत्रणेने त्या भावनेला एक रचनात्मक स्वरूप दिले. तृणमूल काँग्रेसवर व्यापक टीका करण्याऐवजी, त्यांनी विशिष्ट तक्रारींना एका निश्चित राजकीय पर्यायाशी जोडले. ग्रामीण भागांत कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी आणि स्थानिक भ्रष्टाचाराबद्दलच्या तक्रारींना व्यवस्थेतील समस्या म्हणून मांडण्यात आले. महिला मतदारांमध्ये, दरमहा ३ हजार रुपयांच्या आश्वासनाला सुरक्षितता, बेरोजगार तरुणांसाठी, आर्थिक मदतीची पुनरुज्जीवनाच्या व्यापक कथानकाशी सांगड घालण्यात आली. समुदाय-विशिष्ट संदेशाने आणखी एक स्तर जोडला. मतुआ समुदायाच्या नागरिकत्वाच्या दीर्घकाळच्या चिंतांना थेट प्रतिसाद म्हणून नागरिकत्व सुधारणा कायदा सादर करण्यात आला. उत्तर बंगालमध्ये, गोरखा प्रश्नावर विशिष्ट कालमर्यादितले आश्वासन देऊन त्यावर स्पष्ट तोडगा काढण्यात आला. भाजपाने वेगवेगळ्या मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी एकच माध्यम वापरले नाही. त्यांना लक्ष्यित प्रस्तावांद्वारे संबोधित करण्यात आले. भाजपाच्या प्रचारातील एक न दिसणारा अंतर्गत बदल होता. राज्यातील गटबाजी नियंत्रित करण्यात आली. भूमिका स्पष्टपणे परिभाषित केल्या गेल्या आणि उत्तरदायित्वाची अंमलबजावणी करण्यात आली. उमेदवारांची निवड प्रामुख्याने प्रत्यक्ष पाहणी आणि विजयक्षमता सर्वेक्षणांवर अवलंबून होती. प्रादेशिक सूचनांना अधिक स्वायत्तता देण्यात आली. त्यामुळे ज्यावेळी अंमलबजावणीसाठी अचूकतेची आवश्यकता होती, त्यावेळी अंतर्गत संघर्ष कमी झाला. सूक्ष्म व्यवस्थापनावर उभारलेल्या प्रचार संघटनात्मकदृष्ट्या भरकटणार नाही, हे पाहिले गेले. अर्थात यावर बारकाईने नजर कोणाची होती हे वेगळ्याने सांगायची गरज आहे, असे वाटत नाही. संघटनात्मक बदलांसोबतच भाजपाने निवडणुकीचे कथानक नव्याने मांडण्याचे कामही केले. यावेळची स्पर्धा सुशासन आणि भ्रष्टाचार, विकास आणि स्थिरता यांमधील निवड म्हणून मांडण्यात आली. त्याचवेळी पक्षाने आपली लोकप्रियता मर्यादित करणाऱ्या 'बाहेरचा पक्ष' या प्रतिमेला पुसून काढण्याचाही प्रयत्न केला. बंगालमधील नेतृत्व राज्यातूनच उदयास येईल, यावर वारंवार जोर दिला. घुसखोरी, लोकसंख्याशास्त्रीय बदल आणि कायदा व सुव्यवस्था यांसारख्या मुख्य विषयांना सातत्याने अग्रस्थानी ठेवण्यात आले. हे बंगालच्या राजकीय चर्चेतील नवीन मुद्दे नव्हते. परंतु तळागाळातल्या त्यांच्या पुनरावृत्तीमुळे ते दैनंदिन संभाषणात रुजण्यास मदत झाली. ज्या बूथस्तरीय नेटवर्कने भाजपाने लोकांना संघटित केले, त्याच नेटवर्कद्वारे स्थानिक पातळीवर हा प्रचार केला गेला. भाजपाच्या विजयाचे श्रेय केवळ रणनीतीला देणे अर्धवट ठरेल. रणनीतीमुळे तयारी स्पष्ट होते, पण वेळेचे नियोजन पूर्णपणे स्पष्ट होत नाही.

२०२६ मधल्या निवडणुकीत भाजपाने आधीच विस्तारलेल्या जनाधारासह प्रवेश केला होता. दीर्घकाळ सत्तेत असलेल्या राज्य सरकारविरोधातली लाट राजकीयदृष्ट्या फळण्याइतकी परिपक्व झाली होती. पक्षाची संघटनात्मक यंत्रणा पूर्वीपेक्षा अधिक एकसंध झाली होती. जेव्हा हे सारे घटक एकत्र येतात, तेव्हा चांगल्या प्रकारे राबविलेल्या प्रचारमोहिमेचा प्रभाव वाढतो. पश्चिम बंगालमधील भाजपाचा विजय असा विविध बाजूंचा संगम आहे. संघटनात्मक शिस्त, बूथस्तरावरील अचूकता आणि परिस्थितीनुसार बदलली गेलेली रणनीती, जनतेत साचलेला असंतोष, पक्ष तसेच जनतेच्या सहभागाबद्दलच्या बदलत्या धारणा आणि पुरेशी रुंदावलेली राजकीय संधी याचा हा परिपाक आहे. या अभूतपूर्व विजयाने हे सिद्ध केले की, केवळ सत्तेचे जाळे विणून चालत नाही, तर लोकांच्या आकांक्षांना रणनीतीची जोड द्यावी लागते. ममता बॅनर्जी यांच्या १५ वर्षांच्या सत्तेचा अध्याय ज्या पद्धतीने संपला, त्यावर बंगाली भाषेत एक प्रसिद्ध म्हण चपखल बसते... 'अति चोलो ना, अति चोलो ना, चोल्लेइ बिपोट...' याचा अर्थ असा होतो की, जास्त अहंकार करू नका, मर्यादेपेक्षा जास्त चालणे नेहमीच संकटाकडे नेते. बंगालच्या मातीने या निवडणुकीतून हेच दाखवून दिले की, जेव्हा लोकशाहीत सत्तेचा अहंकार वाढतो, तेव्हा 'परिवर्तनाचे वारे' रणनीतीच्या जोरावर मोठ्या मोठ्या किल्ल्यांना जमीनदोस्त करतात.

९२७०३३३८८६

### हिंदू मुलांमध्ये धर्मशिक्षणाचा अभाव चिंताजनक

सद्यस्थितीचा आढावा घेतला असता, लक्षात येते की, अहिंदू समुदायातील मुले पहिल्या वर्गापासून धार्मिक शिक्षण घेत मोठी होतात आणि पुढे धर्माचे आचरण अधिक ठामपणे करतात. दुसरीकडे हिंदूंची मुले पहिल्या वर्गापासून धर्म शिकत नसल्याने महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण होईपर्यंत अनेकदा धर्मापासून दूर गेलेली दिसतात. आजच्या काळात याची अनेक उदाहरणे आपल्या सभोवताली दिसून येतात. काही शाळांमध्ये प्रार्थना, संस्कारवर्ग किंवा धार्मिक शिक्षण यांना दुय्यम स्थान दिले जाते तर दुसरीकडे मुलांना आधुनिक शिक्षणाच्या नावाखाली केवळ करीअरकेंद्रित बनवले जाते. परिणामी मुलांमध्ये संस्कार, परंपरा आणि धर्माविषयीची जाणीव कमी होत चालली आहे. अनेक पालक सांगतात की, मुलांना सण-उत्सवांचा खरा अर्थ माहिती नाही. दिवाळी, रामनवमी, गुढीपाडवा यांसारख्या सणांचे आध्यात्मिक व सांस्कृतिक महत्त्व समजण्याऐवजी ते केवळ सुट्टी किंवा मनोरंजन म्हणून पाहतात. काही ठिकाणी तर मुलांना देवपूजा, नामस्मरण किंवा साधनेबद्दल मूलभूत ज्ञानही नसते. याउलट, ज्या कुटुंबांमध्ये किंवा संस्थांमध्ये लहानपणापासून संस्कारवर्ग, श्लोक, प्रार्थना, धर्म शिक्षण दिले जाते, त्या मुलांमध्ये आत्मविश्वास, नैतिकता आणि कर्तव्यभावना अधिक दृढ झालेली दिसते. अशा मुलांचा व्यक्तिमत्त्व विकास अधिक संतुलित आणि मूल्याधारित होतो. म्हणूनच, हिंदू समाजाने या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून आपल्या मुलांना लहानपणापासून धर्म शिक्षण देण्यास प्राधान्य दिले पाहिजे. घरातूनच साधना, संस्कार आणि परंपरा यांची बीजे पेरली गेली, तरच पुढील पिढी धर्माभिमानी, सज्जन आणि आदर्श नागरिक म्हणून घडू शकेल.

**रमा देशमुख**/ नागपूर

## वाचक पत्रे

### नट तो होइल का नृप कधी!

एन. टी. रामाराव यांनी १९८२ मध्ये तेलुगू देसम पक्षाची स्थापना केली आणि त्यानंतरच्याच वर्षी म्हणजे १९८३ मध्ये ते तत्कालीन आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री झाले. त्यावेळी महाराष्ट्रातील एका ज्येष्ठ पत्रकाराने त्यांचे अभिनंदन करताना जो लेख लिहिला होता, त्याला खोचकपणे शीर्षक दिले होते- 'नट तो होइल का नृप कधी!' नुकत्याच झालेल्या तामिळनाडूमधील निवडणुकीत अभिनेता जोसेफ विजय उर्फ दलपती विजय हे, त्यांनी दोनेक वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या पक्षास मोठा विजय मिळवून देऊन, सर्वात मोठा पक्ष या नात्याने मुख्यमंत्री होऊ घातले आहेत. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन! मात्र, केजरीवाल यांनी सुरू केलेल्या रेवडी संस्कृतीनुसार त्यांनी निवडणूक जाहीरनाम्यात दिलेल्या आश्वासनांचे काय होणार, हा प्रश्नच आहे. ६० वर्षांखालील महिलांना दरमहा २५०० रुपये साह्य, विवाहासाठी आठ ग्रॅम्स सोने, प्रतिकुटुंब वर्षाला स्वयंपाकाची सहा सिलेंडर्स मोफत, गरीब वधूंसाठी सोन्याव्यतिरिक्त दर्जेदार रेशमी साडी, महिला बचत गटांना पाच लाख रुपयांपर्यंत व्याजमुक्त कर्ज, सरकारी आणि सरकारी अनुदानित शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांच्या माता किंवा पालकांना वार्षिक १५,००० रुपये, १०० विशेष निवासी शाळा, २० लाख रुपयांपर्यंत उच्च शिक्षण कर्ज, पाच एकर किंवा त्यापेक्षा कमी जमीन असलेल्या शेतकऱ्यांना पीककर्जाची संपूर्ण तर पाच एकरांपेक्षा अधिक जमीन असलेल्या शेतकऱ्यांना ५० टक्के कर्जमाफी, पाच लाख नवीन सरकारी नोकऱ्या, मोफत वार्षिक आरोग्य तपासणी, ज्येष्ठ आणि दिव्यांगांसाठी दरमहा ३००० रुपये निवृत्तिवेतन, २०० युनिट्स मोफत वीज, सर्व घरांना १०० टक्के नळाद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा इत्यादी आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी ते पैसा कुठून आणणार, हा यक्षप्रश्न आहे. खरे तर या आश्नासनांची खरोखर पूर्तता केल्यास त्यामुळे राज्य दिवाळखोरीत निघण्याचीच शक्यता वाटते. आणि, आता द्रमुकशी निवडणूकपूर्व युती केलेल्या आणि देशभरात जनाधार गमावलेल्या काँग्रेसच्या राहुल गांधी यांनी युतिधर्म मोडून सत्तेच्या लालसेने परस्पर विजय जोसेफ यांच्या संभाव्य सरकारला पाठिंबा जाहीर केला आहे. एकूण विचार करता त्यांच्या सरकारवर कायम अस्थिरतेचे सावट राहील, असे वाटते.

**अविनाश वाघ**/पुणे ९३२२९९६२४३

### समाजमाध्यमांचा वापर सावधपणे


तरुण भारत दि. ०७.०५.२०२६ मधील 'फसव्या कॉल्सचा सापळा' हा 'वेध' सदराखालील सायबर गुन्ह्यांवरील माहितीपूर्ण लेख वाचला. केवायसी पूर्ण करण्यासाठी, वीज, गॅस बिल अद्ययावत करून भरण्यासाठी कॉल करून व लिंक पाठवून फसवणूक तसंच 'डिजिटल अॅरेस्ट'चा बागुलबुवा दाखवून आर्थिक गंडा घालण्याचे प्रकार वाढलेत. खरं तर पोलिस वा गुन्हेगारी विरोधक अधिकाऱ्यांच्या नावानं फोन आला, तर प्रथम आपल्या बँक, आधार वगैरेबद्दल त्याला कितपत माहिती आहे हे जाणून घेऊन, वरिष्ठांच्या सहीशिक्क्यानिशी सूचनापत्र पाठवण्यास सांगावे, त्या खात्याच्या नजिकच्या संलग्न आस्थापना किंवा पोलिस चौकीचा अचूक संदर्भ देण्यास सांगावे, त्यांचे ई-मेल पत्ते, फोन नंबर मागावेत. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे व्हिडीओ कॉलला प्रतिसाद देऊ नये. फेसबुकसारखी समाजमाध्यमं कमीत कमी वापरून अनोळखी फोन करणाऱ्यानं आपल्या माहितीतील व्यक्तीचा संदर्भ दिला तर खात्री करावी.

**श्रीपाद कुलकर्णी**/ बिबवेवाडी-पुणे ९४२२५१५६४०

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## दहावी : विविध शाळांचे यश




### राजेभाई उर्दू हायस्कुल ९८.११ टक्के निकाल, सानिया दुरुगकर प्रथम

**सोलापूर, दि. ८ मे-**

राजेभाई उर्दू हायस्कूलचा फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल ९८.११% लागला आहे. पुष्पगुच्छ व रोख बक्षीस देऊन प्रथम तीन विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यशस्वी विद्यार्थीचे संस्थाचे अध्यक्ष फैज अहमद इनामदार, उपाध्यक्षा तस्निमआरा शेख, मुख्याध्यापिका सबिहा पिरजादे व सर्व मार्गदर्शक शिक्षकांनी अभिनंदन केले.

**प्रथम तीन विद्यार्थी :** सानिया जाकीर दुरुगकर ७९%, मोहम्मदी इस्माईल शेख ७६.२०%, अनम बिलाल शेख ७०.२०%.

### चंडक प्रशालेच्या निकिता कुचेकरला सर्व विषयांत ३५ गुण

**सोलापूर, दि. ८ मे-**



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल शुक्रवारी दुपारी जाहीर झाला. यामध्ये ज.रा. चंडक प्रशाला, बाळे येथील विद्यार्थिनी निकिता अमोल कुचेकर हिने सर्वच विषयांत प्रत्येकी ३५ गुण मिळवत एक वेगळीच नोंद केली आहे. निकिताला मराठी, हिंदी, इंग्रजी, गणित, विज्ञान तसेच समाजशास्त्र या सर्व विषयांमध्ये समान ३५ गुण प्राप्त झाले.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशालेचा १०० टक्के निकाल

**सोलापूर, दि. ८ मे-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळातर्फे घेण्यात आलेल्या भारतीय भटके विमुक्त विकास व संशोधन संस्था सातारा संचलित, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशालेचा इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे कार्याध्यक्ष लक्ष्मण माने, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विष्णू गायकवाड, मुख्याध्यापक महादेव यादव यांनी केले.

### 'अरिहंत'च्या स्वप्नील गिडवीरला ८३ टक्के गुण

**सोलापूर, दि.८ मे-**



इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत येथील अरिहंत इंग्लिश मीडियम स्कूलचा विद्यार्थी स्वप्नील जगदीश गिडवीर या विद्यार्थ्यांने ८३ टक्के गुण मिळवत यश संपादन केले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. अजय पोन्नम, संचालिका सुलक्षणा पोन्नम, रामकृष्ण पोन्नम, उपमुख्याध्यापिका तस्नीम शेख, ज्योती आडम, रुपाली निकते, पर्यवेक्षिका अर्चना महांकाल, चन्नेश इंडी आदींनी त्याचे अभिनंदन केले.

### आई व मुलीने एकाच वेळी मिळवले दहावी परीक्षेत यश

**अकलूज दि.८ मे-**

दहावीच्या परीक्षेत अकलूज येथील मायलेकीने एकाच वेळेस दहावीची परीक्षा देवून उत्तीर्ण होण्यात यश मिळविले. दोघींनी एकाच वेळी यश संपादन केल्यामुळे आई व लेकीवर सर्वस्तरातून अभिनंदनाचा व कौतुकाचा वर्षांव होत आहे. अकलूज येथील जिजामाता कन्या प्रशालेतील






विद्यार्थिनी लक्ष्मी क्षीरसागर ही ५०० पैकी ४११ गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे. तिची आई पुजा क्षीरसागर यांनी वयाच्या ३७ व्या वर्षी दहावीची परीक्षा देवून ५०० पैकी २१८ गुण मिळवले. आई व मुलगी एकाच वेळी उत्तीणृ झाल्या आहेत. त्यामुळे या मायलेकीचे अकलूज परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे. पुजा क्षीरसागर या सध्या यशवंतनगर येथील सावित्रीबाई फुले लोकसंचलित साधन केंद्राच्या २१ चारी जयसिंहनगर येथे सीआरपी पदावर कार्यरत आहेत. जीवनाच्या प्रवासात त्यांना अपु-या शिक्षणामुळे असल्यापुढे अडचणी येवू लागल्यामुळे ३७ व्या वर्षी त्यांनी बाहेरून परीक्षा देवून हे यश संपादन केले आहे. आपली मुलीला इंजिनीअर बनवण्याचे स्वप्न त्यांनी मनात घेतले आहे. घरची परिस्थिती सर्व साधारण असल्यामुळे मुलीच्या शिक्षणासाठी त्या अहोरात्र परिश्रम घेत आहेत.

# महापालिका प्रशासन खेळतेय नागरिकांच्या आरोग्याशी...

## पिवळसर, गढूळ पाणीपुरवठा; नागरिकांतून होतोय तीव्र संताप





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मे-**

शहरातील अनेक भागांमध्ये गेल्या काही दिवसांपासून पिवळसर आणि गढूळ पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आणि संताप व्यक्त करण्यात येत आहे. विशेषतः माजी सैनिक नगर, जुना विजापूर नाका, कुमठा नाका परिसरात तब्बल आठ दिवसांनंतर नळाला पाणी आले, मात्र तेही पिवळसर आणि दूषित स्वरूपात आल्याने नागरिक संतप्त झाले आहेत.

होणाऱ्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त असताना आता येणारे पाणीही वापरण्यायोग्य नसल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे. अनेक भागांमध्ये नळातून गढूळ, मातीमिश्रित आणि पिवळसर पाणी येत असल्याने पिण्याचे पाणी विकत घेण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.या दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांना विविध आजारांचा धोका निमर्ण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. शहरात दूषित पाणीपुरवठा होत असतानाही महापालिका प्रशासन मात्र याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

आठ दिवस पाणी नाही, आणि जे आले तेही गढूळ. नागरिकांनी नेमके जगायचे कसे? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांकडून उपस्थित करण्यात येत आहे. अनेक ठिकाणी जलवाहिन्या गळती, दुरुस्तीचा अभाव आणि नियोजनशून्य कारभारामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचे बोलले जात आहे.

महापालिका प्रशासनाने तातडीने संबंधित भागातील जलवाहिन्यांची तपासणी करून स्वच्छ आणि नियमित पाणीपुरवठा करावा, अशी मागणी होत आहे.

## संभाजी आरमारच्या वतीने उद्या सामुदायिक विवाह सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मे-**



छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त तसेच संभाजी आरमार संघटनेच्या १८ व्या वर्धापन दिनानिमित्त रविवार दिनांक १० मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता गवळी वस्ती आकाशवाणी केंद्र सोलापूर येथे भव्य सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या सोहळ्यात आठ वधू-वर जोडपे विवाह बंधनात अडकणार आहे. या विवाह सोहळ्यास राज्याचे महसूल मंत्री नामदार चंद्रशेखरजी बावनकुळे, शहर मध्यचे आ. देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, सभागृह नेते नरेंद्र काळे याच बरोबर विविध मान्यवरांच्या उपस्थितीत नवदांपत्यांना शुभाशीर्वाद देण्यात येणार आहेत. तरी या सोहळ्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून नवदांपत्यांना शुभाशिर्वाद द्यावेत, असे आवाहन संभाजी आरमार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांनी केले आहे.

# 'स्वेरी'तील प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन कक्ष ठरणार फायदेशीर




**अधिक माहितीसाठी संपर्क**

अधिक माहितीसाठी अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा.उत्तम अनुसे (९१६८६५५३६५) अथवा प्रा. पोपट आसबे (७८२१००४६४७) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

### मंदार परिचारक; स्वेरीत अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन कक्षाचे उदघाटन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.८ मे -**

ग्रामीण भागातील विद्यार्थी हुशार असतात परंतु योग्य मार्गदर्शनाअभावी त्यांना योग्य दिशा मिळत नाही. ग्रामीण भागातील पालक व विद्यार्थ्यांची पुढील प्रवेशासाठी कोणतीही द्विधा स्थिती होऊ नये आणि पालक व विद्यार्थ्यांना प्रवेशासंदर्भात योग्य दिशा आणि अचूक माहिती मिळावी यासाठी स्वेरीचा हा मार्गदर्शन कक्ष फायदेशीर ठरणार आहे.' असे प्रतिपादन ब्रिलियंट करियर इन्स्टिट्यूटचे संचालक प्रा. मंदार परिचारक यांनी केले.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता प्रथम वर्ष अभियांत्रिकी, थेट द्वितीय वर्ष (पदवी), पदव्युत्तर पदवी अभियांत्रिकी, एमबीए, एमसीए, लॉ कॉलेज मधील विविध कोर्सेसच्या प्रवेशा संदर्भातील सर्व माहिती एकाच छताखाली उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार यांच्या सहकार्याने व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली या प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन कक्षाची स्थापना केली. कक्षाच्या उदघाटन प्रसंगी प्रा. परिचारक मार्गदर्शन करत होते. प्रारंभी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा.उत्तम अनुसे यांनी विद्यार्थी व त्यांच्या पालकांना अभियांत्रिकी, फार्मसी, एमबीए व एमसीए बरोबरच आता लॉ कॉलेज या विद्या शाखांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत माहिती देण्यासाठी तसेच शैक्षणिक शुल्क, शासनाच्याविविध स्कॉलरशिप्स, विद्यार्थ्यांसाठी असणारी वसतिगृह सुविधा आदींबाबत मार्गदर्शन कक्षातून होईल, असे सांगितले. केंद्रात उच्चशिक्षित प्राध्यापकांची टीम सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सज्ज असणार आहे. यामुळे एकाच छताखाली सर्व माहिती मिळणार आहे.



# सांगोला विद्यामंदिरचे दहावी बोर्ड परीक्षेत देदीप्यमान यश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ८ मे-**

सांगोला विद्यामंदिर प्रशालेचे ४८२ विद्यार्थी दहावीच्या परीक्षेला बसले होते. त्यापैकी ४७९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून प्रशालेचा निकाल ९९.३७ टक्के लागला आहे. सिद्धी उकळे ९९, अर्जून सावंत ९८.८०, जिज्ञासा घाडगे ९८.२० टक्के गुण मिळवून अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे सां.ता.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, उपाध्यक्ष ॲड.विजयसिंह चव्हाण, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य शीलाकाकी झपके, विश्वेश झपके, प्राचार्य बिभिषण माने, उपमुख्याध्यापक चारूदत्त जगताप, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, काकासो नरूटे, उत्तम सरगर, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

**गणित विषयात ७ तर संस्कृत विषयात २ विद्यार्थ्यांचे पैकीच्या पैकी गुण**

प्रशालेत ९५ टक्के पेक्षा अधिक २७ तर ९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवणारे ७२ विद्यार्थी आहेत. विशेष श्रेणीत २१२, प्रथम श्रेणीत १७६, द्वितीय श्रेणीत ७६ तर उत्तीर्ण श्रेणीत १५ विद्यार्थी आहेत. गणित ७ तर संस्कृत विषयात २ विद्यार्थ्यांनी पैकीच्या पैकी मार्क मिळवली आहेत. तसेच विज्ञान व टेक्निकल ९९, इंग्रजी व समाजशास्त्र ९८, मराठी ९६, हिंदी ९५ असे गुण मिळवत विषयानुसार यश संपादन केले.

# जलव्यवस्थापन अंतर्गत सर्व योजनांची कामे जलद गतीने व गुणवत्तेने पूर्ण करा

### समितीच्या बैठकीत अध्यक्ष दिपक वैद्य यांच्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ मे-**




जिल्हा परिषदेचे जलव्यवस्थापन अंतर्गत सर्व योजनांची कामे जलद गतीने व गुणवत्तापूर्ण पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दिपक वैद्य यांनी दिले. जिल्हा परिषदेच्या शिवरत्न सभागृहात जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीची बैठक घेणेत आली. या बैठकीच्या अध्यक्षस्थांनी जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजित पवार , मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, आरोग्य व शिक्षण समितीचे सभापती चेतनसिंह केदार-सावंत, महिला व बालकल्याण सभापती अमृता वाघे, कृषी व पशुसंवर्धन सभापती रामप्पा चिवडशेट्टी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहीणकर, जिल्हा परिषद सदस्य सिद्धाराम शिवमुर्ती, जिल्हा परिषद सदस्या गीतांजली साळुंखे, जिल्हा परिषद सदस्या वंदना कांबळे जिल्हा परिषद सदस्य सन्मुखी कोरके , कार्यकारी अभियंता प्रसाद काटकर , जिल्हा जलसंधारण अधिकारी हरिश्चंद्र सपताळे, यांच्यासह इतर मान्यवर व अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत केंद्र व राज्य शासन पुरस्कृत सर्व योजनांची आर्थिक व भौतिक प्रगतींचा तालुकानिहाय सविस्तर आढावा घेण्यात आला.

**ग्रामपंचयत वडशिंगे** ता. माढा, जि. सोलापूर

आमच्या ग्रामपंचायतकडील विविध विकास कामांची निविदा आपल्या दैनिकामध्ये दिनांक ०८/०५/२०२६ रोजी जाहीर प्रसिध्दीकरण करण्यात आले आहे. सदर कामांची यादीमध्ये क्र. ५ व क्रं. ६ च्या कामांची नावे अनुक्रमे क्र ५ - मौजे वडशिंगे येथे वडर समाज चावडी दुरुस्ती करणे व क्र. ६ - मौजे वडशिंगे येथील मुस्लीम स्मशानभूमीत पाणीपुरवठा सोय करणे अशी आहेत. तरी सदर कामांच्या ऐवजी क्र. ५ व क्र. ६ च्या कागांची नावे अनुक्रमे क्र. ५ - मौजे वडशिंगे येथील आंबेडकर नगर मधील शौतालय दुरुस्ती करणे व क्र. ६ - मौजे वडशिंगे नवले वस्ती येथील नवले वस्ती पोहोच रस्ता करणे, असे वाचावे.

**निविदा शुध्दीपत्रक**

| क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत महिन्यामध्ये | ठेकेदार | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे वडशिंगे येथील आंबेडकर नगरमधील शौचालय दुरुस्ती करणे. | ७८ हजार | - | १००/- | ३ महिने | सु.बे.अ. | ग्राम निधी |
| २ | मौजे वडशिंगे नवले वस्ती येथील नवले वस्ती पोहोच रस्ता करणे. | १०.०० लाख | - | १००/- | ३ महिने | सु.बे.अ. | जन सुविधा |

सही/- सरपंच
ग्रा. पं. वडशिंगे, ता. माढा

**जाहीर नोटीस**

जन्म-मृत्यू प्रकरण
अर्ज क्र. ६४/२०२६

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**१. अजय विनायक जाधव** - **अर्जदार**
रा. मांगडे चाळ, तुळजापूर रोड, बार्शी ता. बार्शी
(असल्यास, तर्फे वकील सुदर्शन उ. सोनवणे)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न.प. बार्शी** - **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. मांगडे चाळ, तुळजापूर रोड, बार्शी, ता. बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक २३ मार्च १९७० रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३(३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक २३ मार्च १९७० रोजी मौजे बार्शी, स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी याठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०९ एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का

सही/-
(एफ.आर. शेख)
तहसिलदार, बार्शी

**जाहीर प्रसिध्दीकरण**

अर्ज-वारस प्रमाणपत्र मिळणेचा
दि.कि. अर्ज. नं ८५/२०२५ नि. ८

**बार्शी येथील मे.सि.ज.ज्यू.डी.सो. यांचे कोर्टात**

१) **ऋषिकेत धोंडीबा घोरपडे**
वय - ४६ वर्षे, धंदा - शेती
रा. मु.पो. साकत, ता. बार्शी, जि. सोलापूर
ह.रा. माप्स ग्लोबल सिविल टेक प्रायवेट लि.,
ऑफिस नं २०१२०२ अनुराव हाईटस श्रुष्टी पार्क,
बाणेर बालेवाडी रोड बाणेर, पुणे-४११०४५.
२) **विद्या नंदकुमार गरड उर्फ विद्या धोंडीबा घोरपडे**
वय - ४७ वर्षे, धंदा - घरकाम
रा. मु.पो. कंदर, ता. करमाळा, जि. सोलापूर.
— **अर्जदार**
विरुध्द
**कोणी नाही** - **सा.वाला**

**अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम VIII (2) प्रमाणे**

ज्याअर्थी यातील अर्जदार नं १ व २ यांचे वडील कै. धोंडीबा व्यंकटेश घोरपडे हे बार्शी येथे दि. १४/१२/२०१० रोजी मयत झाले आहेत. त्यांचे पश्चात त्यांची पत्नी नामे सुमन धोंडीबा घोरपडे ह्या दि. १६/०६/२०२४ रोजी मयत झालेल्या आहेत. धोंडीबा व्यंकटेश घोरपडे यांना अर्जदार नं १ व २ हे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार शिवाय मयतास अन्य कोणीही कायदेशीर वारस नव्हते व नाहीत. मयत धोंडीबा व्यंकटेश घोरपडे यांचे वारस प्रमाणपत्र आणायला सांगितल्याने वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्जदार यांनी न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळवण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, वा अन्य कोणाचे काही कायदेशीर हक्क हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस वा कुणाचे हक्कात काही दस्त असलेस संबंधितानी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसाचे आत वा पुढील नेमलेले तारखेस ११/०६/२०२६ रोजी मे. कोर्टात स्वतः व वकीलामार्फत हजर होऊन आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रार, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे योग्य ते आदेश होतील.

सही/-
करिष्ठ लिपिक
दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा अधीक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः शहर बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील लोकांस कळविण्यात येते की.

डि. सोलापूर राब डि. व ता. बार्शी पैकी मोजे लक्ष्याचीवाडी येथील जमिन गट नं. ८६ याचे क्षेत्र हे. १-३२ आर. आकार रु. ४.५० पैसे यापैकी क्षेत्र हे ०-९० आर यासी चतुःसिमा :- पुर्वेस - सदर गट नंबर पैकी महानंदा दत्तात्रय ढेरे यांची जमिन, दक्षिणेस - सदर गट नंबरपैकी शरद चाकवते यांची उर्वरित हे ०-४२ आर जमिन, पश्चिमेस १० फुट रस्ता समाईक रस्ता व सदर गट नंबरपैकी सागर महादेव मुंढे यांची जमिन व उत्तरेस - सदर गट नंबर पैकी देवदत्त सोपानराव मोरे यांची जमिन येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक मिळकत आतील तदंगभूत वस्तूसह.

उपरोक्त वर्णन केलेली मिळकत ही शरद सुंदरलाल चाकवते यांच्या मालकी व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी सदर मिळकत आमचे अशिलास कायमखुष खरेदी देण्याचा ठराव करुन त्यांनी इसारा दाखल रक्कम स्विकारलेली आहे व साठेखताचा दस्त दिनांक : १२/१२/२०२५ रोजी दस्त क्र. ७९३५/२०२५ अन्वये बार्शी सब रजिष्ट्रार ऑफिस बार्शी येथे आमचे अशिलाच्या हक्कात नोंदवून दिलेला आहे. सदर मिळकत ही संबंधित जागा मालकांनी खरेदी देण्याचे मान्य व कबूल केलेले आहे. सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असल्याची खात्री व भरवसा संबंधित मालकांनी आमचे अशिलास दिलेले आहे.

तरी सदर मिळकतीबाबत कोणाची हरकत असल्यास किंवा सदर मिळकती संदर्भाने गहाण, दान, लिज, लिन, साठेखत, खरेदीखत, बक्षीसपत्र, फेडपत्र, मृत्यूपत्र, वाटप, वारसा, हिस्सा, बँक लोन, अटॅचमेंट, जप्ती, कोर्ट मॅटर, भाडेपट्टा, लायसेन्सी. इजमेंट, पोटगी, चोळीबांगडी, करार, मदार, विकसन इ. स्वरुपाचा तसेच या अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क अधिकार हितसंबंध असल्यास संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत मुदतीत खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत द्यावी. मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहीत आहे, असे प्रामाणिकपणे गृहित धरुन आमचे अशिल सदर मिळकत मालकांशी उर्वरीत खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही.

कळावे ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली, तारीखः ०८/०५/२०२६

सही/-
ॲड. गणेश ज्ञानोबा जगताप
बी.एस.एल., एल.एल.एम.
ऑफिस - स्वामी समर्थ, कोर्ट इमारतीच्या समोर,
बार्शी, जि. सोलापूर
मो.नं.- ९४०५०६९९३८/९०११३३९९३८
(अशिलातर्फे ॲडव्होकेट)

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः जिल्हा सोलापूर व शहर बार्शी नगरपरिषद हद्दीतील व आसपासचे तालुक्यातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी नगरपरिषद हद्दीमधील याचा जुना गट नं. ८५९ असून याचा नविन गट नंबर ८६५/२ यापैकी प्लॉट नं. २४ याचे एकूण क्षेत्रफळ १८०.०० चौ.मी. आहे. यापैकी दक्षिण बाजूचा प्लॉट याचे क्षेत्रफळ ९२.९३ चौ.मी. चे चौ.फुट १००० आहे. याचे मोजमाप पूर्व बाजू मीटर ७.४३.५, दक्षिण बाजू मीटर १२.५०, पश्चिम बाजू मीटर ७.४३.५ व उत्तर बाजू मीटर १२.५० आहे, याची चतुःसिमा पुर्वेस - काकडे यांचा प्लॉट, दक्षिणेस - देविदास सांगडे यांचा प्लॉट, पश्चिमेस ६.१० मीटर रूंदीचा रस्ता व उत्तरेस - सदर प्लॉट पैकी सुशीला विजय गोंदील यांचा उर्वरीत प्लॉट आहे. याचे पाणी व वागणूक पश्चिम बाजूच्या रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक खुला प्लॉट आतील सर्व तदंगभूत वस्तुसह वहिवाटीचे हक्कासह. यामध्ये पत्र्याचे शेड तीन रूम, लाईट कनेक्शन व नळ कनेक्शन सह संपूर्ण जागा आतील सर्व तदंगभूत वस्तुहक्कासह, अधिकारासह व वहिवाटीच्या हक्कासह इजमेंटरी राईटस् सह जागा. या जागेत असलेले लिहून देणार यांचे असलेले संपूर्ण हक्क व अधिकारासह मिळकत. येणेप्रमाणे मिळकत ही परवाना क्र. १९/५५ जा.क्र. स्थापत्य ५९८ दि. १५/०७/२००५ अन्वये गुंठेवारी झालेली आहे व आज रोजी सुशीला विजय गोंदील यांचे नावे ७/१२ उताऱ्यास नाव मालकी हक्की दाखल आहे.

वर वर्णन केलेली जागा सुशीला विजय गोंदील यांनी त्यांचे प्रापंचीक, आर्थिक अडचणीचे निवारण करणेकरीता म्हणून विक्रीस काढली व नमुद जागा आमचे अशिलाने बाजारभावाने विकत घेण्याचे ठरवून उभयंतांचा व्यवहार झाला. सदर व्यवहाराचे इसारापोटी आमचे अशिलाने इसारा दाखल रक्कम सुशीला विजय गोंदील यांना देऊन नोटरी इसार पावतीचा दस्त केलेला आहे. सुशीला विजय गोंदील यांनी आमचे अशिलास नमूद मिळकत निर्वेध व निजोखीम, बिनबोजाची असल्याची ग्वाही व खात्री दिलेली आहे.

तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील नमूद मिळकतीबाबत कोणाचे काही कायदेशीर हक्क हितसंबंध, खरेदीखत, साठेखत, गहाण, दान, लिज, बोजा, मृत्यूपत्र, दानपत्र, बँक बोजा, खासगी सावकारी कर्ज, नोंदणीकृत अथवा अ-नोंदणीकृत दस्त इ. प्रकारचे कसल्याही प्रकारे कायदेशीर हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसांचे आत संबंधितांनी खालील पत्त्यावर स्वतः अथवा विधिज्ञामार्फत लेखी पुराव्यासह हरकती द्यावेत. वेळेत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल वरील मिळकतीबद्दलचा खरेदी खताचा दस्त लिहून नोंदवून घेतील व खरेदी व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. ता. ०८/०५/२०२६

सही/-
ॲड. आय. सी. तांबोळी
रा. अति. जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी,
मो. नं. ९६८९९०३००१
अशिलातर्फे ॲडव्होकेट



# आयपीएलचा थरार



## महत्त्वाचे

### सौदी प्रो-लीगमध्ये रोनाल्डोचा १००वा गोल

**रियाध** : ख्रिस्तियानो रोनाल्डोने सौदी प्रो-लीगमध्ये आपला १००वा गोल नोंदविला.



रोनाल्डोच्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर अल-नसर संघाने अल-शबाबचा ४-२ ने पराभव करत गुणतालिकेत अव्वल स्थानी पाच गुणांची आघाडी घेतली आहे. सामना संपायला १५ मिनिटे बाकी असताना, या ४१ वर्षीय आक्रमक खेळाडूने सादियो मानेने जवळच्या गोलपोस्टकडे दिलेल्या पासचे गोलमध्ये रूपांतर केले आणि आपल्या कारकिर्दीतील ९७१वा गोल नोंदवला. या हंगामातील त्याचा हा २६वा लीग गोल देखील होता. आक्रमणात असताना रोनाल्डो नेहमीच धोकादायक ठरतो आणि आज पुन्हा एकदा आम्हाला याची प्रचिती आली, असे अल-नसरचे प्रशिक्षक जॉर्ज जीझस म्हणाले. जुलैमध्ये चेल्सीकडून संघात सहभागी झालेल्या जोआओ फेलिक्सने, गुणतालिकेत अव्वल स्थानी असलेल्या या संघासाठी तीन गोल केले. या विजयासह अल-नसरचे ३२ सामन्यांतून ८२ गुण झाले आहेत. ते अल-हिलालपेक्षा पाच गुणांनी पुढे आहेत.

### बीसीसीआयकडून फ्रॅन्चायझींना सूचना

**नवी दिल्ली** : बीसीसीआयने गुरुवारी १० फ्रॅन्चायझींसाठी आठ पानांची एक मार्गदर्शक सूचना जारी केली. यामध्ये आचारसंहितेच्या काही गंभीर उल्लंघनांविषयी चिंता व्यक्त करण्यात आली असून, प्रमाणित कार्यपद्धती निश्चित करण्यात आल्या आहेत; त्यांचे नजीकच्या काळात काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य असेल. सध्या सुरू असलेल्या हंगामात निदर्शनास आलेल्या काही घटनांच्या पार्श्वभूमीवर ही मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आली आहे. आयपीएलशी संबंधित सर्व भागधारकांकडून अपेक्षित असलेली व्यावसायिकता, शिस्त, सुरक्षाविषयक जागरूकता आणि आचारसंहितेचे पालन यांसारखी मानके अधिक दृढ करणे हा यामागील उद्देश आहे, असे बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी १० फ्रॅन्चायझींच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे. या आठ पानी दस्तऐवजात, बीसीसीआयच्या भ्रष्टाचारविरोधी आणि सुरक्षा विभागाने नोंदवलेल्या आचारसंहिता उल्लंघनांच्या घटनांवर बोट ठेवून, वस्तुस्थिती स्पष्ट करण्यात आली आहे.

### सबालेन्का, मेदवेदेव तटस्थ खेळाडू म्हणूनच खेळणार

**नवी दिल्ली** : जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेली आर्यना सबालेन्का व माजी जागतिक क्रमांक १ खेळाडू डॅनिल मेदवेदेव हे दोघेही तटस्थ दर्जासह स्पर्धांमध्ये सहभागी होत राहतील. आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या (आयओसी) धोरणात नुकताच बदल झाला असला, तरी बेलारूस आणि रशियाच्या निलंबनाबाबतची आपली भूमिका कायम असल्याचे आंतरराष्ट्रीय टेनिस महासंघाने स्पष्ट केले आहे. बेलारूसचे खेळाडू पुन्हा एकदा त्यांच्या राष्ट्रीय ओळखीसह स्पर्धांमध्ये सहभागी होऊ शकतात. युक्रेनमध्ये युद्ध सुरू असूनही, त्यांना आता तटस्थ दर्जा मिळवण्यासाठीच्या छाननी प्रक्रियेतून जाण्याची आवश्यकता उरलेली नाही. या निर्णयामुळे टेनिस क्षेत्रातील सध्याच्या निर्बंधांमध्ये कोणताही बदल होणार नाही, असे आयओसीने स्पष्ट केले. बेलारूस आणि रशियन टेनिस महासंघांच्या निलंबनाबाबतच्या आमच्या सध्याच्या भूमिकेत कोणताही बदल झालेला नाही; हे निलंबन अद्यापही कायम आहे, असे आंतरराष्ट्रीय टेनिस महासंघाने नमूद केले.

### सेवानिवृत्त क्रीडाधिकारी नंदकुमार रासने यांचे निधन

**सोलापूर, दि. ८ मे-**
येथील जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालयातील निवृत्त क्रीडाधिकारी नंदकुमार रासने (वय ६४) यांचे अल्प आजाराने निधन झाले. सात रस्ता येथील के. राज फोटो स्टुडिओच्या मागील त्यांच्या निवासस्थानापासून शनिवारी (दि. ९) सकाळी नऊ वाजता अंतयात्रा निघणार आहे.



# पाथुम निसंकाचे अर्धशतक

### दिल्ली कॅपिटल्स ८ बाद १४२




पाथुम निसंका



अनुकूल रॉय : ३१ धावांत २ बळी

◆ **नवी दिल्ली, ८ मे**
१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात येथे खेळल्या जात असलेल्या कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) विरुद्धच्या आयपीएल सामन्यात पाथुम निसंकाच्या अर्धशतकाच्या बळावर दिल्ली कॅपिटल्सला २० षटकांत ८ बाद १४२ धावांपर्यंत मजल मारता आली. केकेआरच्या गोलंदाजांनी प्रभावी मारा करत दिल्लीच्या संघाला चांगलेच दडपणाखाली आणले. त्यामुळे आता केकेआरसमोर विजयासाठी १४३ धावा काढण्याचे सोपे लक्ष्य राहिले.

कोलकाता नाईट रायडर्सचा अजिंक्य रहाणेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पाथुम निसंका व केएल राहुलने दिल्ली कॅपिटल्सच्या डावाची झकास सुरुवात केली, या दोघांनी ४९ धावांची सलामी भागीदारी केली, परंतु त्यांनतर केकेआरच्या फिरकी गोलंदाजांनी सामन्यावर नियंत्रण मिळविले. दिल्ली कॅपिटल्सने १०.५ षटकांत ८९ धावांत निम्मा संघ गमावला.

वेगवान गोलंदाज कार्तिक त्यागीने केएल राहुलला ग्रीनकडून झेलबाद करत दिल्लीला पहिला धक्का दिला. राहुलने १४ चेंडूंत ४ चौकारांसह २३ धावांची भर घातली. पुढे पाथुम निसंकाने नितीश राणा (८), समीर रिझवी (३) ट्रिस्टन स्टब्स (२) सहकार्यांने धावसंख्या वाढविण्याचा प्रयत्न केला, परंतु केकेआरच्या गोलंदाजांनी त्यांना खेळपट्टीवर टिकू दिले नाही.

त्यानंतर कर्णधार अक्षर पटेल (११) व आशुतोष शर्माने (३९) थोडीफार झुंज देत दिल्ली कॅपिटल्सला २० षटकांत ८ बाद १४२ अशी सन्मानजनक धावसंख्या उभारून दिली.

केकेआरकडून अनुकूल रॉय व कार्तिक त्यागीने प्रत्येकी २ बळी, वैभव अरोरा, सुनील नरेन, आणि कॅमेरॉन ग्रीनने प्रत्येकी एक बळी टिपला. (वृत्तसंस्था)

#### पहिल्या ८५ धावांपैकी निसंकाच्या ५० धावा

पाथुम निसंकाने २९ चेंडूंत ५ चौकार व ३ षट्कारांसह ५० धावांची खेळी केली असतानाच रॉयने त्याला रघुवंशीकडून झेलबाद केले. दिल्ली कॅपिटल्सच्या पहिल्या ८५ धावांपैकी ५० धावा निसंकाने १७२.४१ च्या स्ट्राईक रेटने केल्या.

# राजस्थानचे मोठी झेप मारण्याचे लक्ष्य

◆ **जयपूर, ८ मे**
सध्या सुरू असलेल्या इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२६ हंगामाच्या ५२ व्या सामन्यात शनिवारी येथील सवाई मानसिंग स्टेडियमवर राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स आमने-सामने येणार आहेत.

रियान पराग आणि त्यांचा संघ १ मे रोजी दिल्ली कॅपिटल्सकडून सात गडी राखून झालेल्या पराभवानंतर आपला पहिला सामना खेळणार आहे. सात दिवसांच्या विश्रांतीपूर्वी राजस्थान रॉयल्सने १० सामन्यांमध्ये सहा विजय आणि चार पराभव पत्करले आहेत. ते १२ गुणांसह सध्या गुणतालिकेत चौथ्या स्थानावर आहेत.

दुसरीकडे, शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील गुजरात टायटन्सने सलग तीन सामने जिंकले आहेत. १० सामन्यांमध्ये सहा विजय आणि चार पराभवांसह ते १२ गुणांसह गुणतालिकेत पाचव्या स्थानावर आहेत. मात्र, राजस्थान रॉयल्सच्या ०.५१० च्या तुलनेत त्यांचा नेट रन रेट -०.१४७ आहे. सनरायझर्स हैदराबाद (१४), पंजाब किंग्स (१३) व रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (१२) पहिल्या तीन क्रमांकावर आहे.



रियान पराग व शुभमन गिल

#### आजचा सामना

**राजस्थान रॉयल्स वि. गुजरात टायटन्स**
**स्थळ** : सवाई मानसिंग स्टेडियम, जयपूर
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

राजस्थान रॉयल्स या हंगामातील प्रमुख दावेदारांपैकी एक आहे. राजस्थानचा युवा सनसनाटी खेळाडू वैभव सूर्यवंशीने २३७ च्या जबरदस्त स्ट्राईक रेटने ४०४ धावा करून उत्कृष्ट कामगिरी केली आहे, तर यशस्वी जयस्वाल डावाच्या सुरुवातीला शांत व संयमी संतुलन राखतो.

त्यांच्या सर्वात अलीकडील सामन्यात राजस्थान रॉयल्सला दिल्ली कॅपिटल्सकडून ७ गडी राखून पराभव पत्करावा लागला.

पंजाब किंग्सविरुद्धच्या दणदणीत विजयासह गुजरात संघ सलग तीन विजय मिळवून या सामन्यात उतरत आहे. साई सुदर्शन हा संघाचा सर्वोत्तम खेळाडू ठरला असून, त्याने १५८.४४ च्या स्ट्राईक रेटने ३८५ धावा केल्या आहेत, तर कर्णधार शुभमन गिलने स्पर्धेच्या सुरुवातीला तीन अर्धशतकांसह ३७८ धावांचे योगदान दिले आहे. (वृत्तसंस्था)

#### जयपूरची खेळपट्टी फलंदाजीसाठी अनुकूल

आयपीएल २०२६ मध्ये सवाई मानसिंग स्टेडियमवर आतापर्यंत दोन सामने खेळवण्यात आले आहेत.

दोन्ही सामन्यांमध्ये २२६ आणि २२९ धावांचे लक्ष्य मोठ्या फरकाने पार करण्यात आले आहे.

अशा फलंदाजीसाठी अनुकूल खेळपट्ट्यांवर धावांचा बचाव करणे कठीण असल्याने, कोणताही कर्णधार या मैदानावर प्रथम फलंदाजी करण्यास उत्सुक नसतो.

## आयसीसीचा जागतिक क्रिकेटच्या वाढीला चालना देणारा शैक्षणिक कार्यक्रम

◆ **दुबई, ८ मे**
लॉस एंजेलिस ऑलिम्पिक २०२८ च्या पृष्ठभूमीवर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचा शैक्षणिक कार्यक्रम जगभरातील क्रिकेट विकासाला बळकट करण्याचे कार्य अविरतपणे करत आहे. गत पाच वर्षांत या कार्यक्रमांतर्गत ६३,००० हून अधिक नोंदणीकृत वापरकर्त्यांपैकी ४३,००० हून अधिक लोकांनी अभ्यासक्रम पूर्ण केले आहेत.

२०२१ मध्ये सुरू झालेला हा कार्यक्रम, आता क्रिकेट शिक्षण आणि प्रमाणीकरणासाठी आयसीसीचे मुख्य व्यासपीठ बनला आहे. हे अभ्यासक्रम १४ भाषांमध्ये उपलब्ध आहेत आणि यात सहभागी होणारे उमेदवार ह्या ११० सदस्य राष्ट्रांमधून, तसेच ६९ बिगर-सदस्य देशांमधून आले आहेत. आयसीसीच्या माहितीनुसार, त्यांच्या ११० सदस्य राष्ट्रांपैकी १०९ राष्ट्रांमधील प्रतिनिधींनी किमान एक तरी -प्रमाणित अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. या कार्यक्रमात प्रशिक्षक, पंचगिरी, खेळपट्टी व्यवस्थापन आणि जागतिक स्तरावर क्रिकेटचा दर्जा उंचावण्याच्या उद्देशाने आखलेल्या इतर क्षेत्रांचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

# गुकेशने दिला कारुआनाला धक्का

### रॅपिड स्पर्धेत चौथे स्थान



रॅपिड विभागातील गुकेशची कामगिरी

◆ **वॉर्सा, ८ मे**
विश्वविजेता डी. गुकेशने येथे झालेल्या सुपर रॅपिड आणि ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेच्या रॅपिड प्रकारात नवव्या आणि अंतिम फेरीत अमेरिकन ग्रॅण्डमास्टर फॅबियानो कारुआनाला पराभूत करून संयुक्तपणे चौथे स्थान पटकावले. गत काही महिन्यांपासून संघर्ष केल्यानंतर त्याने आपल्या फॉर्ममध्ये स्वागतार्ह पुनरागमन केले आहे.

रॅपिड स्पर्धेनंतर होणाऱ्या ब्लिट्झ विभागात अजून १८ फेऱ्या शिल्लक असून, हा भारतीय खेळाडू संयुक्तपणे चौथ्या स्थानावर आहे.

१९ वर्षीय गुकेशने रॅपिड विभागाच्या अंतिम दिवसाची सुरुवात फ्रान्सचा ग्रॅण्डमास्टर मॅक्सिम वाशियर-लाग्रेव्हकडून पराभवाने केली होती आणि त्यानंतर उपांत्य फेरीत स्लोव्हेनियाच्या व्लादिमीर फेडोसेवसोबत सामना बरोबरीत सोडविला होता.

वाईल्ड कार्ड मिळालेल्या अमेरिकन हॅन्स मोके निमनने एकूण १३ गुण मिळवून या विभागाचा अनपेक्षित विजेता ठरत, आपल्या टीकाकारांना पुन्हा एकदा चुकीचे सिद्ध केले. नीमनने आपला देशबांधव वेस्ली सो याला पूर्ण एका गुणाने हरवले, जो ११ गुणांसह फेडोसेवच्या पुढे दुसऱ्या स्थानी राहिला.

माझी रॅपिड स्पर्धा कठीण होती. मी चांगला खेळत होतो, पण माझ्याकडून काही संधी हुकल्या. काही डावांमुळे मी अडचणीत होतो, पण स्वतःला सावरले. स्पर्धा यापेक्षा चांगली होऊ शकली असती, असे गुकेश म्हणाला. (वृत्तसंस्था)

## कोहलीच्या बळीपेक्षा लखनौचा विजय महत्त्वाचा : प्रिन्स यादव

**लखनौ, ८ मे**
दिग्गज फलंदाज विराट कोहलीची विकेट मिळाल्यावर छान वाटले, पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे लखनौ सुपर जायंट्सने सामना जिंकला. आपला संघ जिंकला याचाच मला सर्वाधिक आनंद आहे, असे वेगवान गोलंदाज प्रिन्स यादव म्हणाला.

प्रिन्स यादवने येथे झालेल्या आयपीएल सामन्यादरम्यान रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा फलंदाजीतील दिग्गज खेळाडू विराट कोहलीला एका अप्रतिम चेंडूवर बाद केले. मात्र, हा तरुण गोलंदाज या गोष्टीचा फार गाजावाजा करू इच्छित नाही. लक्ष्याचा पाठलाग करताना, दुसऱ्याच षटकांत प्रिन्स यादवने एक सनसनाटी चेंडू टाकत कोहलीला पूर्णपणे गोंधळवून टाकले. १४० किमी प्रति तास वेगाने आलेला तो चेंडू आतल्या बाजूला वळला व त्याने कोहलीचा ऑफ स्टंप उखडून टाकला. एप्रिल २०२३ मध्ये राजस्थान रॉयल्सविरुद्ध पहिल्याच चेंडूवर बाद झाल्यापासून, आयपीएलमध्ये कोहली शून्यावर बाद होण्याची ही पहिलीच वेळ होती. वेगळ्या पद्धतीने असो किंवा कोणत्याही एका विशिष्ट मार्गाने, जेव्हा एखादा गोलंदाज विकेट घेतो तेव्हा त्याला नक्कीच छान वाटते.

# मंद्रूपमध्ये आज कुस्ती मैदान; सिकंदर विरुध्द मुसा शेख यांच्यात लढत

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.८ एप्रिल-**
सालाबादप्रमाणे यंदाही पीर शेख साहेब व शेख सालार उरूस निमित्त शनिवारी (दि. ९) जंगी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले असून हिंद व महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख विरुद्ध महान भारत केसरी मुसा खान यांच्यात तीन लाख ईनामाची कुस्ती होणार आहे.

राजेश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व पीर शेख साहेब ट्रस्ट अध्यक्ष शब्बीर मुल्ला यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मंद्रूपचे तहसीलदार विष्णू बुटे व पोलीस निरीक्षक शंकर पटवारी, सरपंच अनिता कोरे व उपसरपंच भगवान व्हनमाने यांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रम संपन्न झाले असून शनिवार ९ मे रोजी सकाळी कलगी तुऱ्यांची गाणे होणार आहेत.



दिवसभर इरण्णा डूम यांच्याकडून महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे. दुपारी चार वाजता जंगी कुस्त्यांचे मैदान भरविण्यात येणार आहे. यावेळी जंगी कुस्त्या स्पर्धा होणार आहेत.

यावेळी कै.खंडू वाघमोडे यांच्या स्मरणार्थ विजेत्या पैलवानांना मानाची गदा भेट देण्यात येणार आहे. यावेळी जामगावचे महाराष्ट्र चॅम्पियन बिरुदेव बनसोडे व बेनापूरचे इंटरनल नॅशनल चॅम्पियन नाथा पवार तसेच कोल्हापूरचे सोहेल शेख व बेनापूरचे महाराष्ट्र चॅम्पियन प्रथमेश पाटील यांच्यात प्रत्येकी ५१ हजार रुपयांची कुस्ती स्पर्धा रंगणार आहे. नामांकीत पैलवान व सीआयएसएफ पोलीस सुनील टेळे व यात्रा कमिटी सदस्य इम्रान मुल्ला यांच्या संयोजना कुस्ती संपन्न होणार आहे.

नितीन टेळे, संतोष बरुरे, सिकंदर आवटे, जावेद तांबोळी , अप्पू शिळ्ळे कुस्तीसाठी प्रयत्न करीत आहेत. तरी भाविकांनी या कार्यक्रमाचे लाभ घेण्याचे आवाहन ट्रस्टी इमरान मुल्ला यांनी केले आहे.

## रेल्वे स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा १५ मे पासून

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मे -**
मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिट्यूट प्रिसिजन पुरस्कृत ७९व्या रेल्वे स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेस बुधवार १५मे पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर रेल्वे क्रीडा संकुलच्या मैदानावर सुरुवात होईल.

मुंबईच्या टाइम्स शिल्ड क्रिकेट स्पर्धेनंतर महाराष्ट्रात सर्वात जुनी गेली ७८ वर्ष अखंडपणे सुरू असलेली व सोलापुरातील एकमेव क्रिकेट स्पर्धा आहे. यंदा या स्पर्धेची सुरुवात ढ-२० पासून होणार असून ब गटामध्ये पहिल्या ३२ संघांना प्रवेश देण्यात आला आहे. स्पर्धेतील विजेत्या व उपविजेता संघांना अनुक्रमे २१ व ११ हजार आणि ट्रॉफी देण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक सामन्यास सामनावीर पुरस्कार ट्रॉफी, उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज, यष्टीरक्षक व मालिकावीर यांना रोख बक्षीस व ट्रॉफी प्रदान करण्यात येणार आहे. नोंदणी व अधिक माहितीसाठी विक्रांत पवार (९४२१०४१५९९) अथवा वासुदेव दोरनाल (९८९०७७९८२९) यांच्याशी संपर्क साधावा, असे इन्स्टिट्यूटचे सचिव किशोर पिल्ले यांनी कळविले आहे.



## सोलापुरात ७ जून रोजी सायक्लोथॉन २०२६चे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मे-**
येथील सायकल रायडर्स क्लबच्या वतीने आंतरराष्ट्रीय सायकल दिनानिमित्त रविवार ७ जून रोजी सोलापुरात सायक्लोथॉन २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती डॉ. रुपाली जोशी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

आरोग्यदायी जीवनशैली, पर्यावरण संवर्धन तसेच फिटनेसबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने या सायक्लोथॉनचे होणार आहे. या उपक्रमामध्ये २५ किमी व ५० किमी अशा दोन गटांमध्ये सायकलिंग स्पर्धा होणार आहे.

याची सुरुवात ७ जून रोजी सकाळी ५:३० वाजता डीएचबी सोनी कॉलेज, विजापूर रोड, येथून होणार आहे. परगावच्या इच्छुकांना ऑनलाईन व्हर्चुअल सहभागाची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. सहभागींना आकर्षक जर्सी, फिनिशर मेडल, गुडीज बॅग, नाश्ता, हायड्रेशन सपोर्ट, रूट सपोर्ट व मेडिकल सपोर्ट उपलब्ध करून देण्यात येणार आहे.



नोंदणीची अंतिम तारीख १५ मे २०२६ असून इच्छुकांनी लवकरात लवकर नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी ९९२१३३५३६३ अथवा ७०८३३१०६६६ येथे संपर्क साधावा.

शहरातील युवक, महिला तसेच सर्व सायकलप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सायकल रायडर्सचे समन्वयक प्रविण जवळकर व डॉ. रुपाली जोशी यांनी केले.

या पत्रकार परिषदेस डॉ. ऋषिकेश चौगुले, जतीन पटेल, दीपक देशपांडे, डॉ. तृप्ती राठी व हिंदुराव गोरे उपस्थित होते.


# पुरुष खो-खो स्पर्धेत ‘महावितरण’ला विजेतेपद

### विद्युत कंपन्यांची राष्ट्रीय स्पर्धा : कुस्ती स्पर्धेत ५ सुवर्ण व २ रौप्य

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. ८ मे-**
येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलामध्ये सुरु असलेल्या अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या ४७ व्या राष्ट्रीय स्पर्धेत महावितरणने कुस्तीच्या १० वजन गटामध्ये ५ सुवर्ण व २ रौप्य पदकांची कमाई करीत सांघिक विजेतेपद मिळवले. तर महावितरणच्या खो-खो संघाने या स्पर्धेवर एकतर्फी वर्चस्व ठेवत विजेतेपदकाची अपेक्षित कमाई केली. तसेच बास्केटबॉलच्या अंतिम लढतीत पंजाब संघाने विजेतेपद मिळवले.

एमएसईबी होल्डिंग कंपनीद्वारे आयोजित या राष्ट्रीय स्पर्धेत शुक्रवारी कुस्तीच्या १० वजनगटामध्ये शुक्रवारी (दि. ८) अंतिम सामने झाले. यात विविध वजनगटानुसार अनुक्रमे विजेते व उपविजेते पुढीलप्रमाणे. ५७ किलो- १) सुदर्शन पाटील (महावितरण) व जर्नेलसिंग (हिमाचल प्रदेश), ६१ किलो- अश्विन मोरे (महावितरण) व सुरेश कुमार (हरियाणा), ६५ किलो- राजकुमार काळे (महावितरण) व अजय कुमार (हिमाचल प्रदेश), ७० किलो- रणवीरसिंग (पंजाब) व आनंद नागरगोजे (महावितरण), ७४ किलो- सुखबीरसिंग (हिमाचल प्रदेश) व नरेंदरसिंग (पंजाब), ७९ किलो- अखिल मुजावर (महावितरण) व शेरोसिंग (पंजाब), ८६ किलो- अजय कुमार (हिमाचल प्रदेश) व दीपक कुमार (राजस्थान), ९२ किलो- बलवीरसिंग (हिमाचल प्रदेश) व अरूण गौड (हरियाणा), ९७ किलो- अमोल गवळी (महावितरण) व मदन (हरियाणा), १२५ किलो- विजेंदरसिंग (हिमाचल प्रदेश) व प्रमोद ढेरे (महावितरण).





यानंतर महावितरण विरुद्ध हरियाणा पॉवर संघामध्ये खो-खोची अंतिम लढत झाली. यात भारतीय खो-खो संघाचा कर्णधार प्रतिक वाईकर याच्यासह निशिकांत शिंदे, विराज कोटमकर, महेंद्र पाटील यांनी महावितरणच्या आक्रमण व संरक्षणामध्ये आक्रमकता कायम ठेवली आणि हरियाणा पॉवर संघाचा दोन गुण आणि एक डाव राखून एकतर्फी विजय मिळवला. कबड्डीमध्ये महावितरणने अंतिम फेरीत प्रवेश केला असून तुल्यबळ व मागील विजेता हिमाचल प्रदेशशी लढत होणार आहे. महावितरणने बीएसईएस दिल्ली संघाचा ३६ विरुद्ध १० असा एकतर्फी पराभव करीत अंतिम फेरी गाठली. तर हिमाचल प्रदेशने हरियाणा पॉवर संघाचा ४८ विरुद्ध २८ असा पराभव करीत अंतिम फेरीमध्ये महावितरणला आव्हान दिले आहे.

बास्केटबॉलच्या अंतिम सामन्यात पंजाब संघाने (४५) हरियाणा संघाला (३०) १५ गुणांनी विजय मिळवत स्पर्धेतील विजेतेपद मिळवले. पंजाबकडून हरप्रित सिंग यांनी संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. तर तृतीय स्थानासाठी अत्यंत चुरशीच्या व शेवटच्या क्षणापर्यंत उत्कंठा निर्माण झालेल्या बास्केटबॉलच्या लढतीत महावितरण संघाने (२३) राजस्थान संघाचा (२१) केवळ २ गुणांनी पराभव केला. महावितरणकडून भारत मराठे यांनी शेवटच्या क्षणाला दोन गुणांची कमाई करीत संघाला विजयी केले. या लढतीत कृष्णा लाड, किशोर सपकाळे यांनीही चमकदार कामगिरी केली.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# दहावीच्या निकालात मुलींचीच सरशी; बार्शी तालुक्याचा निकाल ९३.७९ टक्के

- मुलींचे उत्तीर्ण प्रमाण ९६.८०%, मुलांचे ९३.२६%
- सिल्व्हर ज्युबिली हायस्कूल शहरात अव्वल; तालुक्यातील ३३ शाळांचा १०० टक्के निकाल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ मे-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) परीक्षेचा निकाल आज शुक्रवार, ८ मे रोजी जाहीर करण्यात आला. यंदाही दहावीच्या निकालात मुलींनी बाजी मारत आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. बार्शी तालुक्याचा एकूण निकाल ९३.७९ टक्के लागला असून, मुलींचे उत्तीर्ण प्रमाण ९६.८० टक्के तर मुलांचे ९३.२६ टक्के इतके नोंदविण्यात आले आहे.

बार्शी शहर व तालुक्यातून एकूण ५ हजार ९१४ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यामध्ये ३ हजार ४८१ मुले आणि २ हजार ४३३ मुलींचा समावेश होता. त्यापैकी ३ हजार २११ मुले व २ हजार ३३६ मुली असे ५ हजार ५४७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. शहरातील सिल्व्हर ज्युबिली हायस्कूलने १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखत शहरात अव्वल स्थान पटकावले आहे. तर सुलाखे हायस्कूल आणि महाराष्ट्र विद्यालयाचा निकाल ९६ टक्क्यांहून अधिक लागला आहे. तालुक्यातील तब्बल ३३ शाळांनी १०० टक्के निकाल नोंदवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

### बार्शी तालुक्यातील ३३ शाळा शंभर नंबरी

सिल्व्हर ज्युबिली हायस्कूल बार्शी, माध्यमिक आश्रम शाळा खामगाव, कै. सी. एल. घोडके विद्यालय मळेगाव, ममदापूर विद्यालय ममदापूर, रणजितसिंह मोहिते पाटील विद्यालय झाडी, जय हनुमान प्रशाला झरेगाव, नागनाथ प्रशाला जामगाव, कै. लक्ष्मणराव डुरे पाटील प्रशाला इर्ले, श्री हनुमान विद्यामंदिर कव्हे, दिलीपराव सोपल विद्यालय हळदुगे, छत्रपती शिवाजी विद्यालय जवळगाव, छत्रपती शिवाजी विद्यालय बाभूळगाव, स्वामी विवेकानंद विद्यालय, श्रीराम विद्यालय धोत्रे, भैरवनाथ माध्यमिक विद्यालय गुळपोळी, भगवान बाबा विद्यालय चुंब, आदर्श विद्यालय रातंजन, शारदादेवी प्रशाला वैराग, न्यू इंग्लिश स्कूल उंडेगाव, कासारी विद्यालय कासारी, न्यू हायस्कूल पिंपळवाडी, न्यू माध्यमिक प्रशाला, सरस्वती विद्यामंदिर उकडगाव, जनाबाई जाधव प्रशाला राळेरास, सरस्वती विद्यालय नारी, दिलीप सोपल विद्यालय सुर्डी, श्री बळवंतराव घाटे प्रशाला यावली, कर्मवीर विद्यालय चारे, विद्यामंदिर कन्या प्रशाला वैराग, संत ज्ञानेश्वर विद्यालय भातंबरे, तुळशीदास जाधव प्रशाला वैराग, यशवंतराव चव्हाण प्रशाला तडवळे आणि वखारिया विद्यालय उपळे दुमाला या शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे.

**महाराष्ट्र विद्यालयाचा उल्लेखनीय निकाल**

महाराष्ट्र विद्यालयाचा एकूण निकाल ९६.३८ टक्के लागला असून, विद्यालयातील तब्बल ५३ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत यश मिळवले आहे.

विद्यालयातील आदिती रविंद्र पाटीलने ९७.२०% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. सिद्धी चंद्रकांत लोकरे हिने ९६.६०% (द्वितीय), आदर्श अनंत बोधले याने ९६% (तृतीय)

**सिल्व्हर ज्युबिली प्रशालेत समृद्धी उकिरडे प्रथम**

सिल्व्हर ज्युबिली प्रशालेत समृद्धी संतोष उकिरडे हिने ९७ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. अथांग गणेश ऐनापूरे ९५.२०% गुण मिळवित द्वितीय तर श्रुती दत्तात्रय केवळे हिने ९५% गुण मिळवित तृतीय स्था मिळविले.

**नवलेची चमकदार कामगिरी**

सुलाखे हायस्कूलमधील अभिनंदन चंद्रकांत नवले याने तब्बल ९९.४० टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. शाळेतील ४७ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत उल्लेखनीय यश मिळवले आहे.

**शेठ अगरचंद कुंकूलोळ प्रशालेचा निकाल ९० टक्के**

शेठ अगरचंद कुंकूलोळ रोड प्रशालेचा निकाल ९० टक्के लागला असून,सोहम सुरेश परदेशी ८३.४०% (प्रथम), श्रावणी ज्ञानेश्वर आवटे ८१.८०% (द्वितीय), वैभवी चंद्रशेखर राऊत ८०.८०% (तृतीय)

**कर्मवीर विद्यालय, चारेचा शंभर टक्के निकाल**

चारे (ता. बार्शी) येथील कर्मवीर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला आहे. प्रगती गायकवाड ९६.४० टक्के (प्रथम), दिव्या अविनाश जाधव ९५.२० टक्के (द्वितीय), सोनाली रविंद्र जाधवर ९४.६० टक्के (तृतीय), साक्षी दादासाहेब जाधवर ९४.४० टक्के (चतुर्थ), सचिन लक्ष्मण मुंडे ९३.२०% (पंचम).

**बार्शी टेक्निकल हायस्कूलचा निकाल ८२.७० टक्के**

बार्शी टेक्निकल हायस्कूलचा निकाल ८२.७० टक्के लागला असून, उत्कर्ष उमेश काशीद ९१.८०% (प्रथम), कृष्णा संदीपकुमार बळी ८३.७०% (द्वितीय), श्रुती रविराज पाटील ८२.८०% (तृतीय)

## महत्वाचे...

### लोकविकास स्कूलचा दहावीचा शंभर टक्के निकाल

**वेळापूर, दि. ८ मे-**



वेळापूर येथील लोकविकास इंग्लिश मिडीयम स्कूलने दहावीच्या निकालात शंभर टक्के यश संपादन करत उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे. शाळेतील दहावी बोर्ड परीक्षेसाठी बसलेल्या सर्व ७ विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या उत्तीर्ण होत शाळेची यशस्वी परंपरा कायम राखली. या निकालामध्ये प्रज्वल दिपक जाधव याने ७८ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. वैष्णवी बिरुदेव ऐवळे हिने ७४.४० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक, तर श्रावणी सतीश पिसे हिने ७१.२० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक संपादन केला. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक जालिंदर बनकर, सचिव चंद्रकांत नवले, ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य अमोल पांढरे, लोकविकास मराठी मिडीयम स्कूलचे मुख्याध्यापक सुनील पताळे, तसेच लोकविकास इंग्लिश मिडीयम स्कूलचे मुख्याध्यापक अजित बनकर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### बार्शी शहर पोलिस ठाण्याची सामाजिक कार्यात कौतुकास्पद कामगिरी

**बार्शी दि. ८ मे-**

बार्शी शहरातील गजबजलेल्या बस स्थानकात सकाळची वेळ होती. सकाळी साधारण ११ वाजण्याचे सुमारास डायल ११२ वर कॉल आला की, एक पाच वर्षाचा मुलगा बस स्थानक बार्शी येथे असून त्याचे सोबत त्याचे नातेवाईक कोणीही नाही. लागलीच डायल ११२ वरील कर्मचारी पोकाँ/ ४१२ मोहन कदम यांनी कॉल घेवुन सदरची माहिती पोलीस निरीक्षक श्री. बालाजी कुकडे यांना देवुन पोकॉ/४१२ कदम हे बस स्थानक बार्शी येथे जावुन हरवलेल्या मुलास ताब्यात घेउन त्यास पोलीस ठाणे येथे आणले. त्याची चौकशी केली असता त्याने त्याचे नाव तोकड्या शब्दात अदिराज औदुंबर कुंभार असे सांगितले. सदर मुलाच्या आई वडिलांचा तात्काळ शोध घेण्यासाठी प्रयत्न केला. सोशाल मीडियाव्दारे व व्हॅटसॉपव्दारे आईचा मोबाईल नंबर प्राप्त करुन त्यांना त्यांचा मुलगा बार्शी शहर पोलीस ठाणे येथे सुखरुप आहे, असे सांगितले. सदर मुलाची आई दिपाली औदुबर कुंभार, रा. कसई, ता. तुळजापूर ही परंडा येथुन बार्शी शहर पोलीस ठाणे येथे आल्या. त्यांना त्यांचा मुलगा पाहुन अश्रु अनावर झाले होते. स्वतःला सावरत त्यांनी त्यांचे मुलास मिठी मारली. त्या दोघांना पो.नि. यांचे समक्ष हजर केले. पो.नि. कुकडे सा़ यांनी मुलाचे आईस मुलाची काळजी व दक्षता घेण्याबाबत मार्गदर्शन करुन सदर मुलास सुखरुप आईचे ताब्यात दिले. सदरची कामगिरी ही बार्शी शहर पोलीस ठाणेकडील पोकाँ/१५३ राउत, पोकाँ/४१२ मोहन कदम, पोकाँ/ ९१८ वैभव भांगे यांनी केलेली आहे. पोलीस निरीक्षक श्री. बालाजी कुकडे यांनी नागरिकांना आवाहन केले की, प्रवासादरम्यान आपल्या लहान मुलांची काळजी घ्यावी.

### सुयश विद्यालयाचे दहावी परीक्षेत यश

**सोलापूर, दि. ८ मे-**

मार्च २०२५-२६ मध्ये घेतलेल्या दहावी परीक्षेचा निकाल लागला त्यात आमच्या सुयश गुरूकुल १०वी चे ४१ विद्यार्थी बसले होते. त्यात १८ विद्यार्थी ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झाले. २० विद्यार्थ्यांना ८० ते ९० टक्के गुण मिळाले. तसेच सुयश विद्यालय मध्ये ३८ विद्यार्थी बसले होते पैकी १३ विद्यार्थी ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविले. १५ विद्यार्थ्यांना ८०-९० टक्के गुण मिळाले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव केशव शिंदे, विद्या शिंदे, सुयश गुरूकुल मुख्याध्यापिका श्रद्धा लकडे आणि सुयश विद्यालयाचे मुख्याध्यापक मार्तंड कुलकर्णी व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले. **यशस्वी विद्यार्थी :** अक्षरा श्रीगणी (९८.२० टक्के), समृद्धी थोरात (९७.६० टक्के), स्नेहा जाधव (९५.६०टक्के), अभिजीत राठोड (९५.६०%), संस्कार थोरात (९४.८०टक्के) सुयश गुरूकुल : सुस्मिता कोळी (९६.४०टक्के), साई हरवाळकर (९६.२० टक्के), नक्षत्र जानकर (९५.८०%), सार्थक शिंदे (९५.६०टक्के), आरव हत्ते (९५.२० टक्के)

### अरविंद धाम पोलीस वसाहतसमोर तरुणाला सळई; बॅट व चॉपरने मारहाण

**सोलापूर, दि. ८ मे-**

अज्ञात कारणावरून एका तरुणाला सळई ,बेसबॉल बॅट आणि लोखंडी चॉपरणे मारहाण करण्यात आल्याची घटना अरविंद धाम पोलीस वसाहत समोर आज शुक्रवारी पहाटे साडेबारा वाजता घडली. अनुराघ महेश मोरे (वय २३ वर्ष ,रा . फॉरेस्ट , ११० रेल्वे लाईन सोलापूर ) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव असून तो आज पहाटे अरविंद घाम पोलीस लाईन समोरील रस्त्यावर असताना त्याला अजय पाडवी ,संजय पाडवी व इतर एक जणांनी मिळून मारहाण केली. यात पाठीस जखम व सर्व अंगाला मुकामार लागल्याने त्याला येथील शासकीय रुग्णालयात मित्र निखिल पंगुडवाले यांनी पहाटे तीन वाजता दाखल केले.

### नांदणी ब्रिजजवळ सिमेंट बलकरची दुचाकीला धडक; दोघे जखमी

**सोलापूर, दि. ८ मे-**

सिमेंट बलकर वाहनाने पाठीमागून धडक दिल्याने दुचाकी वरील दोघे जखमी झाल्याची घटना सोलापूर -विजापूर महामार्गावर नांदणी ब्रिज जवळ आज शुक्रवारी सायंकाळी पावणे सहा वाजता घडली. शिवलिंगप्पा चन्नप्पा कुंभार (वय ४५ वर्ष ) आणि श्रीशैल पंचप्पा कुंभार ( २४ वर्ष, दोघे रा. टाकळी , दक्षिण सोलापूर ) अशी जखमी ची नावे असून ते दोघे आज शुक्रवारी सायंकाळी मंद्रूप कडून टाकळी कडे दुचाकी वरून डबल शीट जात असताना नांदणी ब्रिज जवळ (एम एच १२ यु एम २९८१ ) या सिमेंट बलकर वाहनाने पाठीमागून धडक दिली. यात दोघे मार लागून जखमी झाल्याने त्यांना उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात भाऊ तुषार कुंभार याने सायंकाळी दाखल केले.

## निधन वृत्त...

### किरण भडंगे



**सोलापूर, दि. ८ मे-**

नामदेव शिंपी समाजातील जेष्ठ व्यक्तिमत्व किरण ज्ञानेश्वर भडंगे यांचे अकस्मात निधन झाले. ते ६० वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई व नातवंडे असा परिवार आहे. कारंबा नाका स्मशानभूमी येथे अंत्यविधी करण्यात आला.

## बार्शीतील आरटीई प्रवेश प्रक्रियेत मोठा घोळ; तहसीलदारांच्या बैठकीत २५ बोगस प्रवेश उघड

**बोगस प्रवेश रद्द करुन प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना संधी द्या : तहसीलदार शेख**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ मे -**

बार्शीशहरातीलसुयशविद्यालय व तालुक्यातील तांदुळवाडी येथील सुयश विद्यालय येथील आरटीई प्रवेश प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा गंभीर प्रकार तहसीलदारांच्या बैठकीत उघड झाला आहे. २५ बोगस प्रवेश झाल्याचे उघडकीस आले आहे. त्यावर तहसिलदार शेख यांनी बोगस प्रवेश रद्द करुन प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना संधी देण्याचे आदेश दिले.

पात्र विद्यार्थ्यांवर अन्याय करून अपात्र विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आल्याचा आरोप संतप्त पालकांनी केला होता. या प्रकरणाची गंभीर दखल घेत तहसीलदार एफ. आर. शेख यांनी गुरुवार, दि. ७ मे रोजी तहसील कार्यालयात संबंधित अधिकारी, तपासणी पथक व पालकांची संयुक्त बैठक घेतली. बैठकीत पालकांनी सादर केलेली कागदपत्रे, पुरावे तसेच दि. ६ मे रोजी आलेल्या वृत्तानंतर तपासणी पथकातील अधिकाऱ्यांनी धक्कादायक कबुली दिली. आरटीई अंतर्गत प्रवेश मिळालेल्या ७८ विद्यार्थ्यांपैकी प्रथम दर्शनीत तब्बल २५ प्रवेश हे बोगस भाडेकरारपत्रे व खोट्या आधार कार्डाच्या आधारे झाल्याचे अधिकाऱ्यांनी तहसीलदारांसमोर मान्य केले.

पालकांच्या म्हणण्यानुसार, शाळेजवळ वास्तव्य दाखवण्यासाठी बनावट भाडेकरार तयार केले होते. अर्ज भरताना चुकीचे लोकेशन वापरणे, खोट्या कागदपत्रांच्या आधारे पात्रता दाखवणे अशा प्रकारांनी खऱ्या गरजू विद्यार्थ्यांवर अन्याय करण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. या सर्व प्रकारानंतर गटशिक्षणाधिकारी बालाजी नाटके यांनी बैठकीत बोगस आढळलेले २५ प्रवेश रद्द करण्यात येतील. तसेच प्रतीक्षा यादीतील पात्र विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी दिली जाईल, अशी ग्वाही दिली.

## निर्मला ठोकळ प्रशालेचा दहावी परीक्षेचा निकाल 100 टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मे-**



श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशालेचे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा(इ.१०)फेब्रु/मार्च २०२६ चा निकाल १०० टक्के लागला असून प्रशालेतून अनुश्री कांबळे हिने ९६.८० टक्के गुण मिळवून प्रथम, वर्षा गावडे हिने ९४.६० टक्के गुण मिळवून *द्वितीय* तर हर्षदा ढगे हिने ९३:०० गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकाविला.

परीक्षेस प्रशालेतील १५२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. एकूण विद्यार्थ्यांपैकी ८ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. त्यात शरयू बेदरे ९२.४०%, प्रिया भडकुंबे ९१.८०, वैभवी गुंड ९१.२०, श्रीनिवास जमादार ९१:२०, मृणाली माने ९१:०० यांचा समावेश आहे. एकूण विद्यार्थ्यांपैकी ५७ विद्यार्थी विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण झाले असून ७१ विद्यार्थी हे प्रथम श्रेणीत तर द्वितीय श्रेणीत २० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. दहावीतील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष विपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, संस्थेचे सचिव भिकाजी गाजरे, संचालिका शिल्पा ठोकळ, प्राचार्य डी. डी. गाजरे , पर्यवेक्षिका भोसले ए. आर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अभिनंदन केले आहे.



## लोकवर्गणीतून शेलगाव (क) येथे हनुमंताच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि. ८ मे-**

शेलगाव क (ता.करमाळा) येथे पूजा,होम हवन करून हनुमंताच्या जुन्या मूर्तीचे विसर्जन व विधिवत नवीन मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. याप्रसंगी दोन दिवस कीर्तन, भजन अशा धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केलेले होते. पंढरपूर येथून हनुमंताची मूर्ती आल्यानंतर त्याची गावातून मिरवणूक काढण्यात आली आणि त्यानंतर सदर मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली.

नागनाथ महाराज यात्रा उत्सव समितीच्या वतीने उत्सवातील शिल्लक रकमेतून मंदिराच्या जिर्णोद्धाराचे काम हाती घेण्यात आलेले आहे.

यात्रा उत्सवातून शिल्लक राहिलेल्या रकमेमधून गावातील सर्व मंदिरांचा जीर्णोद्धार करण्याचा संकल्प ग्रामस्थांनी केलेला आहे. यापूर्वी ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून व विकास निधीतून गावातील जिल्हा परिषद शाळेचा व अंगणवाडीचा चेहरा मोहरा बदललेला आहे. आता मंदिरांचा चेहरा मोहरा बदलण्याचा ध्यास त्यांनी घेतलेला आहे.

मारुती मंदिराचा जीर्णोद्धार करण्यासाठी पुढाकार घेणारे आजिनाथ वीर व आत्माराम वीर यांचा ग्रामस्थांच्या वतीने सन्मान करण्यात आला. प्रसाद व भोजनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली

## मंत्री आठवले यांनी जपले ऋणानुबंध

**अकलूज दौऱ्यात मान्यवरांच्या भेटी; कार्यकर्त्यांना बळ**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ८ मे-**



केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी अकलूज दौऱ्यात जुन्या ऋणानुबंधांची जपणुक केली. जुन्या राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांच्या भेटी घेत आठवणींना उजाळा दिला. त्यांच्या या कार्याने त्यांच्या कार्यकर्त्यांना मोठे बळ मिळाले आहे.

आठवले यांचा दौरा केवळ राजकीय कार्यक्रम न ठरता, जुने सहकारी, सामाजिक बांधिलकी आणि चळवळीतील ऋणानुबंध जपणारा भावनिक दौरा ठरला. त्यांनी सामाजिक, राजकीय आणि आंबेडकरी चळवळीशी असलेले आपले जिव्हाळ्याचे संबंध पुन्हा अधोरेखित केले. प्रारंभी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांची सदिच्छा भेट घेत विचारपूस केली. भेटीत जुने राजकीय संबंध, राज्यातील सामाजिक प्रश्न तसेच अकलूज परिसरातील विकासकामांवर चर्चा झाल्याचे समजते. दोन्ही नेत्यांमधील आत्मीयता आणि परस्पर सन्मान दिसून आला.

शिवरत्न बंगल्यावर उपस्थित ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत कुंभार यांचीही आठवले यांनी आस्थेवाईक विचारपूस केली. कुंभार हे आठवले यांच्या पहिल्या निवडणुकीचे प्रचार प्रमुख होते. अनेक वर्षांनंतरही जुने सहकारी आणि स्नेहबंध जपण्याची आठवले यांची भूमिका यावेळी पुन्हा अधोरेखित झाली. यानंतर आठवले यांनी दलित चळवळीतील ज्येष्ठ नेते पी. एस. गायकवाड यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची आस्थेवाईक विचारपूस केली. भेटीत जुने आंदोलनाचे दिवस, दलित पँथर चळवळीतील संघर्ष, समाज परिवर्तनासाठी केलेले कार्य आणि त्या काळातील आठवणींना उजाळा दिला. सामाजिक न्यायासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांप्रती आजही बांधिलकी कायम असल्याचे त्यांनी दाखवले.

अकलूज येथील सारनाथ बुद्ध विहारला भेट देत भगवान गौतम बुद्धांना अभिवादन केले. बुद्ध विहार परिसराची पाहणी करताना विकासकामांविषयी माहिती घेतली.

भव्य-दिव्य बौद्ध वास्तू उभारण्याचा संकल्प व्यक्त केला. कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. त्यांच्या या घोषणेमुळे बौद्ध बांधव आणि कार्यकर्त्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. याच दौऱ्यात रिपब्लिकन चळवळीतील धडाडीचे कार्यकर्ते के. डी. उर्फ किरण धाईंजे यांच्या परिवारालाही सदिच्छा भेट दिली. भेटीत त्यांनी कार्यकर्त्यांशी मनमोकळा संवाद साधला. त्यामुळे अकलूज परिसरातील रिपब्लिकन, आंबेडकरी आणि सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

## सोलापूर झेडपीचे तत्कालीन सीईओ अरुण डोंगरे यांची अमरावतीचे सेवा हक्क आयुक्तपदी नियुक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मे-**

अमरावती विभागात उपजिल्हाधिकारी म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात करणारे आणि आपल्या कामाची छाप सर्वसामान्यांवर सोडणारे सेवानिवृत्त आयएएस अधिकारी अरुण डोंगरे यांची आता 'अमरावती , राज्य सेवा हक्क, आयुक्त' या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. डोंगरे यांच्या नियुक्तीमुळे प्रशासकीय कामात पारदर्शकता आणि सर्वसामान्यांना वेळेत सेवा मिळण्याच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

७ जानेवारी १९९१ रोजी अमरावती विभागात उपजिल्हाधिकारी म्हणून रुजू झालेल्या अरुण डोंगरे यांनी मंगरूळपीर, मूर्तिजापूर, दारव्हा आणि अचलपूर येथे उपविभागीय अधिकारी म्हणून काम केले आहे. त्यानंतर अमरावतीचे अतिरिक्त जिल्हाधिकारी आणि उपायुक्त (महसूल) म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली. अमरावती महापालिका आयुक्त असताना त्यांनी 'ऑनलाइन बिल्डिंग परमिशन' सुरू करून भ्रष्टाचाराला लगाम लावला होता. स्वच्छ भारत अभियानमध्ये सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी



असताना त्यांनी जिल्ह्याला महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळवून दिला. याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महानायक अमिताभ बच्चन यांच्या हस्ते त्यांचा सत्कार झाला होता.

नांदेडचे जिल्हाधिकारी असताना जलयुक्त शिवार योजना प्रभावीपणे राबवून टंचाईवर मात केली. तसेच मोठे कॅन्सर डिटेक्शन शिबिर आयोजित करून सामाजिक बांधिलकी जपली. म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी असताना भाडेकरूंचे हक्क अबाधित राखण्यासाठी आणि त्यांना वेळेवर भाडे मिळण्यासाठी महत्त्वपूर्ण शासन निर्णय निर्गमित करून घेतले. राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त म्हणून अरुण डोंगरे आता सामान्य जनतेला शासनाकडून मिळणाऱ्या सेवा (उदा. दाखले, परवाने) वेळेत मिळतात की नाही, यावर नियंत्रण ठेवतील. शासनाने निश्चित केलेल्या कालावधीत सेवा न मिळाल्यास संबंधित अधिकाऱ्यावर दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार आयुक्तांना आहेत. एखादा विभाग टाळाटाळ करत असेल, तर नागरिक आयुक्तांकडे दाद मागू शकतात. सरकारी कामात पारदर्शकता आणणे आणि 'लोकशाही' खऱ्या अर्थाने राबवणे हे त्यांचे मुख्य कार्य असेल. अरुण डोंगरे यांनी साईबाबा संस्थान (शिर्डी) आणि नागपूर फ्लाइंग क्लब येथेही मोलाची कामगिरी बजावली आहे. आता त्यांच्या या अनुभवाचा फायदा अमरावती विभागातील सर्वसामान्य जनतेला त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी होणार आहे.

# जिल्ह्यात सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये वाजणार ७०१ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीचे पडघम?

## ग्रामपंचायतींच्या प्रभाग रचनेचा कार्यक्रम पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मे-**

सोलापूर जिल्ह्यातील एकूण १,१२७ पैकी ७०१ ग्रामपंचायतींची मुदत फेब्रुवारी अखेर संपली आणि त्याठिकाणी सध्या प्रशासक काम पाहत आहेत. जिल्हा प्रशासनाकडून अशा ग्राम पंचायतीच्या प्रभाग रचनेचा कार्यक्रम नुकताच पार पडला. या सर्वच ग्रामपंचायतीमधील कोणत्याही प्रभागाची रचना बदललेली नाही आणि आहे त्या प्रभागाच्या पूर्वीच्या रचनेनुसारच निवडणुकाचा कार्यक्रम पार पडणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून मिळाली. दरम्यान, या निवडणुकांचा बार दिवाळीपूर्वी किंवा दिवाळीतच उडण्याची शक्यता आहे.

अक्कलकोट तालुक्यातील ७३, बार्शीतील १५, करमाळ्यातील ५१. माळ्यातील ८२, माळसिरसमधील ४३. मंगळवेजपातील २४, मोहोळमधील ७२ पंढरपुरातील ७२, सांगोल्यातील ६१, उत्तर सोलापूरमधील २३ व दक्षिण सोलापूर तालुक्यातील ५१ ग्रामपंचायतीत प्रशासक राज आहे. फेब्रुवारी अखेर या ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांची मुदत संपली होती; आता निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार या ग्रामपंचायतीच्या निवडणुका पार पडणार आहेत. आता आरक्षणाचा कार्यक्रम होणार असून, यानंतर मतदार यादी प्रसिध्दीकरण होणार आणि तद्नंतरच निवडणुकीचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाकडून जाहीर होणार आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरपंच निवडीसाठी आणलेली जनतेतून सरपंच ही पध्दत याही ग्रामपंचायत निवडणुकीत वापरली जाणार आहे. सरपंचपदासाठी आरक्षण सोडत निघाली आहे. आता प्रभाग रचना, प्रभाग रचनेची आरक्षण निश्चिती, सुनावणी, त्यानंतर निवडणूक कार्यक्रम होणार आहे. जिल्ह्यातील ७०१ ग्राम पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासनाने तयार केलेल्या प्रारूप प्रभाग रचनेच्या प्रस्तावाला विभागीय आयुक्तांनी हिरवा कंदील दाखवला आहे, ज्यामुळे निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे.



### पालकमंत्र्यांची जादू चालणार का?

सोलापूर महापालिका, जिल्हा परिषदेसह जिल्ह्यातील विविध नगरपालिका, पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्ये पालकमंत्री गोरे यांची जादू चांगलीच चालली होती. याकडे लक्ष वेधताना आता ग्रामपंचायत स्तरावरील निवडणुकीतही गोरे आपला विजयाचा करिष्मा कायम ठेवणार का? याबाबत चर्चा रंगू लागल्या आहेत.



# वडिलांचे प्रेत घरात... 'धनश्री'ने दिली परीक्षा... मिळविले ६५ टक्के मार्क

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.८ मे-**

येथील शरदचंद्र पवार प्रशालेमध्ये इयत्ता दहावीच्या वर्गात शिकत असणाऱ्या धनश्री पवारचे वडील भिकाजी पवार यांचे दि.२० फेब्रुवारी २०२६ रोजी निधन झाले होते. घरात वडिलांच्या अंत्यविधीची तयारी सुरु होती. प्रशालेचे मुख्याध्यापक तानाजी माने यांनी धनश्री व तिच्या नातेवाईकांना समजावून सांगत दोन तास अंत्यविधी पुढे ढकलायला लावून धनश्रीला दहावीचा मराठी पेपर देण्यासाठी घेऊन गेले होते.

दीड तास 'धनश्री'ने पेपर लिहून ती अर्ध्यातून वडिलांच्या अंत्यविधीला घरी आली होती. आज दहावीचा रिझल्ट लागला. मराठी विषयाला ६५ मार्क घेऊन ती उत्तीर्ण झाली आहे. मुख्याध्यापक तानाजी माने, शिक्षक राजाराम शितोळे, नितीन मिस्कीन, श्रीराम बरगंडे, आनंद कोळी, श्वेता बाळशंकर, सुलक्षणा भरगंडे, अर्चना शिंदे, स्वाती नागटिळक, मंजुळा संगा, वैशाली सोनटक्के यांनी आज धनश्रीचा घरी जाऊन सत्कार केला व तिला शुभेच्छा दिल्या.

### वडिलांचे स्वप्न पूर्ण करणार

दहावीनंतर व्होकेशनल कोर्स एमएलटी करुन स्वतः च्या पायावर उभा राहून वडिलांचे स्वप्न पूर्ण करणार असल्याचे धनश्रीने सांगितले. याप्रसंगी धनश्रीची आई सुप्रिया पवार, भाऊ विजय पवार व बारावी उत्तीर्ण झालेली बहीण वैष्णवी उपस्थित होते.



# जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते विनित गोयल यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ८ मे-**

कोहिनूर इन्फिनिटी ग्रुप सर्वेसर्वा स्वर्गीय कृष्णकुमार गोयल यांचे सुपुत्र तथा भारतातील सुप्रसिध्द उद्योगपती विनित गोयल यांची नुकतीच महाबळेश्वर येथे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांची म हाबळेश्वर येथे नुकतीच भेट झाली. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्यावतीने संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते उद्योगपती विनित गोयल यांचा समर्थाची मूर्ती शिव प्रतिमा कृपावस्त्र देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले, शिवराज स्वामी, सरफराज शेख, मोरे, सायबण्णा जाधव उपस्थित होते.

# सिलिंग जमिनींसंदर्भात निर्णय; ६ हजार ४०० लाभार्थ्यांना फायदा

## १२ हजार २६० हेक्टरचे वर्ग १ मध्ये रुपांतर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ मे-**

'सिलिंग' अंतर्गत मिळालेल्या शेतजमिनी (वर्ग-२) आता वर्ग-१ मध्ये रुपांतरित करण्याचा मार्ग अधिक स्पष्ट आणि सुलभ करण्यात आला. या शासन निर्णयाचा सोलापूर जिल्ह्यातील ६ हजार ४०० लाभार्थींना फायदा होणार आहे. यामुळे १२ हजार २६० हेक्टरचे वर्ग १ मध्ये रुपांतर होणार आहे, अशी माहिती उपजिल्हाधिकारी (महसूल) लक्ष्मण कसेकर यांनी दैनिक तरुण भारतशी बोलताना दिली.

महसूल व वन विभागाने ४ मे २०२६ रोजी अधिसूचना जारी करत नवीन नियम लागू केले आहेत. या निर्णयामुळे जमीनधारकांना त्यांच्या जमिनीवर पूर्ण मालकी हक्क मिळवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. जमीन व्यवहार, गुंतवणूक आणि आर्थिक क्रियाकलापांना चालना मिळण्याची अपेक्षा आहे. विशेषतः ग्रामीण आणि अर्धशहरी भागातील हजारो कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे.


सिलींग कायदा म्हणजे १९७० ते १९७६ साली मोठ्या शेतकऱ्यांकडील जास्तीच्या जमिनी कायदेशीरपणे सरकारने ताब्यात घेवून त्या जमिनी माजी सैनिक, शेतमजूर, भूमिहिन लोकांना दिल्या होत्या; मात्र आजतागायत अशा जमिनीचे व्यवहार संबंधित लाभार्थ्यांना करता येत नव्हते किंवा त्या जमिनीवर कर्जही काढता येत नसे. यामुळे महसूल विभागाकडून वर्ग २ च्या जमिनी वर्ग १ मध्ये रुपांतरित करण्याचा कायदा निर्माण केला आहे.

**महसूल वाढीसह गुंतवणुकीला चालना**

वर्ग-२ जमिनींचे वर्ग-१ मध्ये रुपांतर झाल्यास त्या जमिनींचा वापर, विक्री, गहाण ठेवणे आणि विकास प्रकल्पांसाठी उपयोग करणे अधिक सुलभ होणार आहे. परिणामी, बँकांकडून कर्ज मिळवणेही सोपे होईल. या सर्व प्रक्रियेमुळे शासनाच्या महसुलातही काही प्रमाणात वाढ होणार आहे.

# पाणी टंचाई निवारणासाठी जिल्हा परिषद सज्ज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ मे-**



जिल्ह्यातील वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर संभाव्य पाणीटंचाई आणि सिंचन व्यवस्थेतील अडचणी टाळण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासन सज्ज झाले आहे. दि.८ मे २०२६ रोजी पार पडलेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीच्या बैठकीत विविध विभागांना सूचना देत समस्यांचे तातडीने निवारण करण्याचे निर्देश देण्यात आले.

या बैठकीस अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, कृषी सभापती रामाप्पा चिवडशेट्टी, आरोग्य व शिक्षण सभापती चेतनसिंह केदार सावंत, समाजकल्याण सभापती संस्कृती सातपुते, महिला व बालकल्याण सभापती अमृता वाघे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांच्यासह जिल्हा परिषद सदस्य, विभाग प्रमुख अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. कृषी विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, मृद व जलसंधारण विभाग, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, मनरेगा विभाग, महावितरण, यांत्रिकी, लघुपाटबंधारे विभाग यांच्या कामांचा आढावा घेण्यात आला. विशेषतः 'जलतारा' प्रकल्पाच्या अंमलबजावणीवर बैठकीत भर देण्यात आला. शेतकऱ्यांना खड्डे खोदण्यासाठी होणारा खर्च कमी व्हावा. त्यांना आर्थिक आधार मिळावा यासाठी सीएसआर निधी उपलब्ध करून घेण्याबाबत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांना पाठपुरावा करण्याच्या सूचना देण्यात आल्या. प्रकल्पाची व्याप्ती वाढवून अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत योजना पोहोचविण्याचे निर्देशही देण्यात आले. वीजपुरवठा खंडित होणे ही शेतकऱ्यांसाठी मोठी समस्या ठरत असल्याने महावितरण विभागाला सूचना देण्यात आल्या. हातपंप अनेकदा बंद अवस्थेत असल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे यांत्रिकी विभागाने आवश्यक साहित्य खरेदीची प्रक्रिया पूर्ण करावी, असे निर्देश दिले.

जिल्हा परिषदेकडील पाझर तलाव, गाव तलाव आणि बंधारे जलसंपदा विभागाच्या योजना मधून पाण्याने भरुन घेण्यासाठी संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करण्याच्या सूचना देण्यात आल्या. पावसाळ्यापूर्वी जलसाठे सक्षम करण्यावरही बैठकीत भर देण्यात आला.

# बाजार समितीचे नियम पाळू, व्यवसायासाठी परवानगी द्या

## रिक्षाचालकांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ मे-**

शेतकऱ्यांचे उत्पन्न शेती मालावर त्याचप्रमाणे आमचा उदरनिर्वाह रिक्षा व्यवसायावर चालतो. बाजार समितीने ठरवून दिलेले सर्व नियम, निकष व शिस्त आम्ही पाळू; मात्र आम्हाला मार्केट आवारात व्यवसाय करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी रिक्षा व्यावसायिकांनी श्री सिध्देश्वर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीपराव माने यांच्याकडे केली.

काही रिक्षाचालकांकडून नियमांचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी आहेत. वाहतुकीस अडथळा निर्माण करणे, शेतकरी, कर्मचारी व सुरक्षा रक्षकांशी अरेरावीची वागणूक ठेवणे अशा प्रकारांमुळे प्रशासनाला कठोर निर्णय घ्यावा लागला. मात्र, सर्व संबंधितांशी चर्चा करून संचालक मंडळाच्या बैठकीत योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे सभापती दिलीप माने यांनी याबाबत बोलताना सांगितले. सभापती माने यांनी कांदा मार्केट, भाजीपाला विभाग, फळ मार्केट, फुलबाजार तसेच मिरची विभागाची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकरी, कोकणातून आंबा विक्रीसाठी आलेले उत्पादक तसेच व्यापाऱ्यांशी संवाद साधला. शेतकऱ्यांच्या मालाचे वजन, व्यवहार आणि देयक प्रक्रियेत कोणतीही फसवणूक खपवून घेतली जाणार नाही. बाजार समिती प्रशासन शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबध्द आहे, असे स्पष्ट निर्देशही माने यांनी दिले.



# कृषी केंद्राला भीषण आग; १८ कोटींचे नुकसान

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ८ मे-**

मंगळवेढा शहर खोमनाळ नाका परिसरात पंचायत समिती माजी सभापती व जिल्हा परिषद सदस्य प्रदीप खांडेकर यांच्या नामांकित श्री जिजामाता कृषी केंद्र या कृषी सेवा केंद्राला मध्यरात्री भीषण आग लागली.

या आगीत दुकानातील खते, बियाणे, कृषी औषधे, फर्निचर व इतर ज्वलनशील साहित्य जळून खाक झाले. प्राथमिक अंदाजानुसार १८ कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

याबाबत रविकांत वसंत खांडेकर यांनी मंगळवेढा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या कृषी केंद्रात मोठ्या प्रमाणात रासायनिक खते, कीटकनाशके व ज्वलनशील पदार्थ साठवलेले होते. आगीचे लोळ इतके प्रचंड होते की काही मिनिटांतच संपूर्ण दुकान पोळले जाऊ लागले. ही वार्ता कळताच मंगळवेढा नगरपरिषद, सांगोला व पंढरपूर येथील अग्निशामक दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल होत आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, दुकानातील स्टॉक, मशीन्स, कागदपत्रे व दैनंदिन साहित्याचे मोठे नुकसान झाले. इलेक्ट्रिक शॉर्ट सर्किट असल्याचा अंदाज व्यक्तविण्यात येत आहे. फॉरेंसिक तपासद्वारे आगीचे नेमके कारण शोधले जाईल, असे सांगण्यात आले.

# 'कोंडी'च्या जिजाऊ ज्ञान मंदिर इंग्लिश मीडियम स्कूलचा १०० टक्के निकाल

**सोलापूर, दि.८ मे-**

कोंडीच्या जिजाऊ प्रशालेचा निकाल १०० टक्के लागला. परिक्षेला बसलेले सर्व ५७ विद्यार्थी विद्यार्थी उत्तीर्ण झाले. नरेंद्र सतिश चव्हाण याने ९३ टक्के गुण घेऊन प्रथम, श्रेया भारत सुतार हिने ८६.४० टक्के गुण घेऊन व्दितीय तर पायल उध्दव बागल हिने ८३ टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांक पटकविला. संस्थापक गणेश निळ,प्राचार्य सुषमा नीळ, मुख्याध्यापक वैभव मसलकर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# मान्सूनपूर्वीच बेमोसमी ढगांची दाटी

- गतवर्षी मे महिन्यात १०० मिमीच्या पुढे पाऊस
- यंदाही मे मध्येच अवकाळी धिंगाणा घालण्याची भीती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ मे-**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात दि.८ मे २०२६ रोजी ढगाळ वातावरण होते आणि सायंकाळच्या सुमारास काही ठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी लावल्याचे सांगण्यात येते. गुरुवारीही सायंकाळच्या सुमारास पावसाच्या सरी पडल्या होत्या. गतवर्षी १५ मे रोजीपासून पाऊस सुरु झाला आणि मे महिन्यातच मुसळधार होवून १०४ मिमीच्या पुढे पाऊस नोंदला गेला होता. यंदाही अवकाळी अशीच घाई करतो की काय? अशी भीती शेतकरी बांधवांतून व्यक्त होत आहे.

शुक्रवारी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास मोहोळ आणि उत्तर सोलापूर तालुक्यांत वादळी वाऱ्यासह पावसाच्या सरी कोसळल्याचे सांगण्यात आले. शुक्रवारी दिवसभर कडक ऊन आणि ढगाळ वातावरण अशा संमिश्र हवामाना मुळे उकाडा प्रचंड वाढला होता. आजचे कमाल तापमान ३९.७ अंश सेल्सिअस नोंदविले होते. कधी कडक ऊन तर कधी पाऊस असा ऊन व पावसाचा जणू खेळ सुरु आहे. घराबाहेर पडत ऊन आणि घरी येताना पाऊस अशा दुहेरी संकटाला सामोरे जावे लागत असल्याने नागरिक बेजार होत असल्याचे दिसून येत आहे. हवामान विभागानुसार, दि.९ मे २०२६ रोजी देखील अंशतः ढगाळ वातावरण राहून पावसाची शक्यता आहे. १० मे नंतर मात्र उष्णतेचा कडाका वाढून पारा ४३ अंशांच्या पुढे जाण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दरम्यान, अचानक आलेल्या या पावसामुळे काढणीला आलेल्या पिकांचे आणि फळबागांचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सध्या महाराष्ट्रात ढगाळ वातावरणासोबतच उष्णतेची लाट आणि अवकाळी पावसाचे दुहेरी संकट कायम आहे.

उत्तर प्रदेशातील चक्रीवादळ प्रणाली आणि छत्तीसगड ते कर्नाटकपर्यंतच्या ट्रफ लाईनमुळे राज्यात मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह गारपिटीचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. मे महिन्यात १५ तारखेनंतर अपेक्षित असलेला पाऊस यंदा ९ दिवस आधीच ढगाळ वातावरण निर्माण करत आहे.







**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com. ● Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## व्ही. एस. पँथर्सच्या सामूहिक विवाह सोहळ्याच्या मंडप उभारणीचा शुभारंभ

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ८ मे : येथील व्ही. एस. पँथर्स युवा संघटनेच्या वतीने येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त ७ वा सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ दि. १० मे रोजी आयोजित करण्यात आला आहे. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कवर मंडप उभारणी शुभारंभ माजी आमदार बब्रुवान खंदाडे, यशवंत नागरी सहकारी बँकेचे चेअरमन प्रा. सुहास पाचपुते, पत्रकार अशोक हनवते, नेताजी बादाडे यांच्या हस्ते करण्यात आला.
यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नारळ वाढवून मंडप उभारणीच्या शुभारंभ करण्यात आला.
या प्रसंग संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विनोद खटके यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.



# विविध वृत्त...

# लातूर विभागाचा १० वी चा निकाल ८८.४२ टक्के

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ८ मे : –महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने घेण्यात आलेल्या इयत्ता १० परिक्षेचा निकाल आज संकेतस्थळावर जाहिर करण्यात आला आहे. लातूर,नांदेड आणि धाराशिव जिल्ह्याचा समावेश असलेल्या लातूर विभागीय मंडळाचा निकाल ८८.४२ टक्के लागला आहे. विभागात सर्वाधिक निकाल हा लातूर जिल्ह्याचा लागला आहे तर सर्वात कमी निकाल नांदेड जिल्ह्याचा लागला आहे. लातूर जिल्ह्याचा निकाल ९२.८० टक्के, धाराशिव जिल्ह्याचा निकाल ९१.२९ टक्के, नांदेड जिल्ह्याचा निकाल ८३.६२ टक्के लागला आहे. यावर्षीच्या निकालातही मुलींनी आपली परंपरा कायम राखली असून लातूर विभागात मुलीच अव्वल असल्याचे पुन्हा सिध्द झाले आहे. मुलींचा निकाल ९२.२७ टक्के लागलेला असून मुलांचा निकाल ८५.११ टक्के लागला आहे.

लातूर विभागीय परिक्षा मंडळाचा निकाल आज संकेतस्थळावर जाहिर करण्यात आला आहे. लातूर विभागातून ५८ हजार ३४३ मुलांनी,४९ हजार ९९७ मुलींनी असे एकूण १लाख ०८ हजार ३४० विद्यार्थ्यांनी आवेदन पत्रे सादर केलेली होती. प्रत्यक्षात ५७ हजार ४०५ मुलांनी आणि ४९ हजार ३०२ मुलींनी असे एकूण १लाख ०६ हजार ७०७ जणांनी परिक्षा दिली. ४८ हजार ८६० मुले तर ४५ हजार ४९४ मुली असे एकूण ९४ हजार ३५४ जण उत्तीर्ण झाले आहे. विभागाचा एकूण निकाल ८८.४२ टक्के लागला आहे. लातूर विभागातील मुलांच्या उत्तीर्णतेचे प्रमाण ८५.११ टक्के तर मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण हे ९२.२७ टक्के आहे.
लातूर विभागातील नांदेड जिल्ह्याचा निकाल ८३.२६ टक्के लागला आहे. धाराशिव जिल्ह्याचा निकाल ९१.२९ टक्के तर लातूर जिल्ह्याचा निकाल ९२.८० टक्के लागला आहे. लातूर विभागातील २७ हजार ९९५ विद्यार्थी विशेष प्राविण्यासाह उत्तीर्ण झालेले आहेत. त्यामध्ये नांदेड जिल्ह्यातील ९ हजार ५०४, धाराशिव जिल्ह्यतील ६ हजार ३६५ तर लातूर जिल्ह्यातील १२ हजार १२६ जणांचा समावेश आहे. लातूर विभागात २९ हजार ५०९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेले आहेत. त्यामध्ये नांदेड जिल्ह्यात ११ हजार ०६१, धाराशिव जिल्ह्यात ६ हजार ७३८ तर लातूर जिल्ह्यातील ११ हजार ७१० जणांचा समावेश आहे.लातूर विभागामध्ये २५ हजार ७५६ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. त्यामध्ये नांदेड जिल्ह्यात १२ हजार २४२, धाराशिव जिल्ह्यात ५ हजार ८० आणि लातूर जिल्ह्यात ८ हजार ४३४ जणांचा समावेश आहे. ११ हजार ०९४ विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीत असून त्यामध्ये नांदेड जिल्ह्यातील ६ हजार ७७३, धाराशिव जिल्ह्यातील १ हजार ६२१ तर लातूर जिल्ह्यातील २ हजार ७०० जणांचा समावेश आहे.
लातूर जिल्ह्यातील लातूर तालूक्याचा निकाल ९४.८४ टक्के लागला आहे. अहमदपूर तालूक्याचा निकाल ९३.१८ टक्के लागला आहे.औसा तालूक्याचा निकाल ९१.३२ टक्के लागला आहे. चाकूर तालूक्याचा निकाल ९२.३३ टक्के लागला आहे. देवणी तालूक्याचा निकाल ८४.७१ टक्के लागला आहे.जळकोट तालूक्याचा निकाल ९६.१९ टक्के लागला आहे. निलंगा तालूक्याचा निकाल ८८.९४ टक्के लागला आहे. रेणापूर तालूक्याचा निकाल ८९.२२ टक्के लागला आहे. शिरुर अनंतपाळ तालूक्याचा निकाल ८६.८० टक्के लागला आहे. उदगीर तालूक्याचा निकाल ९४.३६ टक्के लागला आहे. लातूर जिल्ह्याचा एकूण निकाल ९२.८० टक्के लागला आहे.
लातूर विभागामध्ये ९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवून ६०८३ जण उत्तीर्ण झालेले आहे. हे प्रमाण ६.३८४ टक्के आहे.८५ ते ९० टक्के गुण मिळालेले ५९०५ विद्यार्थी आहेत त्यांचे प्रमाण ६.१८७ टक्के आहे. ८० ते ८५ टक्के गुण मिळवलेले ७ हजार ५६३ विद्यार्थी आहेत त्यांचे प्रमाण ७.९३७ टक्के आहे.७५ ते ८० टक्के गुण मिळवणारे ८ हजार ४७० विद्यार्थी असून त्यांचे प्रमाण ८.८८९ टक्के आहे.७० ते ७५ टक्के गुण मिळवणारे ९ हजार ००७ विद्यार्थी असून त्यांचे प्रमाण ९.४५३ एवढे आहे. ६५ ते ७० टक्के गुण मिळवणारे ९ हजार ५७७ विद्यार्थी आहेत त्यांचे प्रमाण १०.०५ टक्के आहे.६० ते ६५ टक्के गुण मिळवणारे ११ हजार ०२१ विद्यार्थी आहेत त्यांचे प्रमाण ११.५७ टक्के आहे. ४५ ते ६० टक्के गुण मिळवणारे २५ हजार ८८८ विद्यार्थी असून त्यांचे प्रमाण २७.१७ टक्के तर ४५ टक्यांपेक्ष कमी गुण मिळवणारे ११ हजार ७७२ विद्यार्थी असून त्यांचे प्रमाण १२.३५ टक्के आहे.

## लातूर जिल्ह्यात पाणी टंचाई निवारणासाठी उपाय योजना

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ८ मे : जिल्ह्यात उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये, यासाठी जिल्हा प्रशासनाने पाणी टंचाई निवारण आराखड्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या ७ मे २०२६ रोजीच्या दैनंदिन अहवालानुसार, सध्या जिल्ह्यातील जळकोट तालुक्यात २ टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे. तसेच जिल्ह्यात ३५ विहीर, विंधन विहीर अधिग्रहणाद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.
जळकोट तालुक्यातील ३ गावे आणि १ वाडी मिळून एकूण ३,३१० लोकसंख्येला २ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. यामध्ये शिवाजी नगर तांडा व वाघमारी तांडा येथे टँकरने पाणीपुरवठा सुरु आहे. गव्हाण येथेही २४ एप्रिल २०२६ पासून टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. यासाठी २ शासकीय टँकरद्वारे दररोज ४ खेपा पूर्ण केल्या जात आहेत.
टँकर व्यतिरिक्त ज्या ठिकाणी शक्य आहे, तिथे प्रशासनाने खाजगी विहिरींचे अधिग्रहण करून पाणीपुरवठा सुरू केला आहे. जिल्हभरात एकूण ३५ खाजगी विहिरी, विंधन विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे.
यामध्ये औसा तालुक्यातील १० गावे तथा वाड्यांसाठी ११ विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत, तर अहमदपूर तालुक्यातील १० गावांमध्ये १० विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. उदगीर तालुक्यात ८ गावे तथा वाड्यांसाठी ८ विहिरी अधिग्रहित केल्या आहेत. रेणापूर व चाकूर तालुक्यात प्रत्येकी १ गावात विहीर अधिग्रहण करण्यात आले आहे, तर जळकोट तालुक्यात टँकर भरण्यासाठी ३ आणि इतर २ अशा एकूण ५ विहिरी अधिग्रहित केल्या आहेत.

## 'एसआयआर' नोंदणीसाठी महापालिकेची हेल्पलाईन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ८ मे : निवडणूक आयोगाच्यावतीने सुरू करण्यात आलेल्या एसआयआर नोंदणीसाठी महापालिकेने स्वतंत्रपणे मदत कक्ष सुरू केला आहे. सुटी वगळता हा कक्ष कार्यालयीन वेळेत सुरू राहणार आहे. त्यात उर्वरित ३० टक्के मतदारांनी नोंदणी करण्याचे आवाहन महापालिका उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांनी केले आहे.
भारत निवडणूक आयोगामार्फत राज्यभरात विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम (एसआयआर) राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातही मतदारयाद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षणची पूर्व तयारी सुरू आहे. याअंतर्गत प्रत्येक मतदाराने आपले नाव २००२ च्या मतदारयादीतील माहितीसोबत मॅपिंग करणे आवश्यक आहे. यासाठी ३८८ मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांची (बीएलओ) नियुक्ती करण्यात आली आहे. काम प्रगतीपथावर सुरू आहे. शहरातील ७० टक्के मतदारांनी या प्रक्रियेत सहभाग घेत मतदारयादीतील आपले नाव सुनिश्रि्चत केली आहेत. अद्यापही ३० टक्के मतदारांची एसआयआर नोंदणी बाकी आहे. त्यांच्यासाठी महापालिकेच्यावतीने हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे. मतदारांसाठी महानगरपालिकेत 'एसआयआर' कक्ष सुरू करण्यात आला आहे.

## शिक्षक भरतीपूर्वी आंतर जिल्हा बदल्या करा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ८ मे : देशाची जनगणना सुरू झाल्यामुळे राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाने १७ एप्रिल रोजी शिक्षकांच्या सर्व बदल्यांना स्थगिती दिली आहे. परंतु, दुसऱ्या बाजूला शिक्षक भरती वेगाने सुरू झाल्यामुळे आंतरजिल्हा बदलीच्या प्रतीक्षेतील जिल्हा परिषद शिक्षक हवालदिल झाला आहे. यासाठी राज्यातील प्राथमिक शिक्षकांची रिक्त पदे नवीन शिक्षक भरती अगोदर आंतरजिल्हा बदली करा, अशी मागणी शिवराज्य शिक्षक संघटनेच्या वतीने सरकारकडे करण्यात आली. याबाबतचे निवेदन ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांना मुंबई येथे देण्यात आले आहे. निवेदनावर लातूरमधील शिवराज्य शिक्षक संघटनेचे नेते सनीदेवल जाधव, राज्याध्यक्ष गोविंद सोळुंके, कार्याध्यक्ष शेषराव बिरादार, जिल्हाध्यक्ष मन्मथ मिसळे, चेतन विल्हेकर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. दिव्यांग, दुर्धर आजारी शिक्षक, विधवा घटस्फोटीत महिला शिक्षकांचे प्रश्न्न गंभीर होत चालले आहेत. नवीन शिक्षक भरती अगोदर आंतरजिल्हा बदल्या कराव्यात, रिक्त होणाऱ्या जागांचा आंतरजिल्हा जिल्हा बदली प्रक्रियेत समावेश करावा, अशा मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या.

## सुखी आणि आनंदी जीवनासाठी कुटुंबात संवाद महत्वाचा : शरद झरे

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ८ मे : आज समाजामध्ये मोठ्या प्रमाणात कौटुंबिक संघर्ष आपल्याला बघायला मिळतो. कौटुंबिक सौख्य निर्मितीत कुटुंबाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. सध्याच्या धकाधकी आणि स्पर्धेच्या युगामध्ये प्रत्येक व्यक्ती हा वैयक्तिक स्वार्थ जपण्यामध्ये मग्न आहे परंतु समाजात सुखी आणि आनंदी जीवनासाठी कुटुंबात संवाद महत्वाचा आवश्यक असल्याचे प्रतिपादन माझं घर प्रकल्पाचे प्रमुख सामाजिक कार्यकर्ते शरद झरे यांनी केले.
माझं घर प्रकल्प, बुधोडा येथे ५८ वा मंगल परिणय दिन, सामाजिक कार्यकर्ते शरद झरे जन्मदिन आणि सार्थक गवई सत्कार अशया तीन आनंददायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते.
यावेळी विचारमंचावर धाराशिवचे दैनिक पुढारीचे पत्रकार रहीम शेख, दुर्वासराव गवई, निर्मला गवई, संगीताताई झरे, डॉ.संजय गवई आणि ममता गवई यांची प्रमुख उपस्थिती होती.
कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत भगवान बुद्ध, महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्प आणि पुष्पहार अर्पण करून त्रिसरण पंचशील आणि मंगल मैत्रीने कार्यक्रमाची सुरुवात झाली.
पुढे बोलताना शरद झरे म्हणाले की, आज माझं घर प्रकल्प येथे दुर्वासराव गवई आणि निर्मला गवई यांचा ५८ वा मंगल परिणय दिन, माझा जन्मदिन आणि सार्थक गवई याने बारावी बोर्ड परीक्षेमध्ये दिव्यांग प्रवर्गातून महात्मा बसवेश्र्वर कनिष्ठ महाविद्यालयातून प्रथम येण्याचा बहुमानाबद्दल सत्कार अशया तीन कौटुंबिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे याचा आम्हा सर्वाना मनस्वी आनंद झाला आहे.


## जनगणना २०२७: नागरिकांसाठी १५ मे पर्यंत 'स्व-गणना' करण्याची संधी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ८ मे : भारताची जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर नागरिकांना 'स्व-गणना' (डशश्रष-एर्पीाशीरींळेप) हा सुलभ पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. लातूर जिल्ह्यातील नागरिकांना १ मे ते १५ मे या कालावधीत स्वतःच्या कुटुंबाची माहिती स्वतः ऑनलाईन नोंदवता येणार आहे. या प्रक्रियेसाठी एक सर्वसमावेशक प्रश्र्नावली तयार केली असून, त्यामध्ये कुटुंबाच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचा वेध घेणारे विविध प्रश्न समाविष्ट आहेत.
या प्रश्र्नावलीची सुरुवात कुटुंब प्रमुखाचे नाव आणि मोबाईल क्रमांकापासून होते. यामध्ये घराच्या बांधकामासाठी वापरलेल्या साहित्याचा सविस्तर तपशील विचारण्यात आला आहे, ज्यामध्ये जमिनीसाठी माती, विटा, सिमेंट किंवा टाईल्स , भिंतींसाठी दगड, कच्च्या विटा किंवा कॉंक्रीट , आणि छप्परासाठी कौले, लोखंडी पत्रे किंवा कॉंक्रीट यांपैकी कोणत्या साहित्याचा मुख्यत्वे वापर झाला आहे याची नोंद करावी लागेल. घराचा वापर केवळ निवासासाठी होतो की व्यवसाय, शिक्षण किंवा आरोग्य सेवांसाठी, हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. तसेच, घराची सद्यस्थिती राहण्यायोग्य आहे की मोडकळीस आली आहे, यावरही कुटुंबांनी माहिती द्यायची आहे.
कुटुंबातील सदस्यांच्या माहितीमध्ये एकूण संख्या, लिंग (पुरुष, स्त्री, किंवा ट्रान्सजेंडर) आणि सामाजिक प्रवर्ग (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा इतर) यांचा समावेश आहे. घराच्या मालकी हक्काबाबत माहिती देताना ते स्वतःचे आहे की भाड्याचे, हे नमूद करावे लागेल. कुटुंबाच्या राहणीमानाचा स्तर तपासण्यासाठी निवासयोग्य खोल्यांची संख्या आणि विवाहित जोडप्यांची संख्या विचारली गेली आहे. मुलभूत सुविधांमध्ये पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्त्रोत जसे की प्रक्रिया केलेले नळ पाणी, विहीर, कूपनलिका किंवा टँकर आणि त्याची उपलब्धता किती अंतरावर आहे, याची नोंद करणे बंधनकारक आहे. प्रकाशासाठी वीज किंवा सौर ऊर्जेचा वापर होतो का, हे देखील स्पष्ट करावे लागेल.
स्वच्छतेच्या दृष्टीने प्रश्र्नावलीत महत्त्वाचे प्रश्न आहेत. कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालय आहे की ते सार्वजनिक सुविधेचा वापर करतात, तसेच शौचालयाचा प्रकार (फ्लश, सेप्टिक टँक किंवा इतर) कोणता आहे, याची माहिती द्यावी लागेल. सांडपाणी निचऱ्यासाठी बंद किंवा उघड्या गटारांची व्यवस्था आणि स्वतंत्र स्नानगृहाची उपलब्धता याबाबतही प्रश्न विचारण्यात आले आहेत. स्वयंपाकासाठी एलपीजी/पीएनजी जोडणीची उपलब्धता आणि इंधन म्हणून लाकूड, रॉकेल, वीज किंवा बायोगॅस यांपैकी कशाचा वापर होतो, हे देखील कुटुंबांना नमूद करावे लागेल.
डिजिटल इंडियाच्या काळात कुटुंबांकडे उपलब्ध असलेल्या आधुनिक साधनांची माहितीही या जनगणनेत संकलित केली जात आहे. यामध्ये रेडिओ, दूरचित्रवाणी (डिश किंवा केबल), लॅपटॉप, संगणक आणि इंटरनेट सुविधेची उपलब्धता (मोबाईल किंवा अन्य उपकरणांवर) या गोष्टींचा समावेश आहे. तसेच कुटुंबाकडे सायकल, दुचाकी किंवा चारचाकी वाहन आहे का, याचीही नोंद घेतली जाईल. शेवटी, कुटुंबात प्रामुख्याने सेवन केले जाणारे धान्य जसे की तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी किंवा मका याविषयी माहिती विचारण्यात आली आहे.
१५ मे पर्यंत जास्तीत जास्त नागरिकांनी या स्व-गणना सुविधेचा वापर करून राष्ट्रीय कार्यात सहभाग नोंदवावा, असे आवाहन लातूर जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## गंजगोलाईत ३०० अतिक्रमणे हटवली

तभा वृत्तसेवा




लातूर दि. ८ मे : लातूर शहर महानगरपालिकेने दि. ७ मे रोजी गंजगोलाई भागात अतिक्रमण हटाव मोहीम जोरदारपणे राबवली. यात जवळपास ३०० अतिक्रमणे हटविण्यात आली. यामुळे रस्त्यांनी मोकळा श्र्वास घेतला आहे.
गंजगोलाई हे लातूर शहरातील बाजारपेठेचे प्रमुख ठिकाण आहे. या ठिकाणी शहरासह जिल्ह्यातील येणाऱ्या नागरिकांची खरेदीसाठी गर्दी होते. या भागात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे झाल्यामुळे वारंवार वाहतूक कोंडी होत होती.
खरेदीसाठी येणारे नागरिक व प्रवाशांनाही याचा त्रास होत होता. यामुळे मनपाने ही अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेतली आहे.
महापालिकेच्या वतीने दोन दिवसांपूर्वी स्वतःहून अतिक्रमणे काढून घेण्याचे निर्देश संबंधितांना देण्यात आले होते. तरीही अतिक्रमणे कायम असल्याने गुरुवारी ही मोहीम राबवण्यात आली. पालिका आयुक्त श्रीमती मानसी मीना यांनी प्रत्यक्ष स्थळावर उपस्थित राहून या मोहिमेची पाहणी केली.
अतिक्रमणे हटवण्यासाठी मनपाच्या वतीने पाच पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे.गुरुवारी सकाळी ८ वाजल्यापासून सायंकाळी ६ वाजेपर्यंत ही मोहीम सुरू होती. गंजगोलाईतील कापड गल्ली, भुसार लाईन, हनुमान चौकापासून गंजगोलाईकडे जाणारा मुख्य रस्ता, सुभाष चौक ते हनुमान चौक, लोखंड गल्ली, मज्जिद रोड, साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे चौक ते छत्रपती राजर्षी शाहू महाराज चौक, वीज वितरण कार्यालयाच्या पाठीमागील व बाजूच्या रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्यात आली. मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या मार्गदर्शनात उपायुक्त फड यांनी केलेल्या नियोजनामुळे ही मोहीम यशस्वी झाली.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयामुळेच उच्चस्थ पदावर जाऊ शकलो : माजी उपसंचालक मानखेडकर

तभा वृत्तसेवा



लातूर दि. ८ मे : लातूर शहरात कला, वाणिज्य, विज्ञान, समाजकार्य, व्यावसायिक अभ्यासक्रम, पदव्युत्तर शिक्षण, संशोधन केंद्र आणि बहि:स्थ शिक्षण केंद्राच्या माध्यमातून समाजातील गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण देणारे महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय हे मराठवाड्यातील एकमेव महाविद्यालय आहे.
या महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या मार्गदर्शनामुळेच माझ्यासारख्या सर्वसामान्य ग्रामीण भागातील विद्यार्थ्याला क्रीडा व खेल मंत्रालय, भारत सरकारच्या महाराष्ट्र राज्याच्या नेहरू युवा केंद्राच्या उपसंचालक पदापर्यंत मजल मारता आली त्यामूळे विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२६-२७मध्ये महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात प्रवेश घ्यावा असे प्रतिपादन माजी उपसंचालक यशवंत मानखेडकर यांनी केले.
यशवंत माणखेडकर यांनी सन १९८५-८६ला महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयामध्ये समाजकार्य विभागाच्या बी.एस.डब्ल्यू. अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला आणि सन १९८७-८८ ला बी.एस.डब्ल्यू.ची पदवी सध्याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर येथून पाचव्या क्रमांकाने मेरिटमध्ये येऊन प्राप्त केली.
त्यांचा महाविद्यालयाच्या प्राचार्य कक्षामध्ये प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी ते आपल्या भावना व्यक्त करताना बोलत होते. यावेळी समाजकार्य विभागाचे प्रो.डॉ.संजय गवई, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक डॉ. बिरादार आणि मिरा मानखेडकर यांची उपस्थिती होती.
पुढे बोलताना यशवंत माणखेडकर म्हणाले की, मी अहमदपूर तालुक्यातील मानखेड या अत्यंत ग्रामीण भागातील गरीब कुटुंबातील एक विद्यार्थी होतो. बी.एस.डब्ल्यू.ला शिकत असताना दिवसभर महाविद्यालयाचे नियमित तास करायचे आणि संध्याकाळी तेलाच्या घाणीमध्ये काम करायचो. त्यामुळे माझ्या हाताला फोड यायचे म्हणून महाविद्यालयात येताना हातामध्ये हॅन्डग्लोज घालून येत होतो. या अभ्यासक्रमामुळे मी विविध आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील संस्थांमध्ये उच्चस्थ पदावर कार्य करू शकलो. नुकताच सन २०२३मध्ये क्रीडा व खेल मंत्रालय, भारत सरकारच्या महाराष्ट्र राज्याच्या नेहरू युवा केंद्राच्या उपसंचालक पदावरून सेवानिवृत्त झालो. जगाच्या अनेक राष्ट्रांमध्ये जाऊन मी माझ्या कार्याची माहिती दिली आहे.
तसेच अनेक राजकीय नेते आणि प्रशासकीय अधिकारी यांनाही मार्गदर्शन केले असून सध्या स्पर्धा परीक्षेच्या मुलाखतीच्या पॅनलवर मी कार्य करीत आहे. आपल्या महाविद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षा करिता माझ्या टीमद्वारे माजी विद्यार्थी म्हणून मी प्रयत्नशील राहील असे सांगून समाजकार्य विभागाच्या चाळीस वर्षांपूर्वीच्या आठवणीना त्यांनी उजाळा देऊन प्राचार्य प्रा.सितानगरे, प्राचार्य डॉ. कुंभार, प्राचार्य डॉ.रोडे, प्रा.बी. एस.पळसकर, स्व.प्रा.नागनाथ स्वामी, प्रा.मुचाटे आणि यांची आठवण करून आभार व्यक्त केले. कुस्ती प्रशिक्षण केंद्र आणि महाविद्यालयाच्या परिसराची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

## पेट्रोल पंप असोसिएशनची जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ८ मे : शहर आणि जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून पेट्रोलपंपांवर होत असलेल्या प्रचंड गर्दीच्या पार्श्र्वभूमीवर 'लातूर जिल्हा पेट्रोल पंप असोसिएशन'च्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली. जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा कोणताही तुटवडा नसून इंधन पुरवठा पूर्णपणे सुरळीत असल्याचे असोसिएशनने स्पष्ट करत नागरिकांनी अफवांना बळी पडू नये, असे आवाहन केले आहे.
यावेळी आशिष कामदार, एस. ए. वहाब, रफीक काझी, अक्षय चव्हाणे, मयूर पाटील अजय शाह, अमोल दाडगे, जकी खान कायमखानी, महेंद्र किनगावकर, मयूर पाटील, मेहुल कामदार यांची उपस्थिती होती.
या बैठकीदरम्यान असोसिएशनने रुग्णालयांतील जनरेटर, शेतीसाठी वापरले जाणारे ट्रॅक्टर, हार्वेस्टर यांसारख्या यंत्रांसाठी 'कॅन' मधून डिझेल नेण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी करण्यात आली. अनेक यंत्रे थेट पेट्रोलपंपावर आणणे शक्य नसल्याने हा निर्णय आवश्यक असल्याचे प्रतिनिधींनी सांगितले. जिल्हाधिकाऱ्यांनी या मागणीबाबत सकारात्मक भूमिका घेतल्याचे असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. जिल्हा प्रशासनाने शेती. हॉस्पिटल व अत्यावश्यक सेवेसाठी पीईएसओ अॅप्रुव्ह केलेल्या बॅरल, ड्रममध्ये डिझेल पुरवठा करण्याबाबत पेट्रोलपंप चालकांना सूचना दिल्या.

## श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांनी पटकावले १०० टक्के गुण

## विद्यालयाच्या ९२ विद्यार्थ्यांनी पटकावले ९० टक्के पेक्षा जास्त गुण



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ८ मे : येथील अभिनव मानव शिक्षण संस्था द्वारा संचालित श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण संपादन केले आहेत. तर ९२ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा अधिक गुण संपादन केले आहेत. मागच्या १५ वर्षांपासून विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची दैदिप्यमान परंपरा कायम राखली आहे.
श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या समर्थ कल्याण गिरवलकर,अथर्व संतोष मरे , अनराग नेताजी सावंत आणि अथर्व राजाराम कात्रे या चार विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. विद्यालयाच्या एकूण १९३ विद्यार्थ्यांपैकी १५८ विद्यार्थ्यांनी विशेष गुणवत्ता संपादन करण्यात यश मिळवले आहे. संस्कृत, गणित आणि विज्ञान, इतिहास भूगोल या विषयात अनुक्रमे ३२, ०२, ०१ आणि ०१ विद्यार्थ्यांनी १०० गुण संपादन केले आहेत. विद्यालयातील ९२ विद्यार्थ्यांनी ९० ते ९९. ९ टक्के गुण परंपरा केले आहेत. ६६ विद्यार्थ्यांनी ७५ ते ८९. ९ टक्के , २७ विद्यार्थ्यांनी ६० ते ७४. ९ टक्के तर ७ विद्यार्थ्यांनी ४५ ते ५९. ९ टक्के गुण मिळवले आहेत. विद्यालयाचा त्यावर्षीचा इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल ९९. ४८ टक्के लागला आहे.
मागील १५ वर्षांपासून श्रीकिशन सोमाणी विद्यालयाने दहावीच्या निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, कोषाध्यक्ष जयेश बजाज, शालेय समिती अध्यक्ष अतुल देऊळगावकर, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी, पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, सुनिता जाधव, राहुल पांचाळ यांसह सर्व शिक्षक – शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवनाचे भुमिपुजन



**तभा वृत्तसेवा**
**औसा दि. ८ मे :** कृषी उत्पन्न बाजार समिती औसा येथील मुख्य बाजार आवारात उभारण्यात येणाऱ्या सुसज्ज राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन व इतर सुविधा इमारतींच्या बांधकामाचे भूमिपूजन तसेच शिलान्यास समारंभ पार पडला. यावेळी आमदार पवार यांनी औसा बाजार समितीच्या प्रगतीचा आढावा घेत शेतकरी हिताच्या विविध योजनांबाबत महत्त्वपूर्ण भूमिका मांडली.

आमदार पवार म्हणाले,तीन वर्षापुर्वी केवळ ५ कोटी रुपयांच्या ठेवी असलेली औसा कृषी उत्पन्न बाजार समिती आज १७ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. पारदर्शक कारभार आणि शेतकरी हिताचे निर्णय यामुळे मराठवाड्यात अग्रगण्य बाजार समिती म्हणून औसा बाजार समितीची ओळख निर्माण झाली आहे. विभागात दुसऱ्या क्रमांकाची बाजार समिती म्हणून मानाचे स्थान मिळाले आहे. लातूर जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर आणण्याचा आमचा संकल्प आहे. अत्यंत पारदर्शक कारभारातून बाजार समितीने शेतकरी, व्यापारी आणि सर्व घटकांचा विश्र्वास संपादन केला आहे. बाजार समिती अंतर्गत विविध सेवा-सुविधांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात आला असून भविष्यातही विकासकामांसाठी आणि शेतकरी सुविधांसाठी आवश्यक ते सहकार्य व निधी दिला जाईल, असा विश्र्वास आ. पवार यांनी व्यक्त केला.

**योग्य दर व वेळेत पैशामुळे पत वाढली – दिनकरराव माने**

औसा बाजार समितीत शेतीमालाला योग्य भाव आणि शेतकऱ्यांना वेळेवर पैसे मिळत असल्याने बाजार समितीची प्रतिष्ठा वाढली आहे. जिल्ह्यात सर्वाधिक दर औसा बाजार समितीत मिळत असल्यामुळे शेतकरी समाधानी असल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यात बाजार समितीच्या माध्यमातून शेतीमाल प्रक्रिया उद्योग उभारण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

आ. पवार पुढे म्हणाले, शेतकरी बांधवांना बाजार समितीत सन्मानाने थांबता यावे. जेवण व विश्रांतीची सुविधा मिळावी. यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन उभारण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामीण भागातून बाजार समितीत येणाऱ्या शेतकऱ्यांसाठी अशी सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.सोयाबीन, हरभरा यांसारख्या पिकांवर प्रक्रिया करणारे उद्योग उभारण्याचे प्रयत्न सुरू असून प्रक्रिया उद्योगांमुळे शेतीमालाला अधिक मूल्य मिळून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

**शेतकरी भवन सर्वसमावेशक सुविधा केंद्र ठरणार**

प्रशिक्षण हॉल –आधुनिक शेती तंत्रज्ञान व कार्यशाळांसाठी,माती परीक्षण केंद्र – माती व पाण्याची स्थानिक तपासणी सुविधा,विश्रांती कक्ष – दूरवरून येणाऱ्या शेतकऱ्यांसाठी विश्रांती व जेवणाची सोय,माहिती केंद्र – बाजारभाव, शासकीय योजना व हवामान अंदाजासाठी डिजिटल माहिती,खत/बियाणे बँक – स्थानिक व गावरान बियाण्यांचे जतन आणि वितरण केंद्र आसणार आहे.

शेतकरी मतदारसंघाच्या विकासाचा केंद्रबिंदू असून पक्ष कोणताही असो शेतकरी हिताच्या संस्था सक्षमपणे चालल्या पाहिजेत.हीच आमची भूमिका आहे.संत शिरोमणी मारुती महाराज साखर कारखाना सहकार तत्वावर टिकून राहावा. आणि शेतकऱ्यांच्या मालकीचा राहावा. यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. राज्य शासनाकडून या कारखान्यास १०९ कोटी रुपयांची आर्थिक मदत मिळवून दिल्याची माहितीआ. अभिमन्यू पवार यांनी दिली.

माजी आमदार दिनकरराव माने, पंचायत समितीच्या सभापती गंगाबाई कोदळीकर, भाजप जिल्हा सरचिटणीस सुभाष जाधव,सभापती चंद्रशेखर सोनवणे, बाजार समितीचे उपसभापती भिमाशंकरजी राचट्टे,मारुती महाराज कारखान्याचे संचालक रमेश वळके, क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष परिक्षीत पवार,सहाय्यक निबंधक रमेश सगर, संचालक युवराज बिराजदार, प्रकाश काकडे, सौ. चंद्रकला झिरमिरे प्रवीण कोपरकर, संतोषी वीर, विकास नऱ्हरे, ईश्र्वर कुलकर्णी, राधाकृष्ण जाधव, गोविंद भोसले, धनराज जाधव,प्रवीण कोपरकर, शंकर पुंड,सुरेश औटी, संदिपान लंगर, मोहन कावळे मोहन, धुमाळ अजित,समितीचे सचिव संतोष हुच्चे, काकासाहेब मोरे, सुभाष मुक्ता, दिनकर मुंगळे, राजकिरण साठे, विष्णू साळुंखे, शिवलिंग औटी, गोविंदा दळवी,रवी चिलमे, वृषाल देशमुख,शिव मुरगे,विलास साळुंके संजय उजळंबे, आबा पवार, आदींसह आडत व्यापारी, हमाल बांधव आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

## संक्षिप्त...

### देवणी देवर्जन मार्गे लातूर बस सेवा सुरू



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर दि. ८ मे :** देवणी ते देवर्जन मार्गे लातूर या नवीन मार्गावर बससेवा सुरू झाली असून, या बस चालक वाचकाचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले.

देवणीहून ही बस दुपारी तीन वाजता सुटून सायंकाळी सहा वाजता लातूरहुन ही बस सुटणार आहे. देवणीहून सकाळी सहा वाजता ही बस नागराळ, आरसनाळ, धोतरवाडी, देवर्जन, वायगाव, सताळा, सुमठाना, येरोळ, येरोळमोड, नळेगाव मार्गे लातूर ला जाईल. लातूरहुन सकाळी नऊ वाजता ही बस सुटणार असून देवणी ला दुपारी बारा वाजता ही बस पोचणार आहे.

देवर्जन येथे ही बस येताच देवर्जनचे सरपंच अभिजित साकोळकर , अमित साकोळकर, विनोद रोडगे, कांतराव श्रीवास्तव व ग्रामस्थांनी फटाके फोडून बसचे चालक, वाहक व विभागीय वाहतूक अधीक्षक बलभीमराव पाटील यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या मार्गावरून ही बससेवा सुरू करण्याची देवर्जनचे सरपंच अभिजित साकोळकर यांच्यासह या मार्गावरील ग्रामस्थ प्रवाशांची मोठी मागणी होती.

# जबड्याची रचना बदलली आणि अक्कल दाढे विना आली नवी पिढी : डॉ माले



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर दि. ८ मे :** लहान मुलांना दैनंदिन देण्यात येणाऱ्या ब्रेड बिस्कीट सह केवळ मऊ मऊ पदार्थ आणि प्रोसेसिंग अन्नाच्या अती वापराने त्यांच्या जबड्याची रचनाच बदलली आहे . आताची जन्मनारी मुले ही अक्कल दाढे विना तारुण्यात पदार्पण करताना दिसत आहेत असे दंत शस्त्रक्रियेत रक्तातील घटकाचा

**मुलांच्या निरोगी दातांसाठी दैनंदिन जेवणात भाकरी आणि आठवड्यातून किमान एक वेळी ऊस बदाम जांब शेंगदाणे असे कडक पदार्थ फळे खाऊ घालने आवश्यक आहे . दाताची रचना यावरच जबड्याचा आकार ठरतो आणि कांद्यामुळे चेहऱ्याची ठेवणं ठरत असते म्हणून वेळीच काळजी घेणे आवश्यक आहे .**

**दंत तज्ञ डॉ रोहिणी माले – भंडारे**

हिरड्यांच्या हाडाच्या मजबुती साठी उपयोग कसा करता येतो याचा शोध लावून जागतिक पातळीवर मान्यता घेणाऱ्या उदगीरच्या सुनबाई तथा कारगील युद्धातील शहीद बालाजी माले यांची कन्या डॉ रोहिणी माले – भंडारे यांनी सांगितले . मागील २० /२५ वर्षात ब्रेड बटर , बिस्कीट यासारख्या अत्यंत मऊ मऊ खाद्यान्नामुळे मुलाचे जबड्याचा आकार लहान झाला आहे . या बदललेल्या आकाराने अक्कल दाढ येणेच बंद झाले असून अठ्ठावीस ते तिसच दात मुलांना राहिले असल्याचे धक्कादायक वास्तव्य त्यांनी सांगितले . आपल्या दैनंदिन खाण्या पिण्याच्या सवयीचा परिणाम जैविक रचनेत झाला असून मुलांची जबड्याची रचनाच बदलून गेली. मुलांना ३२ ऐवजी २८ ते ३० दात येत आहेत अक्कल दाढ येतच नाहीत . अशा दाताच्या मुलांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे . लहान मुलांना भाकरी , ऊस , खारीक , कच्चे जांब, बदाम , शेंगदाणे यासारखे पदार्थ खाऊ घालण्या ऐवजी मऊ असे पदार्थ खाऊ घातल्याने हा बदल झाला असल्याचे डॉ. रोहिणी भंडारे यांनी सांगितले .

जॉचा (जबड्याचा) आकार आणि रचना मुख्यतः आनुवंशिकता (GENETICS) , लहानपणीची वाढ आणि विकास , सवयी (चावणे, श्र्वसन, पोश्र्चर) यावर अवलंबून असते .

अक्कल दाढ न येण्याची समस्या वाढलेली आहे . प्रत्येक पिढीतील खानपणाचा परिणाम हा पुढील पिढीवर नैसर्गिक रित्या परिणाम करीत असतोच . पूर्वीच्या काळी संपूर्ण जेवण हे बत्तीस दाताने चावून साधारण ३५ मिनिटात संपत असे . भात चपाती वरण भाजी असे मऊ मऊ जेवणाने आता १० ते १५ मिनिटात जेवण होत आहे . भाकरी ऊस,खारीक , कच्चे जांब, बदाम , शेंगदाणे , धपाटे यासारखे फळे , पदार्थ चावण्यासाठी वेळ लागतो यामुळे चावण्याची शक्ती वाढली जाते. कडक पदार्थ , फळे ही किमान आठवड्यातून एकदा तरी खाल्ली गेली पाहिजेत .

प्रोसेस केलेले अन्न पदार्थ खाणे टाळावे . मुलांना आपण आपल्या विविध सणातून फळ आणि पदार्थ खाण्याची ओळख करून द्यावी , जेणेकरून खाण्याची आवड वाढीस लागेल .चावण्याची वेळ वाढली की दाताची शक्तीही वाढीस लागते .

सातत्याने प्रोसेस केलेले अन्न पदार्थ ब्रेड बिस्कीट आणि फक्त मऊ मऊ पदार्थ खाण्याने बालकांचे दुधाचे दात लवकर जाण्याचा धोका निर्माण होतो .

एकही दात लवकर गळाला तर मोकळी जागा निर्माण झाल्याने आजूबाजूचे आणि नव्याने येणारे दात वेडे वाकडे येतात . अशावेळी क्लिप बसवावी लागते म्हणून वेळीच दाताची काळजी घ्यावी असे डॉ रोहिणी यांनी सांगितले.

### जय भारत विद्यालय, निकाल ९६.४६%

तभा वृत्तसेवा
निलंगा दि. ८ मे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेतलेल्या इयत्ता १० वी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, निलंगा तालुक्यातील जय भारत विद्यालय, दापका या शाळेने घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ९६.४६ टक्के लागला असून, विद्यालयातून प्रथम कु. ज्योती सुनील खरजुले (९७.२०%), द्वितीय कु. प्रांजल परमेश्र्वर कटाळे (९६.८०%), तृतीय कु. सुमेधा दयानंद कांबळे (९६.००%) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी गुणवत्तेचा उच्चांक प्रस्थापित केला आहे. या वर्षी विद्यालयातून एकूण २२६ विद्यार्थी परीक्षेला बसले होते, त्यापैकी २१८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ९० % पेक्षा जास्त गुण घेणाऱ्या विध्यार्थांची संख्या ३० असून, ९८ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवून शाळेच्या यशात मानाचा तुरा रोवला आहे. तसेच ७६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ३७ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत आणि ७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

# माचरटवाडी ग्रामस्थांना पाणी टंचाई च्या झळा...

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा दि. ८ मे :** तालुक्यातील माचरटवाडी येथील ग्रामस्थांना मागील अनेक वर्षांपासून पाणीटंचाईच्या झळा जाणवत असून नदी उशाला अन कोरड घशाला अशी अवस्था गावकऱ्यांची झाली आहे.

पिण्याच्या पाण्याचा प्रश्र्न गंभीर असुनही माचरटवाडी गावाच्या मुलभूत सुविधांकडे लक्ष देण्यास प्रशासन तयार नाही.

वारंवार प्रशासनाला कळवूनही, पंचायत समितीवर महिलांचा घागर मोर्चा काढुनही प्रशासन मात्र झोपेचं सोंग घेत आहे. नागरिकांच्या संयमाचा अंत संपल्यामुळे गावातील नागरिक आंदोलन करण्याच्या मनस्थितीत आहेत. एकीकडे प्रशासन पाणीटंचाईवर बैठकावर बैठका घेत आहे पण या बैठकीच्या माध्यमातून पाणी प्रश्र्न कुठला सुटलेला दिसत नाही

शासन स्तरावर प्रत्येक नागरिकाला शुद्ध पिण्याचे पाणी मिळणे अपेक्षित असताना पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यांच्या उदासीन धोरणामुळे ग्रामस्थांना दूरवरून पाणी आणुन दूषित पाणी प्यावे लागत आहे. ग्रामपंचायतला काही निधी उपलब्ध असताना ग्रामपंचायतीने परस्पर हा निधी अस्तित्वात नसलेल्या ऑपरेटरच्या पगार देण्यासाठी वापरला पण मूलभूत हक्कात येणारे पिण्याचे पाणी गावकऱ्यांना देणे ग्रामपंचायतीने उचित समजले नाही. येणाऱ्या आठ दिवसात माचरटवाडी गावाचा पिण्याचा पाण्याचा प्रश्र्न सुटला नाहीतर पंचायत समितीवर आंदोलन करण्यात येईल. त्यानंतर आंदोलनाचं स्वरूप आणखी तीव्र करुन आमरण उपोषण करण्यात येईल. जोपर्यंत गावच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्र्न सुटत नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार ग्रामस्थांनी केला आहे.

**ग्रामस्थांच्या मागणीची दखल घेत**

निलंगा पंचायत समिती सभापती प्रतिनिधी डॉ. संतोष वाघमारे यांना माचरटवाडी गावच्या पाण्यासंदर्भात माहिती दिली असता त्यांनी तातडीने गावाला भेट दिली.प्रत्यक्ष वस्तुस्थिती पाहुन खरंच गावात पिण्याच्या पाण्याचा प्रश्र्न गंभीर आहे यावर प्रशासनाशी बोलुन लवकरात लवकर हा प्रश्र्न मार्गी लावु असे सांगितले.

# पाणी टंचाईच्या बैठकीला सभापती,उपसभापतीची दांडी

## शिरूर अनंतपाळ मध्ये पाणी टंचाईचा आढावा बारगळला

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ दि. ८ मे :** तालुक्यात उन्हाचा कडाका वाढत असताना आणि ग्रामस्थांना पाणी टंचाईच्या झळा सोसाव्या लागत असताना, लोकप्रतिनिधींच्या बेजबाबदारपणाचा नमुना शिरूर अनंतपाळ पंचायत समिती मध्ये समोर आला आहे. ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पाणी टंचाई आढावा बैठकीला खुद्द पंचायत समितीचे सभापती संजय सूर्यवंशी व उपसभापती पूनम चव्हाण यांनीच दांडी मारल्याने ही महत्त्वाची बैठक बारगळली आहे.

तालुका वाशीयांना पाणी टंचाईचे चटके बसत असून उन्हाळ्यात पाणी प्रश्र्नावर चर्चा करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते पण सभापतींनी बैठकीकडे पाठ फिरवल्याने पंचायत समिती सदस्य हमीद पटेल यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग (जि.प.), शिरूर अनंतपाळ यांच्या वतीने तालुक्यातील पाणी टंचाईचा आढावा घेण्यासाठी पंचायत समितीच्या सभागृहात सोमवारी (४ मे) दुपारी ११ वाजता एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीचे निमंत्रण तालुक्यातील सर्व सरपंच आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना देण्यात आले होते. बैठकीचा विषय अत्यंत गंभीर असतानाही, नियोजित वेळी केवळ दोन अधिकारी आणि पंचायत समिती सदस्य हमीद पटेल हेच सभागृहात उपस्थित झाले होते.

या बैठकीचे नियोजन करून सभापती गायब झाले असल्याने अनेक प्रश्र्न उपस्थित झाले. विशेष म्हणजे, विकासकामांच्या आणि पाणी टंचाईच्या नियोजनासाठी सभापतींच्या सूचनेवरूनच अशा बैठकांचे आयोजन केले जाते. मात्र, बैठकीची वेळ उलटून गेल्यानंतरही सभापती संजय सूर्यवंशी फिरकलेच नाहीत. ही पहिलीच वेळ नसून, यापूर्वीही विकासकामांच्या संदर्भात आयोजित केलेल्या बैठकांना सभापती अनुपस्थित राहिल्याची माहिती समोर आली आहे. खुद्द सभापती आणि उपसभापतीच गायब असल्याने बैठकीत धोरणात्मक निर्णय घेता आले नाहीत, परिणामी ही बैठक कोणताही निर्णय न घेता विसर्जित करावी लागली.

**शिरूर अनंतपाळ तालुक्यातील ग्रामीण भागातील पाणीटंचाई आढावा बैठकीच्या अनुउपस्थीती बदल पंचायत समिती चे सभापती संजय सूर्यवंशी यांच्याशी संपर्क केला असता ते म्हणाले कि निलंगा विधानसभा कार्य क्षेत्रातील तीन्ही पंचायत समिती च्या सभापती व गटविकास अधिकारी यांची तातडीची बैठक लातूर येथील शासकीय विश्राम गृहावर आ संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी बोलविल्यामुळे आम्ही त्या टंचाईच्या आढावा बैठकीला गेलो होतो . येथील बैठक घेण्यासाठी संबधीताना सांगीतले होते . आम्हाला या बैठकीला वेळ देणे शक्य झाले नाही असे ते संपर्क साधला असता म्हणाले .**

या प्रकारामुळे पंचायत समिती सदस्य हमीद पटेल यांनी सभापती आणि उपसभापतींच्या कारभारावर जोरदार टीका केली आहे. पटेल म्हणाले की, जर स्वतः सभापतीं व उपसभापती यांना बैठकीला उपस्थित राहण्यासाठी वेळ नसेल, तर अशा बैठक आयोजीत करण्याचे ढोंग करण्याची गरज काय? प्रशासकीय अधिकाऱ्यांना आणि सदस्यांना वेठीस धरण्याचा हा प्रकार निंदनीय आहे. तालुक्यात पाण्यासाठीचा टाहो फुटला असताना लोकप्रतिनिधींना त्याचे गांभीर्य नसावे, हे दुर्दैव आहे. उन्हाळ्याच्या पार्श्र्वभूमीवर टँकरचे नियोजन, विहीर अधिग्रहण आणि पाणी पुरवठा योजनांची दुरुस्ती यांवर चर्चा होणे अपेक्षित होते. मात्र, सभापतींच्या अनुपस्थितीमुळे तालुक्यातील पाणी प्रश्र्नाचा पेच अधिकच वाढला आहे. बैठकीचे आयोजन करून जर प्रमुख लोकप्रतिनिधीच दांडी मारत असतील, तर जनतेच्या प्रश्र्नांची सोडवणूक कोण करणार ? असा सवाल आता तालुक्यातील नागरिक विचारत आहेत.

या बेजबाबदार वर्तनामुळे सभापती व उपसभापतीं विरोधात लोकप्रतिनिधी च्या विरोधात ग्रामीण जनतेतुन संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### रहेमानिया विद्यालयाची यशाची परंपरा कायम





**तभा वृत्तसेवा**
निलंगा **दि. ८ मे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या बारावीच्या निकालात निलंगा येथील रहेमानिया उच्च माध्यमिक विद्यालया घवघवीत यश संपादन करून आपली यशाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाचा विज्ञान शाखेचा

निकाल ९० % लागला असून, कला शाखेचा निकाल ८०.५५ टक्क्यांनी लागला आहे.विद्यार्थ्यांनी यशाचे परंपरा कायम राखली आहे.

विज्ञान शाखानिहाय निकालाचा तपशील:

प्रथम जाधव माही संजय (६४.५०%)

द्वितीय: येळनूरे श्रेया विनोद (६१.१७%)

तृतीय: शेख जुनेरा फातिमा रिजवान (६०.६७.%),कला शाखा: कला शाखेचा निकाल प्रथम: बागवान शिरीन फातिमा सिद्दिकी (५३.५०%) द्वितीय : औटी जबीन खालिद (४९.००%),शेख सना शमशोदिन ४९.टक्के तृतीय: सबुर फैसल मो. राहबर शाह (४८.१७%),शेख जोया इस्माईल ४८.१७ टक्केगुण प्राप्त करून यश संपादन केले आहेत.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष हाजी मंजूर अहेमद देशमुख,सचिव हाजी फारुख अहेमद देशमुख, प्राचार्य यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे आणि मार्गदर्शक प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

**जाहीर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर अनंतपाळ यांचे कार्यालय
(दंडीय – विभाग)
ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर, जा. क्र.२०२६ एमएजी/कावि
तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, शिरूर अनंतपाळ यांच्या न्यायालयान

जन्मः मृत्यु नोंदणी बाबत,

श्री. किशन गणपतराव काकडे विरुध्द ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय अकुंलगा (राणी )ज्याअर्थी नामे गायत्री किशन काकडे रा. अंकुलगा (राणी) ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांचा यांच्या मुलाचा मुलीचा/नाताचा/नातीचा जन्म दि. ०२/०२/२००८ मौजे. अकुलगा (राणी) ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे झाला आहे. ज्याअर्थी अर्जदार किशन गणपतराव काकडे रा. अकुंलगा (राणी) यांनी या न्यायालयात त्यांच्या मुलाच्या/मुलीच्या/नाताच्या नातीच्या जन्माची नोंद करण्यासाठी आदेशीत करावे असा अर्ज दाखल केला आहे. त्या पृष्ठयार्थ त्यांनी शपथपत्र व ग्रामपंचायत कार्यालय अकुंलगा (राणी) ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे त्यांच्या जन्माबाधतची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे.

त्याअर्थी सदरहू नामे गायत्री किशन काकडे रा. अकुलगा (राणी) ता. शिरूर अनतपाळ जि. लातूर हयाचा हिचा जन्म दिनांक ०२/०२/२००८ रा. अकुंलगा (राणी) रोजी झाला नाही, असे कोणास सांगावयाचे असेल, तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरह नामे गायत्री किशन काकडे रा. अकुंलगा (राणी) ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांचा जन्म तारखेबाबत लागलहीच पुरावा घेवून अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत पुढील १५दिवसानंतर आदेश देण्यात येईल .

तहसिलदार तथा
तालुका कार्यकारी दंडाधिकारी
शिरूर अनंतपाळ

**जाहीर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर अनंतपाळ यांचे कार्यालय
(दंडीय – विभाग)
ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर. जा. क्र.२०२६ एमएजी/कावि
तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, शिरूर अनंतपाळ यांच्या न्यायालयात

जन्म / मृत्यु नोंदणी बाबत.

श्री. किशन गणपतराव काकडे विरुध्द ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय अकुंलगा (राणी) ज्याअर्थी नामे. प्रविण किशन काकडे रा. अकुंलगा (राणी) ता. शिरूर अ. रोजी जि. लातूर यांचा/ यांच्या मुलाचा/मुलीचा/माताचा/नातीचा जन्म दि. ०७/१०/२०१० मौजे, अकुंलगा (राणी) ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे झाला आहे. ज्याअर्थी अर्जदार किशन गणपतराव काकडे रा. अकुंलगा (राणी) यांनी या न्यायालयात त्यांच्या मुलाच्या/मुलीच्या/नाताच्या नातीच्या जन्माची नोंद करण्यासाठी आदेशीत करावे असा अर्ज दाखल केला आहे. त्या पृष्ठयार्थ त्यांनी शपथपत्र व ग्रामपंचायत कार्यालय अकुंलगा (राणी) ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे त्यांच्या जन्माबाबतची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे.

त्याअर्थी सदरहू नामे प्रविण किशन काकडे रा. अकुंलगा (राणी) ता. शिरूर अनतपाळ जि. लातूर हयाचा/ हिचा जन्म दिनांक. ०७/१०/२०१० रा. अकुंलगा (राणी) रोजी झाला नाही, असे कोणास सांगावयाचे असेल, तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू नामे प्रविण किशन काकडे रा. अकुंलगा (राणी) ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांचा जन्म तारखेबाबत लागलहीच पुरावा घेवून अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत पुढील १५दिवसानंतर आदेश देण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका कार्यकारी दंडाधिकारी
शिरूर अनंतपाळ

**जाहीर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर अनंतपाळ यांचे कार्यालय
(दंडीय – विभाग)
ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर जा.क्र.२०२६ एमएजी/कावि
तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, शिरूर अनंतपाळ यांच्या न्यायालयात

जन्म/ मृत्यु नोंदणी बाबत.

श्री. प्रकाश गणपतराव काकडे विरुध्द ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय अकुंलगा (राणी) ज्याअर्थी नामे नवनाथ प्रकाश काकडे रा. अकुंलगा (राणी) ता. शिरूर अ. रोजी जि. लातूर यांचा/ यांच्या मुलाचा/मुलीचा/माताचा/नातीचा जन्म दि. १६/०५/२००० मौजे. अकुंलगा (राणी) ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे झाला आहे. ज्याअर्थी अर्जदार प्रकाश गणपतराव काकडे रा. अकुंलगा (राणी) यांनी या न्यायालयात त्यांच्या मुलाच्या/मुलीच्या/नाताच्या/नातीच्या जन्माची नोंद करण्यासाठी आदेशीत करावे असा अर्ज दाखल केला आहे. त्या पृष्ठयार्थ त्यांनी शपथपत्र व ग्रामपंचायत कार्यालय अकुंलगा (राणी) ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे त्यांच्या जन्माबाबतची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे.

त्याअर्थी सदरहू नामे नवनाथ प्रकाश काकडे रा. अकुंलगा (राणी) ता. शिरूर अनतपाळ जि. लातूर ह्याचा/ हिचा जन्म दिनांक. १६/०५/२००० रा. अकुंलगा (राणी) रोजी झाला नाही, असे कोणास सांगावयाचे असेल, तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू नामे नवनाथ प्रकाश काकडे रा. अकुंलगा (राणी) ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांचा जन्म तारखेबाबत लागलहीच पुरावा घेवून अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत पुढील १५ दिवसांनंतर आदेश देण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका कार्यकारी दंडाधिकारी
शिरूर अनंतपाळ

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## तेरखेडा येथील पवनचक्की प्रकल्पावर चोरी; दीड लाखांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ मे -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा शिवारातील टाटा कंपनीच्या पवनचक्की प्रकल्पावर अज्ञात चोरट्यांनी डल्ला मारत केबल कापून तांब्याची वायर चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या चोरीमुळे कंपनीचे अंदाजे १ लाख ५० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

कंपनीचे ठेकेदार दत्तात्रय शिवाजी माने यांनी येरमाळा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. दि.८ मे रोजी पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास तेरखेडा शिवारातील पवनचक्की साईट क्रमांक केटी-२० येथे पाहणीदरम्यान हा प्रकार उघड झाला.

अज्ञात चोरट्यांनी पवनचक्कीच्या आत प्रवेश करून केबल कटरच्या सहाय्याने केबल कापत तांब्याची वायर लंपास केली. घटनास्थळी पाहणी करताना काही कागदपत्रे तसेच आधार कार्ड मिळून आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

मागील काही दिवसांपासून वाशी तालुक्यासह जिल्ह्यातील विविध पवनचक्की कंपन्यांमध्ये चोरीच्या घटना सातत्याने घडत आहेत. आतापर्यंत कोट्यवधी रुपयांच्या चोऱ्यांच्या तक्रारी दाखल झाल्या असून चोरट्यांना जेरबंद करण्याचे मोठे आव्हान पोलीस प्रशासनासमोर उभे ठाकले आहे.

# तुळजापूरात पोलीसांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा बट्याबोळ

## ▶▶ तुळजापूर शहरात अवैद्य धंदे नियम बाह्य... ▶▶ ड्रग्स, दारु, गांजा, इत्यादी विक्री व व्यवसाधीनचे प्रकारात दिवसेंदिवस वाढ...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ मे -**

श्रीक्षेत्र तुळजापूर येथील कायदा व सुव्यवस्था धाब्यावर बसवून शहरात खुन, चोऱ्या व रस्त्यावरील वाहने अडवून लूटमारीचे प्रकार वाढत असून त्याला सर्वस्व जबाबदार तुळजापूर पोलिस स्टेशन व कर्मचारी लुटमारीशी हाममिळवणी करीत असल्याचा आरोप करत पोलीस अधीक्षकांना शहरवासीयांसोबतच भाविक भक्त आणि महाविकास आघाडीच्या वतीने निवेदन देण्यात आले.

निवेदनात असे म्हटले आहे की, श्रीक्षेत्र तुळजापूर येथे येणाऱ्या भक्तांची वाहने रस्त्यात अडवून दिवसा व रात्री लुटमारीचे प्रकार वारंवार घडत आहेत.



तसेच तुळजापूर शहरातील महिला व भक्त यांचे भर दिवसा गळ्यातील सोन्याचे दागिने चोरी होत आहेत.

अद्याप एकाचाही तपास केलेला नाही व भर चौकात रहदारीच्या रस्त्यावर जिवंत मारणे आणि हात, पाय, मोडून डोके फोडण्याचे प्रमाण हे फार वाढले असून याला सर्वस्व जबाबदार तुळजापूर पोलिस स्टेशन आहे. तसेच तुळजापूर शहरात अवैद्य धंदे नियम बाह्य ड्रग्स, दारु, गांजा, इत्यादी विक्री व व्यवसाधीनचे प्रकार दिवसान दिवस वाढ होत असून तुळजापूर पोलिस स्टेशनचे अधिकारी, कर्मचारी यांनी कायदा व सुव्यवस्थेचा बट्याबोळ केलेला आहे. तसेच महिला, लहान मुले आणि तरुण विद्यार्थिनी यांना आपल्या शहरात वावरणे कठीण झाले आहे. या गुन्हेगारीमुळे बाहेरुन शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थी व पालकांच्या मनात दहशत निर्माण झाली असून, शिक्षणास येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेनदिवस कमी होत आहे.

या सर्व बाबींकडे कायदा व सुव्यवस्था सांभाळणारे पोलीस खाते व गुप्तचार यंत्रणा दुलर्क्ष करित असलेले जाणवत असून यामुळे वाईट प्रवृत्तीच्या गुंडावर कायद्याचा वचक व भिंती राहिलेली नसून, त्याच बरोबर मागील बऱ्याच वर्षांपासून चोऱ्या व इतर गुन्ह्यांचा अद्याप तपास लागलेला जाणवत नाही. निवेदनचा विचार करुन तुळजापूर पोलिस स्टेशन अधिकारी व काही कर्मचारी यांची नार्को टेस्ट केल्यावर सर्व काही बाहेर येईल तरी याबाबत पोलीस अधीक्षकांनी त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करुन तुळजापूर शहर व तालुका कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून तुळजापूर शहर व तालुका बहिमुक्त करावे अशी विनंती दिलेल्या निवेदनात केली आहे.

तसेच नाविलाजास्तव पोलीस प्रशासनाच्या विरोधात लोकशाही मार्गाने जन अंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.



तुळजापूर वासी भाविक भक्त आणि महाविकास आघाडीचे पोलीस अधीक्षकांना निवेदन

सदरील निवेदनावर अ‍ॅड. धीरज पाटील, अमर मगर, अमोल कुतवळ, रणजीत इंगळे, भाऊ भांजी, शाम पवार, उत्तम अमृतराव, आनंद जगताप, चिन्मय मगर, सुदर्शन वाघमारे, आनंद रोचकरी, किरण कदम, किरण खपले यांच्यासह तुळजापूर वाशी भाविक भक्त आणि महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्ते सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## मात्रेवाडी गाव पुन्हा बँक ऑफ महाराष्ट्र ईट शाखेलाच जोडण्याची मागणी; आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.८ मे -**

भूम तालुक्यातील मात्रेवाडी गाव पूर्वी बँक ऑफ महाराष्ट्र ईट शाखेला संलग्न होते. मात्र, जिल्हाधिकाऱ्यांनी ग्रामस्थांची सहमती न घेता हे गाव आयसीआयसीआय भूम शाखेला जोडल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या निर्णयामुळे शेतकरी व नागरिकांची मोठी गैरसोय होत असल्याने गाव पुन्हा बँक ऑफ महाराष्ट्र ईट शाखेलाच जोडण्यात यावे, अशी मागणी ग्रामपंचायतीच्या ठरावाद्वारे करण्यात आली आहे.

ग्रामपंचायतीच्या बैठकीत बहुमताने मंजूर करण्यात आलेल्या ठरावात नमूद करण्यात आले आहे की, गावातील अनेक शेतकऱ्यांची पीक कर्जे बँक ऑफ महाराष्ट्र ईट शाखेत सुरू आहेत. तसेच गावापासून ईट येथील शाखेचे अंतर अवघे ८ किलोमीटर असून भूम येथील आयसीआयसीआय बँकेचे अंतर सुमारे १५ किलोमीटर आहे. त्यामुळे व्यवहारासाठी नागरिकांना अतिरिक्त प्रवास करावा लागत आहे.

> पूर्वीपासून आमचे मात्रेवाडी गाव बँक ऑफ महाराष्ट्र ईट शाखेलाच दत्तक होते. मात्र मागील वर्षापासून ते दुसऱ्या बँकेला जोडण्यात आले आहे. आमचे गाव पुन्हा पूर्वीप्रमाणे बँक ऑफ महाराष्ट्र ईट शाखेलाच जोडावे, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल.
> **- विठ्ठल आडागळे**

मात्रेवाडी गावाची प्रमुख बाजारपेठ ईट येथे असून गावातील नागरिकांचे दैनंदिन दळणवळणही ईटशीच आहे. गावातील बहुतांश नागरिकांची बँक खाती बँक ऑफ महाराष्ट्र ईट शाखेत आहेत. भूम येथील आयसीआयसीआय बँकेत अत्यल्प नागरिकांची खाती असून शेतकऱ्यांची खाती जवळपास नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

ग्रामस्थांनी प्रशासनाला इशारा देत, गाव पुन्हा बँक ऑफ महाराष्ट्र ईट शाखेलाच संलग्न न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिला आहे.

## पंच परिवर्तनातून समाज परिवर्तन घडविण्याचा संघाचा प्रयत्न : प्रमोद बापट

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.८ मे -**

पंच परिवर्तनाच्या माध्यमातून समाज परिवर्तन घडवून देशाला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रयत्न सुरू असल्याचे प्रतिपादन प्रमोद बापट यांनी केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त कळंब येथे आयोजित 'प्रमुख नागरिक संगोष्टी' परिसंवाद कार्यक्रमात ते मुख्य वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर धाराशिव जिल्ह्याचे संघचालक रवींद्र कदम उपस्थित होते.

प्रमोद बापट यांनी भारताच्या प्राचीन वैभवाचा तसेच मध्ययुगीन काळातील आक्रमणांचा आढावा घेताना सांगितले की, भारत एकेकाळी सर्वच क्षेत्रांत समृद्ध होता. मात्र गेल्या दोन हजार वर्षांतील विविध आक्रमणांमुळे येथील समाजव्यवस्था विस्कळीत झाली. प्राचीन काळात समाजातील जखमा भरून काढण्याची आंतरिक व्यवस्था होती; परंतु इस्लामी आणि इंग्रजी राजवटीत समाजाचे स्वत्व आणि आत्मविश्वास हरवल्याने समाज न्यूनगंडाच्या गर्तेत गेला, असेही त्यांनी नमूद केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही व्यक्तीला वैयक्तिक ओळखीपलीकडे जाऊन समाजाशी जोडणारी कार्यपद्धती असल्याचे सांगताना त्यांनी, संघात आल्यानंतर स्वयंसेवकाचा प्रवास स्वतःकडून व्यापक समाजहिताकडे सुरू होतो, असे स्पष्ट केले. सन १९२५ मध्ये डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी देशाला निस्वार्थी, सज्जन आणि सक्षम व्यक्तींची गरज ओळखून 'संघ शाखा' ही अनोखी कार्यपद्धती सुरू केली. आज याच प्रेरणेतून ४२ विविध संघटना आणि जगातील ३२ देशांमध्ये संघाचे कार्य विस्तारले असून संघ आता विशाल वटवृक्ष बनल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी प्रमोद बापट यांनी 'पंच परिवर्तन' संकल्पनेची सविस्तर माहिती दिली. आगामी काळात कुटुंब प्रबोधन, स्व-बोध (स्वदेशी), सामाजिक समरसता, पर्यावरण संरक्षण आणि नागरी शिष्टाचार या पाच विषयांवर समाजात प्रत्यक्ष कृती होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक धाराशिव जिल्ह्याचे प्रचार प्रमुख शशांक ढेंबरे यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. विजय घोळवे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय ड. मनोज चोंदे यांनी करून दिला. कार्यक्रमाची सुरुवात 'वंदे मातरम्' गीताने झाली, तर सांगता कुमारी साई काळे यांच्या राष्ट्रगीत गायनाने झाली.

शेवटी तालुका कार्यवाह दिलीप कदम यांनी आभार मानले.

यावेळी लातूर विभागाचे विभाग कार्यवाह व्यंकट दशरथ, विभाग कार्यकारिणी सदस्य अनिल यादव, सचिन क्षीरसागर, कळंब तालुका संघचालक डॉ. राजेंद्र बावळे, तालुका कार्यवाह दिलीप कदम, जिल्हा सदस्य विकास गाडेकर, नामदेव माने, नितीन कुलकर्णी, डॉ. रमेश जाधवर, श्रीकांत कळंबकर, नवनाथ खोडसे, सुनील बिक्कड तसेच कळंब तालुक्यातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते आणि निमंत्रित महिला-पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जलवाहिनीच्या कामामुळे नळदुर्गातील रस्त्यांची दुरवस्था



### पावसाळ्यापूर्वी दुरुस्तीची नागरिकांची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ मे -**

नवीन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत जलवाहिनी टाकण्यासाठी शहरातील विविध रस्ते खोदून ठेवण्यात आल्याने नळदुर्ग शहरातील रस्त्यांची मोठी दुरवस्था झाली आहे. पावसाळा तोंडावर आला असताना संबंधित कंत्राटदाराला रस्ते दुरुस्तीचे तात्काळ आदेश द्यावेत, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नांतून मंजूर झालेल्या नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम सध्या शहरात सुरू आहे.

हे काम सुजाता कन्स्ट्रक्शन कंपनीकडून करण्यात येत असून जलवाहिनी टाकण्यासाठी शहरातील अनेक रस्ते खोदण्यात आले आहेत. मात्र रस्ते खोदून चार महिने उलटून गेले तरी काम पूर्ण झाले नसल्याने रस्त्यांची दुरुस्ती अद्याप करण्यात आलेली नाही.

यामुळे नागरिकांना तसेच वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. दुचाकी व चारचाकी वाहनांनी प्रवास करताना मोठी कसरत करावी लागत असून अपघाताचा धोका वाढला आहे.

काम वेळेत पूर्ण करायचे नव्हते, तर चांगल्या स्थितीतील रस्ते का खोदले? असा सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

शहरातील चावडी चौक ते धर्मवीर संभाजी महाराज चौक, मराठा गल्ली, व्यासनगर यासह अनेक भागांतील रस्ते जलवाहिनीच्या कामामुळे उखडलेल्या अवस्थेत आहेत. पावसाळ्यापूर्वी या रस्त्यांची दुरुस्ती झाली नाही, तर नागरिकांना पायी चालणे तसेच वाहनाने प्रवास करणेही कठीण होणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

त्यामुळे नगरपालिका प्रशासनाने संबंधित कंत्राटदाराला शहरातील खोदलेले सर्व रस्ते तातडीने दुरुस्त करण्याचे आदेश द्यावेत, अशी जोरदार मागणी नळदुर्गकरांकडून करण्यात येत आहे.

## जयप्रकाश विद्यालयाचा दहावीचा ९९ टक्के निकाल; गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ मे -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथील इयत्ता दहावीचा निकाल यंदा ९९ टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

विद्यालयातील एकूण २५७ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी १४० विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले, तर ८४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत आणि २८ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचा संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष दादा कोळगे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये समीक्षा उमेश बागडे हिने ९६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. तनुजा उमाकांत नलावडे हिने ९५.६० टक्के गुणांसह द्वितीय, तर सायली अनिल कानवले हिने ९५.४० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला.

तसेच जास्मिन यासिन शेख ९५ टक्के, श्रेया विनोद पडवळ ९४.४० टक्के, समर्थ विजयकुमार जवादे ९४ टक्के, सृष्टी संतोष जाधव ९३.८० टक्के, अस्मिता दत्तात्रय सुरवसे ९३.४० टक्के, आदिती संतोष सुरवसे ९३ टक्के, सानिका नागनाथ जगताप ९३ टक्के आणि अनुष्का दत्तात्रय जाधव ९३ टक्के गुण मिळवून विशेष यश संपादन केले. संस्थेअंतर्गत जय श्रीराम मुलांचे वस्तीगृहातील राहुल यानेही ९४ टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश मिळविले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाष दादा कोळगे, रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, शिवकन्या साळुंके, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. प्रशांत कोळगे यांनी केले.

## रूपामाता व संत ज्ञानेश्वर विद्यालयाचा दहावीच्या निकालात उज्ज्वल यश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ मे -**

जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित रूपामाता माध्यमिक विद्यालय, पाडोळी (आ.) तसेच संत ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लासोना या दोन्ही विद्यालयांनी मार्च २०२६ च्या दहावी परीक्षेत यश संपादन करत निकालाची परंपरा कायम राखली आहे.

रूपामाता माध्यमिक विद्यालयाचा निकाल ९८.६३ टक्के लागला असून ७३ पैकी ७२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यामध्ये ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत ३४ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले, तर २८ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी प्राप्त केली. विद्यालयातील आदित्य सुखलाल गुंड याने ९४.४० टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. संचिता व्यंकट गुंड (९३.६०%) द्वितीय, तर रेणुका सतीश चव्हाण (९२.६०%) तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली. दरम्यान, संत ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लासोना यांनी १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली. विद्यालयातील ८ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले असून १६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. शेरीकर साहिल हुसेन (८९%) प्रथम, मेंढके अमन रज्जाक (८७%) द्वितीय, तर पाटील आरती अमोल (८५.६०%) तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

या यशाबद्दल संस्थापक अ‍ॅड. व्यंकटराव विश्वनाथराव गुंड पाटील, मार्गदर्शक सुधाकर गुंड, सचिव कौशल्या गुंड पाटील, अ‍ॅड. अजित गुंड पाटील, अ‍ॅड. शरद गुंड पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच दोन्ही विद्यालयांचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिरास नागरिकांचा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.८ मे -**

तहसील कार्यालयामार्फत वितरित करण्यात येणाऱ्या विविध दाखले व प्रमाणपत्रांसाठी नागरिकांची होणारी गर्दी टाळून एकाच ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिरास नागरिकांचा प्रतिसाद मिळाला.



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांच्या आदेशानुसार हे शिबिर प्रांत अधिकारी संतोष राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली व तहसीलदार जयवंत पाटील यांच्या प्रयत्नातून पार पडले.

उद्घाटनप्रसंगी भाजपचे राज्य परिषद सदस्य बाळासाहेब क्षिरसागर यांनी नागरिकांनी या शिबिराचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन केले. यावेळी नगराध्यक्ष संयोगिता गाढवे, नायब तहसीलदार प्रविण जाधव, उपनगराध्यक्ष लक्ष्मी साठे, नगरसेवक सुरज गाढवे, आबासाहेब मस्कर, चंद्रमणी गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांना लागणारी विविध प्रमाणपत्रे तात्काळ उपलब्ध करून देण्यासाठी तालुक्यात चार ठिकाणी शिबिरे घेण्यात आली. शिबिरात सातबारा, वारस नोंदी, तुकडेबंदी, ई-मोजणी, आयुष्मान भारत योजना, शिधापत्रिका, आधार नोंदणी, पीएम किसान योजना आदी विविध विभागांची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती.

महसूल विभागासह इतर शासकीय योजनांची माहिती व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

धाराशिव

# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## उपजिल्हा रुग्णालयात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.८ मे -**

वाढत्या उष्णतेच्या लाटेमुळे कळंब शहरासह उपजिल्हा रुग्णालय, विविध हॉस्पिटल व बाल रुग्णालयांत येणाऱ्या रुग्णांसाठी पिण्याच्या पाण्याची तात्काळ व्यवस्था करावी, अशी मागणी मानवी हक्क अभियान व श्रमिक मानवाधिकार संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

मानवी हक्क अभियानाचे मराठवाडा अध्यक्ष बजरंग ताटे व जिल्हाध्यक्ष माया शिंदे यांनी निवेदनाद्वारे ही मागणी केली. धाराशिव जिल्ह्यासह कळंब तालुक्यात तापमान ४० ते ४६ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्याने उपजिल्हा रुग्णालय, बाल रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे व ग्रामीण दवाखान्यांमध्ये रुग्णांची संख्या वाढली आहे.

मात्र या ठिकाणी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था नसल्याने गैरसोय होत आहे.

त्यामुळे प्रशासनाने तातडीने पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## संक्षिप्त वृत्त...




### राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात अनेकांचा जाहीर प्रवेश

**धाराशिव, दि.८ मे -**

धाराशिव येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) जिल्हा कार्यालयात पक्षप्रवेशाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. पद्मविभूषण खा. शरद पवार यांच्या विचारांनी प्रेरित होऊन सुशांत बनसोडे, दत्तात्रय वाघमारे, सुमित रणकाम, अरिफ शेख यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी पक्षात जाहीर प्रवेश केला. प्रदेश सरचिटणीस जावेद खैरडी, जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील, युवती राष्ट्रीय अध्यक्षा सक्षना सलगर, युवक जिल्हाध्यक्ष शेखर घोडके, महिला जिल्हाध्यक्षा मनीषा पाटील, शहराध्यक्ष बबलू शेख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. नवप्रवेशित कार्यकर्त्यांचे स्वागत करून आगामी काळात पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी तळागाळात काम करण्याचा विश्वासही यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला.

### सृष्टी पोतदार हिचे दहावीत उज्ज्वल यश

**उमरगा, दि.८ मे -**

दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर होताच विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



यामध्ये सृष्टी नागेश पोतदार हिने ७८ टक्के गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे. तिच्या या यशामुळे कुटुंबीयांसह परिसरातून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. सृष्टीने नियमित अभ्यास, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर हे यश मिळवले. तिच्या यशामागे पालकांचे मार्गदर्शन तसेच शिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे. दहावीच्या परीक्षेतील या यशामुळे सृष्टीच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस नवी दिशा मिळाली असून भविष्यातही ती उच्च यश संपादन करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. तिच्या उज्ज्वल यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.




### जि.प. शाळा पन्हाळवाडीचा मानाचा तृतीय क्रमांक; एक लाखांचे बक्षीस

**भूम, दि.८ मे -**

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्रमांक २ सन २०२४-२५ अंतर्गत जि.प. शाळा पन्हाळवाडीने उत्कृष्ट कामगिरी करत तालुक्यात तृतीय क्रमांक पटकावला असून शाळेला एक लाख रुपयांचे बक्षीस जाहीर झाले आहे. १ मे रोजी पं.स. भूम व गटशिक्षणाधिकारी कार्यालय भूम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिक्षक गौरव पुरस्कार वितरण सोहळ्यात गटशिक्षणाधिकारी राहुल भट्टी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. जि.प. प्रा. शाळा पन्हाळवाडीच्या माजी मुख्याध्यापिका वनिता कोकाटे, पोपट बोराडे, माजी सहशिक्षक पोतरे, स्वयंसेविका प्रिती पन्हाळे तसेच पालक, माता व विद्यार्थ्यांनी एकत्रित प्रयत्नातून हे यश संपादन केले. तालुक्यातील सुमारे ११७ शाळांमधून पहिली ते चौथीपर्यंतची छोटी शाळा असूनही विविध निकषांची यशस्वी पूर्तता करून पन्हाळवाडी शाळेने मोठे यश मिळवले आहे.



### तुळजाभवानी अभियांत्रिकीत इंडस्ट्रियल ऑटो सेक्टर विषयावर सेमिनार

**तुळजापूर, दि.८ मे -**

श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयात इंडस्ट्रियल ऑटो सेक्टर विषयावर मार्गदर्शनपर सेमिनार उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, ऑटोमेशन प्रणाली व रोजगाराच्या संधींबाबत माहिती मिळावी या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ व महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी पांडुरंग भूमकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी इंडस्ट्री ४.०, ऑटोमेशन, रोबोटिक्स आणि भविष्यातील करिअर संधी याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच कमवा आणि शिका योजनेचा लाभ घेत आर्थिक अडचणींवर मात करून यश मिळविल्याचा प्रेरणादायी प्रवास विद्यार्थ्यांसमोर मांडला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ओमप्रकाश राजनकर होते. प्रस्तावना प्रा. संतोष एकदंते यांनी केली, सूत्रसंचालन अनुजा जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. गौसिया काझी यांनी मानले.

# मराठवाड्यात मध्य रेल्वेचा सर्वात मोठा 'सिंगल स्पॅन' पूल धाराशिवात



## शिंगोलीत उभा राहणार १०६ मीटरचा भव्य रेल्वे पूल

सोलापूर तरुण भारत विशेष...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ मे -**

जिल्ह्याच्या दळणवळण आणि विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या सोलापूर-तुळजापूर-धाराशिव नवीन रेल्वे मार्गाच्या कामाला आता वेग आला असून, या प्रकल्पातील सर्वात महत्त्वाचा आणि तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक टप्पा असलेल्या शिंगोली येथील रेल्वे पुलाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

विशेष म्हणजे, सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर उभारला जाणारा हा पूल मध्य रेल्वेच्या इतिहासातील सर्वाधिक लांबीचा 'सिंगल स्पॅन' पूल ठरणार असल्याने या प्रकल्पाकडे संपूर्ण मराठवाड्याचे लक्ष लागले आहे.

सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या ८४.४४ किलोमीटर लांबीच्या नवीन रेल्वे मार्गाचे काम सध्या विविध ठिकाणी वेगाने सुरू आहे. या प्रकल्पाच्या प्रगतीचा अधिकाऱ्यांनी नुकताच शिंगोली येथे प्रत्यक्ष भेट देऊन आढावा घेतला. रेल्वे मार्गाच्या पहिल्या टप्प्यात धाराशिव ते तुळजापूर हा भाग मार्च २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानंतर सोलापूर ते तुळजापूर या दुसऱ्या टप्प्याचे काम पूर्ण केले जाणार आहे. या प्रकल्पामुळे राज्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असलेल्या तुळजापूरला रेल्वेचे थेट जाळे उपलब्ध होणार असून, देशभरातून श्री तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांचा प्रवास अधिक सोयीस्कर आणि जलद होणार आहे. त्याचबरोबर स्थानिक नागरिक, व्यापारी, विद्यार्थी आणि उद्योग क्षेत्रालाही या रेल्वेमार्गाचा मोठा फायदा होणार आहे.

शिंगोली येथे सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गाला ओलांडणारा रेल्वे पूल अत्यंत आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उभारला जात आहे. या पुलातील दोन खांबांमधील अंतर तब्बल १०६ मीटर इतके असणार आहे. एवढ्या मोठ्या अंतराचा 'सिंगल स्पॅन' असलेला हा मध्य रेल्वेचा पहिलाच पूल असल्याचे सांगितले जात आहे. या पुलासाठी सध्या ड्रिलिंग आणि पायाभरणीचे काम मोठ्या वेगाने सुरू असून अत्याधुनिक मशिनरीचा वापर करण्यात येत आहे. पुलाच्या मुख्य संरचनेचे काम पूर्ण होण्यासाठी सुमारे तीन महिन्यांचा कालावधी अपेक्षित आहे. त्यानंतर लॉन्चिंग आणि इतर तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आणखी आठ ते नऊ महिने लागणार आहेत.

महामार्गावरील वाहतूक सुरळीत ठेवत टप्प्याटप्प्याने पुलाची उभारणी केली जाणार असून, यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. पुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर हा पूल मराठवाड्यातील रेल्वे अभियांत्रिकीचा एक महत्त्वपूर्ण नमुना म्हणून ओळखला जाणार आहे.

धाराशिव रेल्वे स्थानकापासून शिंगोलीच्या दिशेने रेल्वे ट्रॅकचे काम वेगाने सुरू असून, अनेक ठिकाणी माती भरणे, लेव्हलिंग आणि संरचनात्मक कामे अंतिम टप्प्यात पोहोचत आहेत. या प्रकल्पामुळे धाराशिवकरांचे अनेक वर्षांपासूनचे रेल्वे स्वप्न आता प्रत्यक्षात उतरत असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

रेल्वे मार्ग सुरू झाल्यानंतर धाराशिव आणि तुळजापूर या धार्मिक, शैक्षणिक आणि व्यापारी केंद्रांना मोठी चालना मिळणार असून, भविष्यात या भागाच्या आर्थिक विकासालाही नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



## नळदुर्गकरांच्या महामार्ग समस्यांची अधिकाऱ्यांकडून पाहणी



### जुना रस्ता सुरू करण्याची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ मे -**

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या सूचनेनुसार गुरुवारी (दि.८) राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी नळदुर्ग येथे पाहणी दौरा करून नळदुर्गकरांच्या महामार्गासंदर्भातील विविध समस्या जाणून घेतल्या. यावेळी नळदुर्ग ते जळकोट जुना राष्ट्रीय महामार्ग वाहतुकीसाठी पुन्हा खुला करावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली.

सोलापूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग सध्या नळदुर्ग शहराबाहेरील बायपास मार्गे वळविण्यात आला आहे. त्यामुळे नळदुर्ग ते जळकोटकडे जाणारा जुना राष्ट्रीय महामार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला असून नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. शहरात प्रवेशासाठी तयार करण्यात आलेला पर्यायी मार्ग अतिशय धोकादायक असल्याने अपघाताचा धोका वाढला असल्याची बाबही यावेळी निदर्शनास आणून देण्यात आली.

नळदुर्गकरांनी या समस्या आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तातडीने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन प्रत्यक्ष पाहणी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार अधिकाऱ्यांनी नळदुर्ग येथे भेट देत परिस्थितीची पाहणी केली.

यावेळी नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी जुना राष्ट्रीय महामार्ग तात्काळ सुरू करावा, नव्या महामार्गावरून शहरात येण्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यायी रस्त्याची व पुलाची रुंदी वाढवावी, तसेच श्रीक्षेत्र मैलारपूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात हायमास्ट दिवे उभारून प्रभावी गतीरोधक तयार करावेत, अशा मागण्या अधिकाऱ्यांकडे मांडल्या.

या पाहणी दौऱ्यात सुशांत भुमकर, तानाजी जाधव, श्रमिक पोतदार, पद्माकर घोडके, स्वप्नील काळे तसेच जमदाडे उपस्थित होते.

## विद्यानिकेतन विद्यालयाचा दहावीला शंभर टक्के निकाल

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.८ मे -**



येरमाळा येथील विद्यानिकेतन माध्यमिक विद्यालय व विद्यानिकेतन इंटरनॅशनल स्कूल यांनी इयत्ता दहावी बोर्ड परीक्षा २०२५-२६ मध्ये शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळे विद्यालयाला हे घवघवीत यश मिळाले.

या परीक्षेत नंदिनी प्रमोद पाटील व सिद्धांत मारुती बारकुल यांनी प्रत्येकी ९८.४० टक्के गुण मिळवत संयुक्त प्रथम क्रमांक पटकाविला. प्रिया किरण मते हिने ९५.२० टक्के गुणांसह द्वितीय, तर प्राची प्रशांत थोरबोले हिने ९४.४० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला.

तसेच सत्यम हनुमंत माळी (९२.५०%), सुदर्शन रमेश लकडे (९२.२०%), श्रद्धा अजित थोरबोले (९१.२०%) आणि उदय विकास जाधव (९०.८०%) यांनीही ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत विद्यालयाचा गौरव वाढविला. विद्यालयातील एकूण आठ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण प्राप्त केले आहेत.

विषयनिहाय विशेष प्राविण्यामध्ये विज्ञान विषयात सिद्धांत बारकुल यांनी ९९ गुण, गणितात ९८ गुण, तर हिंदी विषयातही ९९ गुण मिळविले. नंदिनी पाटील यांनी सामाजिक शास्त्र विषयात ९७ गुण मिळवत विशेष यश संपादन केले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सचिन पाटील, प्रशासकीय अधिकारी अनिल डोके, प्राचार्या रोहिणी शिंदे, मुख्याध्यापक संजय बांगर तसेच सचिव व डायरेक्टर स्वाती पाटील यांनी गुणवंत विद्यार्थी, पालक व शिक्षकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## जल जीवन मिशनची २९९ गावांत कामे रखडली; निष्क्रिय एजन्सींवर ब्लॅकलिस्टची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ मे -**

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'जल जीवन मिशन' अंतर्गत प्रत्येक घरापर्यंत शुद्ध पिण्याचे पाणी पोहोचवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असले, तरी धाराशिव जिल्ह्यात अनेक गावांमध्ये आजही नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. कंत्राटदारांच्या दिरंगाईमुळे जिल्ह्यातील तब्बल २९९ गावांच्या पाणीपुरवठा योजना रखडल्याचे समोर आले असून, निष्क्रिय ठरलेल्या तीन मोठ्या एजन्सींवर आता जिल्हा परिषद प्रशासनाने कठोर कारवाईचा बडगा उगारला आहे.

लोकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कंत्राटदारांच्या मनमानीमुळे रेंगाळत ठेवला जाणार नाही, अशा शब्दांत जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांनी प्रशासनाला स्पष्ट निर्देश दिले आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा महाडदळकर यांना संबंधित दोषी एजन्सींना तात्काळ काळ्या यादीत टाकण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सन २०१९-२० मध्ये ग्रामीण भागातील वाडी-वस्त्यांपर्यंत नळाद्वारे शुद्ध पाणी पोहोचावे, यासाठी 'जल जीवन मिशन'ची अंमलबजावणी सुरू करण्यात आली होती. धाराशिव जिल्ह्यात या मिशनअंतर्गत ५५० हून अधिक योजनांना मंजुरी देण्यात आली होती. नियोजनानुसार बहुतांश कामे २०२१ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र २०२६ चे अर्धे वर्ष संपत आले तरी अनेक योजना केवळ कागदावरच राहिल्या असून, काही ठिकाणी कामे अर्धवट अवस्थेत पडून आहेत. जि.प. अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांनी घेतलेल्या दोन दिवसीय मॅरेथॉन आढावा बैठकीत अनेक धक्कादायक बाबी उघडकीस आल्या. आकूसकर, सिद्धेश्वर आणि सोनी या तीन प्रमुख एजन्सींना जिल्ह्यातील एकूण ४५ योजनांची कामे देण्यात आली होती. मात्र यापैकी केवळ ८ कामे पूर्ण झाली असून तब्बल ३७ योजना अद्याप रखडलेल्या आहेत. अनेक ठिकाणी पाइपलाइन टाकण्याचे काम अपूर्ण आहे, तर काही गावांत जलकुंभ आणि शुद्धीकरण यंत्रणांची कामेही थांबलेली आहेत. प्रशासकीय राजवटीच्या काळात काही कंत्राटदारांनी मोठ्या प्रमाणात कामे पदरात पाडून घेतली; मात्र प्रत्यक्षात काम पूर्ण करण्याकडे दुर्लक्ष केल्याचेही बैठकीत स्पष्ट झाले. त्यामुळे संबंधित एजन्सींवर ब्लॅकलिस्टची कारवाई करून पुढील शासकीय कामांपासून त्यांना दूर ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

दरम्यान, रखडलेल्या योजनांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमिवर अनेक गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असून महिलांना व नागरिकांना पाण्यासाठी मोठी पायपीट करावी लागत आहे. जल जीवन मिशनच्या कामांना गती देऊन नागरिकांना तातडीने दिलासा द्यावा, अशी मागणी धरू लागली आहे.

## श्री तुळजाभवानी मंदिर परिसर अतिक्रमणमुक्त; भाविकांसाठी मार्ग खुला

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ मे -**

भाविकांना सुलभ, सुरक्षित व सुव्यवस्थित दर्शन व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी आज सकाळी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान परिसरात व्यापक अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली. मंदिर संस्थानचा सुरक्षा विभाग, स्वच्छता विभाग, तुळजापूर नगरपरिषद तसेच पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने ही कारवाई करण्यात आली.





या मोहिमेदरम्यान महाद्वार रोड, भवानी रोडसह मंदिराकडे जाणाऱ्या तिन्ही प्रमुख मार्गांवरील अतिक्रमणे हटविण्यात आली. तसेच श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या प्रशासकीय कार्यालय परिसरातील अनधिकृत अतिक्रमणे काढून परिसर मोकळा करण्यात आला. मातंगी मंदिरातून बाहेर पडण्याच्या मार्गावरील अडथळे दूर करून भाविकांच्या ये-जा मार्गाची सुविधा सुधारण्यात आली.

या कारवाईत तुळजापूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे विश्वस्त विनोद गंगणे, तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने, सहायक पोलीस निरीक्षक अर्जुन चौधर यांच्यासह मंदिर संस्थान, नगरपरिषद आणि पोलीस प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे मंदिर परिसरातील प्रमुख मार्ग मोकळे झाल्याने भाविकांच्या वाहतुकीत मोठी सुधारणा होणार असून दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना दिलासा मिळणार आहे.

फेरीवाले व व्यावसायिकांनी सार्वजनिक रस्त्यांवर अतिक्रमण करू नये तसेच भाविकांना कोणताही त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन नगराध्यक्ष तथा विश्वस्त विनोद गंगणे यांनी केले.

भाविकांच्या सोयीसाठी भविष्यातही अशा प्रकारच्या अतिक्रमण हटाव मोहिमा नियमितपणे राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## मद्यपी चालकावर गुन्हा दाखल

**धाराशिव, दि.८ मे -**

भूम शहरातील तहसील कार्यालयासमोर मद्यधुंद अवस्थेत दुचाकी चालवून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकाविरुद्ध भूम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, छगन उद्धव काळे (रा. पारधी पिढी, भूम) हे दि.६ मे रोजी एमएच २५ एव्हाय ५५६७ क्रमांकाची मोटरसायकल मद्यधुंद अवस्थेत चालवत होते. तहसील कार्यालयासमोर ही कारवाई करण्यात आली.